म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ८१८



REFBK-0000360

१९०८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ८२८

ऊन बक्षीस मिळालेला निबंध.

श्री
एकनाथ व तुकाराम

यांच्या

चरितांपासून महाराष्ट्र समाजावर आणि

धर्मावर घडलेला परिणाम.


REFBK-0000360

किंमत ४ आणे.

मुंबई युनिव्हर्सिटीकडून पास होऊन बक्षीस मिळालेला निबंध.

एकनाथ व तुकाराम.

यांच्या

चरितांपासून महाराष्ट्र समाजावर व

धर्मावर घडलेला परिणाम.

लेखक

कै. बाजीराव सखाराम सोनवणे.

प्रकाशक

माधवराव हणमंतराव घोरपडे.

सेक्रेटरी "बंधुसमाज" पुणें.

मुद्रक

त्र्यंबक हरि आवटे,

मालक 'इंदिरा' छापखाना पुणें.

सन १९०७.

किंमत ४ आणे.

प्रस्तावना.

काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें ।
परि त्या विश्वंभरें बोलविलें ॥

श्रीतुकाराम.

हा निबंध मुंबई युनिव्हर्सिटीकडून पसंत होऊन त्यास नारायण महादेव परमानंद यांचें २०० रुपयांचें बक्षीस देण्यांत आलें. बक्षीस मिळून दोन वर्षे होत आलीं. या अवधींत या निबंधाच्या लेखकावर एकामागून एक इतकीं कांहीं संकटें आलीं कीं, त्यामुळें त्याच्याकडून हा लेख प्रसिद्ध होण्यापूर्वीच त्यांस हें जग सोडून जावें लागलें ! त्यांचे कनिष्ट बंधु रा. रा. राजाराम सखाराम सोनवणे [बंधु समाजाचे एक सभासद] यांजकडूनही हा अमोल्य लेख कांहीं अपरिहार्य कारणामुळें लवकर प्रसिद्ध होण्यासारखा नव्हता. पण कसरीच्या भक्ष्यस्थानीं पडून हा लेख नाहींसा व्हावा हें इष्ट नसल्यामुळें आम्हीं हा बंधुसमाजामार्फत छापवून महाराष्ट्र वाचकांपूढें ठेवीत आहों. त्यास रसिकवाचकवृंदाकडून उदार आश्रय मिळेल अशी आशा आहे.

लेखकाचे अल्प चरित्रः–यांचा जन्म कुलीन मराठे घराण्यांतील देवभोळे व पापाभीरु अशा मातापितरांचें पोटीं झाला. "शुद्ध बिजा पोटीं फळें रसाळ गोमटीं" ह्या श्रीतुकारामबोवांच्या उक्तीप्रमाणें त्यांच्या स्वभावांत तेच गुण उतरावेत हे सहाजिक होय. लहानपणापासून कथापुराणाची आवड, शाळेंत व कॉलेजांत जाऊन शिक्षण घेण्याची असाधारण गोडी, ज्ञानेश्वरी, भागवत, विचारसागर वगैरे धार्मिक ग्रंथांचा दृढ परिचय, इतिहास व साधु आणि वीर पुरुषांचीं चरित्रें यांचें परिशीलन, सभा व व्याख्यानें यांची अप्रतिम हौस, ब्राह्मसमाज, प्रार्थनासमाज, थियासफीसारख्या नव्या पंथाशीं विशेष परिचय, जुन्या चालीच्या लोकांत मिळून मिसळून वागण्याचा कटाक्ष व आपल्या उपदेशानें त्यांना सुसंस्कृत करण्याचे प्रयत्न वगैरे सर्व

गोष्टींवरून त्यांची तैल व तीव्र बुद्धि, निर्व्यसनीयता, त्यांचें अवाढव्य वाचन, राजकीय, सामाजिक, नैतिक वगैरे बाबतींत त्यांचें सुसंस्कृत व दूरदर्शी विचार आणि त्यांची आपल्या लोकांस सुधारण्याची अव्याहत खटाटोप या सर्व गोष्टींचा चांगलाच उलगडा होतो. अध्यात्मपर धार्मिक विषयांवर निरूपण करण्यास त्यांना मिळालेली संधी वक्तृत्वोतेजक मंडळीमध्यें धार्मिक विषय घेऊन परिक्षकांकडून व लोकांकडून मिळविलेली वाहावा व हा लेख लिहून मिळविलेलें परमानंद बक्षीस व इंग्लिशांच्या अमलापासून हिंदुस्थानावर झालेले परिणाम ह्या विषयावर भर आजारांत पुनः लेख लिहून तेंच बक्षीस दुसऱ्यावेळेस मिळविण्याचा केलेला प्रयत्न, त्यांचीं किरकोळ व्याख्यानें व कीर्तनें ह्या गोष्टींवरून ते लेखणीचे खंबीर व वाचेचे रसाळ होते, हें सिद्ध होतें. एकांतांत बसून योग समाधी लावण्याचा त्यांचा सतत प्रयत्न चालु होता. सरकारी नोकरींतिल त्यांची हुशारी, लोकांशीं असलेलें मन मिळाऊ व नम्रतेचे वर्तन यामुळें ते लोकप्रिय झाले होते. अशा होतकरु तरुणास त्याच्या वयाच्या एकूणतिसाव्या वर्षी ३१ मार्च १९०७ रोजीं इहलोक सोडावा लागला हे खरोखर आपल्या लोकांचें दुर्भाग्य होय. त्यांचें असलेलें अठराविश्वे दारिद्र्य, त्या वर कोणाचीही नसलेली देखरेख व उत्तेजन वगैरे त्यांच्या सभोवतीं असलेली भिकार परिस्थिति लक्षांत घेतली असतां, असें अनुमान बांधण्यास काय हरकत आहे कीं ते जर ह्यापेक्षां उत्तम परिस्थितीमध्यें असते तर ते कोणी तरी मोठे मनुष्य झाले असते. परंतु झालेल्या गोष्टीस इलाज नाहीं. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो !

विषयाच्या विचारसरणीसंबंधानें विचार करितां पुढील पानांत लेखकानें जे विचार आपल्यापुढें मांडिले आहेत ते निःपक्षपातानें, निरपेक्ष बुद्धीनें व लोकसुधारणेच्या उत्कट इच्छेनें प्रेरित होऊन लिहिले आहेत व शक्य तितकी माहिती मिळविण्यास बरेच परिश्रम हीं घेतले आहेत हें सूज्ञ वाचकास दिसेलच. **अमुक एखादे विविक्षित मत लोकांच्या बिघडलेल्या रुचीस आवडणार नाहीं व त्यामुळें स्वतःच्या पैशास खार लागून लोकप्रान्यता कमी होईल म्हणून तें मत गुंडाळून ठेवून लोकांस आवडेल असेंच मत प्रतिपादन करणारे लोकछंदानुवर्ती लेखक व वक्ते हे समाजाचे खरे हितकर्ते**

नसून शत्रु होत. त्यांतून धार्मिक विषयासारख्या महत्वाच्या परंतु भानगडीच्या विषयांत तर असें वर्तन हानिकारक होय.

निबंधांतील भाषासरणी पहातां वाचकांस एवढेंच सांगितलें पाहिजे कीं या निबंधाच्या लेखकास या निबंधाकरितां युनिव्हर्सिटीनें प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीची खबर फारच उशीरां मिळाल्यामुळें त्यास हा निबंध थोड्याच अवधींत लिहून काढावा लागला. त्यामुळें शब्दयोजना, व वाक्यरचना जितकी शुद्ध व विषय प्रतिपादन जितकें सविस्तर व्हावयास पाहिजे होतें तितकें करण्यास त्यांना मुळींच वेळ मिळाला नाहीं, व त्यांच्या निधनानंतर पांच सहा महिन्यांनीं आमच्या समाजाच्या एका सभासदाच्या अकाली मृत्यूमुळें हा निबंध त्वरित छापून प्रसिद्ध करावा अशी आम्हांस उत्कट इच्छा झाली व त्याप्रमाणें आम्हीं घाईघाईनें प्लेगच्या धामधुमींत हा आमचा अल्प प्रयत्न लोकसेवेस सादर करितों. तरी त्यांत कांहीं दोष सांपडल्यास गुणग्राहक वाचक हंसक्षीर-न्यायानें गुणांचें ग्रहण व दोषांचा त्याग करितील अशी पूर्ण आशा आहे.

हा निबंध लिहितांना व प्रसिद्ध करतांना कांहीं सद्गृहस्थांनीं लेखकास व आह्मांस वेळोवेळीं आपला अमोल्य वेळ खर्च करून जी सर्व प्रकारें मदत केली तिजबद्दल त्यांचे व रा. **राजाराम सखाराम सोनवणे** यांनीं हा निबंध समाजातर्फे छापण्याची जी अमोल्य संधि दिली त्याबद्दल त्यांचे जितके आभार मानावे तितके थोडेच आहेत. सरते शेवटीं रा. **त्र्यंबक हरि आवटे** यांनीं आह्मांस हा निबंध प्लेगच्या दिवसांत वेळेवर व काळजीपूर्वक छापून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानून लेखकाचे इच्छेप्रमाणें हा लेख त्यांचे परमपूज्य गुरु **कृष्णबुवा गोरवडेकर** यांस त्यांच्या थोरपणाबद्दल त्यांची प्रेमाची खूण ह्मणून अर्पण करून ही अल्प प्रस्तावना पुरी करितों.

पुणें सोमवार २६९ ता. २६।१०।०७. } व्यवस्थापक, **कृष्णाजी महादेव गायकवाड.**

(१) १८.१२.१९

श्री
एकनाथ व तुकाराम.

प्रकरण १ लें.

श्रीएकनाथ.

भगवद्भाव सर्वांभूतीं । हेंचि ज्ञान हेचि भक्ति ॥

—श्रीएकनाथ.

या भरतखंडांत एकंदर जनसमूहावर अनंत उपकार करून त्याचा उद्धार करणाऱ्या ज्या अनेक विभूति निर्माण झाल्या, व ज्यांनीं कित्येक अमानुष कृत्यें करून सर्व नास्तिक लोकांचीं तोंडें बंद केलीं, ज्यांनीं परमेश्वरभक्ति करणें हाच दुस्तर भवसागर तरून जाण्यास उत्तम व सुलभ उपाय आहे असा लोकांना बोध करून तदनुरूप स्वतःचा अनुभवही दाखविला, व दृष्टांतादिकेंकरून लोकांना सन्मार्गवर्ती केलें, त्यांमध्यें श्रीएकनाथ महाराज यांची श्रेष्ठत्वानें गणना आहे. केवळ मनुष्यमात्राचें कल्याण व्हावें एवढ्याच उद्देशानें यांनीं अश्रांत श्रम केले, प्रभुचरणीं आपली वृत्ति तन्मय करून स्वतःची मुक्तता करून घेतली; व आपल्या ठायीं असलेल्या अद्वितीय भक्तितेजानें व प्रासादिक अभंगवाणीनें एकंदर महाराष्ट्रवासी जनांस आश्चर्यचकित करून सोडलें. एकनाथांचा जन्म पैठण मुक्कामीं शके १४७० म्हणजे इ० स० १५४८ या वर्षी झाला. यांचें घराणें पूर्वीपासून सद्गुणी व नीतिसंपन्न होतें. या घराण्यांत भानुदास नामेंकरून एक अतिप्रख्यात भक्तिमान् पुरुष निर्माण झाला. त्यानें आपल्या निस्सीम भक्तिप्रभावानें सकल भक्तमंडळींत व साधुसंतांमध्यें मोठी कीर्ति संपादन केली; व विजयानगरच्या रामराजानें अनागोंदीस नेलेल्या श्री विट्ठलमूर्तीस परत पंढरपुरास

आणिलें. नाथांच्या भक्तिरूपी इमारतीचा हा मूळपुरुष पायाच होय. भानुदासाचा पुत्र चक्रपाणि, चक्रपाणीचा सूर्यनारायण व सूर्यनारायणाचा एकनाथ, अशी ही वंशपरंपरा आहे. नाथांनीं भानुदासाबद्दल **वंदूं भानुदास आतां। जो कां पितामहाचा पिता। ज्याचेनि वंश भगवंता। जाला सर्वथा प्रियकर।।** असा सप्रेम उद्गार काढला आहे व 'वैष्णव कुळीं जन्म' मिळाल्याबद्दल धन्योद्गार काढले आहेत. नाथ अल्पवयस्क असतांनाच त्यांचीं आईबापें वारलीं, व त्यांचें संगोपन त्यांचा वृद्ध आजा चक्रपाणी यानें केलें. **प्रसादचिन्हानि पुरःफलानि** या न्यायानें त्यांच्या भावी प्रतापतेजोराशीचीं स्वभावगुणरूपी कोमल किरणें बाल्यावस्थेंतच चमकूं लागलीं. पाषाणरूपी देवावर मृत्तिकारूपीं पुष्पें वाहणें, व लांकडाचा वीणा करून बोबड्या स्वरांनीं हरदासांचें अनुकरण करणें, हे नाथांचे लहानपणीचे खेळ होते. एकनाथांची बुद्धि फार तीव्र व स्मरणशक्ति अति विलक्षण असे. लेखन वाचन हिशेब वगैरे घरींच शिकून मौंजीबंधन झाल्यावर गुरूजवळ जाऊन त्यांनीं वेदाध्ययन अति शीघ्रगतीनें केलें. मध्यंतरीं कथाकीर्तन श्रवण करणें, प्रेमळ साधूंचीं चरित्रें वाचणें, योगसाधनांचें मनन करणें व ब्रह्मज्ञानाचा विचार करणें इत्यादि गोष्टी चालू होत्याच.

पुराण श्रवण करून आल्यानंतर गांवाबाहेर असलेल्या एका एकांत शिवालयांत बसून त्यांचें मनन करणें व परमेश्वराचें चिंतन करणें, हा नाथांचा नित्यपाठ असे. या जगाचें अशाश्वत स्वरूप जाणून संसारीं असूनही कित्येक सत्पुरुष शुद्ध पारमार्थिक कसे बनले हा विचार त्यांचे मनांत सदोदित घोळत असे. शेवटीं गांवांतील पुराणिकांनीं केलेल्या समाधानानें संतुष्ट न होतां, 'परमेश्वराच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान प्राप्त करून देणारा सत्पुरुष कोणत्या स्थळीं व व कोणत्या कालीं व कसा भेटेल ?' अशी उत्कंठा नाथांच्या अंतःकरणांत उत्पन्न झाली. सद्गुरूवांचून मनाची तळमळ जाणार नाहीं असा नाथांनीं निश्चय केला. एके दिवशीं वरील देवालयांत एकनाथ या विचारांत निमग्न झाले असतां 'देवगडावर जनार्दनपंत म्हणून कोणी महापुरुष आहे त्याची भेट घेतली असतां तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील.' असा अश्रुतपूर्व ध्वनि नाथांच्या कानीं पडला. हा ध्वनि ऐकल्याबरोबर नाथांस फार आश्चर्य वाटलें, व पैठण सोडून जाण्याचा त्यांनीं विचार केला. केव्हां केव्हां चक्र-

पाणीची वृद्धावस्था, आपण गेल्यावर वृद्ध आजाआजींची होणार निरुष्ट स्थिति, त्यांचें आपणावरील अवर्णनीय प्रेम, व अपरिमित ममता, इत्यादि गोष्टी मनांत आल्या म्हणजे नाथांला पराकाष्ठेचें वाईट वाटून त्यांचा कंठ दाटून येई. परंतु लागलीच मनरूपी अश्वाला विवेकरूपी लगामानें आंवरून धरून जगाची क्षणभंगुरता व ब्रह्मज्ञानापासून होणारा परमानंद, या सुखकारक विचारांमध्यें त्यांनीं पुनः गढून जावें. असा क्रम चालला असतां एके दिवशीं कोणाच्या नजरेस पडूं नये म्हणून मोठया पहांटेस. उठून नाथांनीं थेट देवगडचा रस्ता धरला. पायीं चालण्याची कधीं संवय नाहीं, त्यांतून आठ वर्षांचें लहान वय, शिवाय रस्ता माहीत नाहीं; व कोणी बरोबर सोबतही नाहीं. इतकीं प्रतिकुल साधनें असतांही **अशक्य तें तुझा । कांहीं नाहीं नारायणा** देवाच्या मनांत एखादी गोष्ट करावयाचीच असली म्हणजे तीस कशाचीच जरूरी लागत नाहीं या म्हणीप्रमाणें एकनाथ व जनार्दनपंत यांची अखेरीस गांठ पडली.

जनार्दनपंत हे दौलताबादच्या यवनपादशाहींत दिवाणगिरीचें काम पहात असत. ते मोठे शूर व राजकार्यधुरंधर होते. मुसलमानी राज्यांत एवढें जोखमीचें काम संभाळून त्यांनीं नित्यकर्म व दत्तपूजा हीं अव्याहत चालविलीं होतीं. संसार साधून परमार्थ करण्याची हातोटी पंतांनींच नाथांस आपल्या स्वानुभवानें अवगत करून दिली. पंतांस दत्तपूजनार्थ त्रास होऊं नये म्हणून गुरुवार हा सुटीचा दिवस मानला होता. हिंदुधर्मद्वेष्ट्या परधर्मीयांसही चकित करून टाकणारें हें केवढें संतांच्या ब्रह्मतेजाचें अतुल सामर्थ्य! जनार्दनपंतासारखा प्रपंच-परमार्थांत निपुण असणारा गुरू, व एकनाथासारखा वैराग्यशील व गुरुभक्त शिष्य, मग काय विचारावें? **सुखें येतो घरा नारायण** या तुकोबाच्या वचनाप्रमाणें स्थिति व्हावयाची. महिपतीनें भक्तलीलामृत ग्रंथांत म्हटलें आहे कीं, ज्या दिवशीं एकनाथांची भेट झाली त्या दिवशीं जनार्दनपंतास शुभचिन्हें होत होतीं. असो नम्रता, सहन शीलता, आज्ञाधारकपणा व ज्ञान, इत्यादि आपल्याठायीं असलेल्या अलौकिकगुणांनीं नाथांनीं गुरूची मर्जी लवकरच संपादन केली. **जन्मोजन्मींचें संचित । गुरुपायीं जडलें चित्त ॥ १ ॥ देह गेला तरी जावो । गुरुचरणीं दृढ भावो ॥ २ ॥** असा दृढभाव नाथांचा गुरुचरणी होता. पंतांनीं

नाथांस कसोटीस लावावें, व नाथांनीं त्या कसोटीस उतरून आपल्या वेदांताविषयक शंका निरसन करून घ्याव्या असा कम सुरूं केला. या योगानें नाथास ज्ञानेश्वरकृत अमृतानुभव व ज्ञानेश्वरी या ग्रंथांतील ब्रह्मरहस्य अति उत्तम प्रकारें कळून आलें. एके दिवशीं जनार्दन-पंत समाधिस्थ बसले असतां, परचक्र आल्यामुळें अकस्मात् बादशा-हाचें तावडतोबीचें लढाईचें बोलावणें आलें. तेव्हां नाथांस इकडे आड व इकडे विहीर अशी मोठी अडचणीची वेळ येऊन ठेपली. गुरूची समाधी उत्थापन केली तर ते कदाचित् रागावतील; व तसें न करावें तर बादशाहाची गैरमर्जी व्हावयाची. असा विचार चालला आहे तोंच बाह्यप्रदेशीं तोफांचा भडिमार सुरू झाला. ही वेळ स्वस्थ बसून विचार करण्याची नव्हे असें समजून, जनार्दनपंताचा पोषाख चढवून ढालतरवारादि पंच हत्यारें, व चिलखत धारण करून 'जना-र्दनस्वामी की जय,' अशी गर्जना करून नाथांची स्वारी बाहेर पडली. नाथांनीं स्वसैन्यासहवर्तमान परचक्राच्या नीट तोंडावर जाऊन आपल्या हस्तकौशल्यानें शत्रूंचा तावडतोब पराभव केला व आपण विजयी होऊन रक्तानें भरलेल्या वस्त्रांसह किल्ल्यावर परत आले. महि-पतीनें आपल्या ग्रंथांत वर्णन केल्याप्रमाणें, लढाईसारख्या दुर्धर प्रसंगीं नाथांचें हस्तकौशल्य व एकंदर बाह्यस्वरूप, जनार्दनपंतांचेंच आहे असा भास सर्वांस होणें, ही एक ध्यानांत ठेवण्यासारखी चमत्कारिकच गोष्ट ह्म-णावयाची. **हजारांत एक निवडे तो शूर। गाजवी तरवार बरें होतें।** असें ह्मणून जनार्दनपंतांनीं व बादशाहानें नाथांची फार वाहवा केली. याप्रमाणें नाथांनीं घाडसाची व स्वामिसेवेचीं अनेक कृत्यें करून गुरूची प्रसन्नता प्राप्त करून घेतली; **चणे खावे लोखंडाचे। मग ब्रह्मपदीं नाचे॥** या तुकोक्तिप्रमाणें ब्रह्मोपदेश घेण्यास ते पात्र झाले.

नाथांचें अक्षर वळणदार असून, त्यांची फड्र्या कारकुनांत श्रेष्ठ-त्वानें गणना झाली होती, ह्मणून पंतांनीं त्यांस दप्तरांतील हिशेबाचें काम सांगितलें होतें. एके दिवशीं नाथ जमाखर्च लिहित असतां एका पैशाची चूक येऊं लागली. ती शोधून काढण्यास नाथ गुंतले असतां मध्यरात्र उलटून जाऊन पहाटेची वेळ झाली. रात्रभर बसल्यामुळें डोळे आरक्त झाले, व बेरीज करून करून घशास कोरड पडली, परंतु चूक कांहीं केल्या सांपडेना. तेव्हां गुरुमहाराजांची आपल्यावर खप्पा मर्जी होईल, व ही एक पैशाची चूक माझ्या अमोल प्रामाणिक-

पणास व स्वामिसेवेस बट्टा लावणार, असें समजून त्यांचें हृदय शोकाकुल झालें. अकस्मात् ती चूक सांपडली, व ती सांपडतांच एकनाथ हर्षानें नाचूं लागले. ही सर्व हकीकत जनार्दनपंत आडवाजूस उभे राहून एक प्रहरपर्यंत अवलोकन करीत होते. त्यांना नाथांची ही स्थिति पाहून गहिंवर आला; व विलंब न लावतां ब्रह्मोपदेश करण्याचा त्यांनीं निश्चय केला. अधिकार प्राप्त झाल्यावांचून उपदेश करणें योग्य नव्हे असें समजून पंतांनीं नाथांस उपदेश केला नव्हता. म्हटलें आहे :-**उपदेशोहि मूर्खाणां प्रकोपाय न शांतये पयःपानं भुजंगानां केवलं विषवर्धनं** ॥ १ ॥ अर्थः-मूर्खाला उपदेश शांतिप्रद न होतां कोपवृद्धीस कारण होतो. जसें भुजंगास दुग्धप्राशन करविलें असतां तें विषवृद्धीस कारण होतें.

त्याप्रमाणें एकनाथ हे पूर्ण अधिकारी आहेत अशीं पंतांची पक्की खातरी झाल्यावर त्यांनीं ब्रह्मज्ञानाचा उपदेश करून त्यांच्या मस्तकावर वरदहस्त ठेविला. त्याचे महिपतीनें आपल्या ग्रंथांत उत्कृष्ट वर्णन केलें आहे. त्याचा थोडक्यांत सारांश खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.:- " एक पैशाची चूक शोधून काढण्यास तूं जशी इतकी चित्ताची एकाग्रता केली होतीस तशीच ही स्वरूपज्ञानरूपि मोठी चूक शोधून काढण्यास केली पाहिजे. ज्याप्रमाणें ती चूक सांपडेपर्यंत तुला दुःख व शोक प्राप्त होऊन तुझा आनंद नाहींसा झाला होता, त्याचप्रमाणें या मायारूपी चुकीच्या प्रभावानें एकंदर मनुष्यप्राणी ब्रह्मानंदास मुकून नाशवंत व भासमान संसारसुखाचे ठिकाणीं निमग्न झाले आहेत. स्वप्नकालीं जशा आपल्या नानाप्रकारच्या सुखदुःखात्मक मनोवृत्ति होत असून जागृत अवस्थेंत आपण त्यांची योग्यता सारखीच मानतों, तद्वत **अविद्येच्या निंदा। विश्वस्वप्नाचा धांदा** ॥ म्हणजे जोंपर्यंत आपण अविद्येच्या निद्रेमध्यें संसाररूपी दीर्घस्वप्नांत गढून गेलेलों असतों तोंपर्यंत विषयसुख प्राप्त झालें असतां हर्ष मानतों, व तेंच नाहींसें झालें असतां शोक करीत बसतों; परंतु तेच आपण आत्मस्वरूपीं जागे झालों ह्मणजे सुखदुःखाची योग्यता सारखीच होते. **तुका म्हणे जाण। सुख दुःख तें समान** ॥ **नागमुद्दी कंकण। त्रिलिंगी भेदली खूण। परी पाहों जातां सुवर्ण। एकच आहे** ॥१॥ कोणी डाकींत घालण्यासाठीं सोन्याचा नाग करितात, कोणी मुद्दी व कोणी हातांत घालावयासाठीं सुवर्णाचें कंकण करितात. मग सुवर्ण

हा शब्द मागें पडून तो नाग, ती मुदी, व तें कंकण असा व्यवहार सुरू होतो. याप्रमाणें लिंगवैचित्र्य व रूपवैचित्र्य जरी प्रतीत होतें, तरी त्या दागिन्यांतून सुवर्ण काढून घेतलें असतां लिंगरूप केवळ अभावमात्र होतात. त्या सुवर्णाच्या अलंकारांच्या अंतर्बाह्य सुवर्णच आहे, व त्यांचा आदि व अंत सुवर्णाव्यतिरिक्त मुळींच नाहीं. **कनकाचे पाही अलंकार केले । कनकत्वा आले एकपणें ॥ १ ॥** तद्वतच केवळ स्वरूपाज्ञानेंकरून, या भासमान जगताचे ठिकाणीं पुरुष, स्त्री व नपुंसक हा लिंगभेद प्रतीत होतो, परंतु तेंच आत्मदृष्टीनें अवलोकन केलें असतां ब्रह्माव्यतिरिक्त दुसरा पदार्थच नाहीं असें प्रत्ययास येतें **तुका ह्मणे एक एक ते अनेक । अनेकत्वीं एक एकपणें ॥ १ ॥** ही स्थिति अंगीं बाणली ह्मणजे खरा परमार्थ झाला. कारण, परमार्थ=परम+अर्थ=महत् + प्राप्ति अथवा महालाभ. ' वासुदेवः सर्वमिति ' असा निश्चय होऊन स्वरूपाचें यथार्थ ज्ञान होणें म्हणजे आत्मलाभ होणें, हाच महालाभ होय. म्हटलें आहे, **यल्लाभान्नापरो लाभो यत्सुखान्नापरं सुखं । यज्ज्ञानान्नापरं ज्ञानं तद्ब्रह्मेत्यवधारयेत् ॥**

वरील प्रकारें परमार्थ संपादन करण्यास गृहस्थाश्रमाचा त्याग करण्याची मुळींच अवश्यकता नाहीं. पवित्र मातापितरांचें व आश्रित मुलांलेंकरांचें योग्य रीतीनें संरक्षण करूनही ईशप्राप्ति होते. **न लगती सायास जावें वनांतरा । सुखें येतो घरा नारायण ॥१॥** ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास या चार आश्रमांपैकीं गृहस्थाश्रम फारच उत्तम आहे. गृहस्थाश्रमांत शास्त्र नियमानें व निरासक्त मनानें यथोचित विषयसेवन करणें, हें इतर आश्रमांतील विषयत्यागाची बरोबरी करतें **विधीनें सेवन । विषयत्यागातें समान ॥ १ ॥** दुसरे कामक्रोधादि षड्रिपु जिंकण्याचे भयंकर प्रसंग संसारांत जसे येतात तसे अरण्यांत येत नाहींत. शिवाय या आश्रमांत जसा परोपकार करण्यास सांपडतो तसा तो इतर आश्रमांत सांपडत नाहीं. **परोपकारः पुण्याय** परोपकारासारखें पुण्य नाहीं. असें व्यासांचें वचन आहे, व परोपकारी माणसांचें ईश्वर सदोदित संरक्षण करीत असतो. नाथांस हा उपदेश ऐकून फार

---

१ आपुले आश्रमीं स्वधर्मीं असतां सर्वत्र एकचि जाणा । बापरखुमादेवीवर विठ्ठलु इतुकियासाठीं नेईल वैकुंठभुवना ॥ ज्ञानेश्वर.

आनंद झाला, व सद्गदित अंतःकरणानें गुरुचरणावर लेखणी ठेवून **पूर्व सुकृत होतें कांहीं। मग रामनाम व्यापार लाधलों पाहीं। अतएव मी ये समयीं। घालितो पायीं दंडवत** ॥ १ ॥ असें म्हणून दंडवत घातलें. या उपदेशास कांहीं दिवस लोटल्यावर एके दिवशीं खालील अद्भुत चमत्कार घडून आला.

दौलताबादेपासून दोन कोसांवर गगनचुंबित वृक्षांनीं आच्छादिलेला असा एक महाभयंकर पर्वत आहे. त्या पर्वतावर प्रत्येक गुरुवारीं दत्तात्रय पूजा करण्यास जाण्याचा जनार्दनपंतांचा परिपाठ असे. ही एकांत जागा दुसऱ्या कोणासही ठाऊक नव्हती. एके दिवशीं नाथांस दत्तात्रयदर्शन व्हावें म्हणून जनार्दनपंत त्यांना आपल्याबरोबर घेऊन गेले. वाटेनें जातांना त्या पर्वतावरील हृदयवेधक सृष्टिसौंदर्याचा रमणीय देखावा पाहून नाथांस सानंदाश्चर्य वाटलें. इतक्यांत एका सरोवराच्या कांठीं असलेल्या औदुंबर वृक्षाखालीं, संगमरवरी दगडाच्या सिंहासनावर एक सुंदर स्फटिकाची दत्तात्रेय मूर्ति त्यांच्या दृष्टीस पडली. तेथें पोंहचल्यावर या गुरुशिष्यांनीं त्या सरोवरांत स्नान करून धूतवस्त्रें परिधान केलीं. नंतर सर्वनित्यविधि आटोपल्यावर नाथांस झाडांच्या जाळींत बसावयास सांगून पंतांनीं समाधि लाविली. त्या समाधीची विलक्षण शोभा नाथ पहात आहेत तोंच एक महा भयंकर मलंगमूर्ति एकाएकीं प्रगट झाली, व लागलीच ती मलंगमूर्ति अदृश्य होऊन दत्तात्रय महाराज साक्षात् पुढें येऊन उभे राहिले **मग तया सुखा अंत नाहीं पार। आनंदें सागर हेलावती** ॥ नाथ महाराजांस त्यावेळीं झालेला आनंद केवळ अवर्णनीय होय. नंतर गुरूंनीं नाथमहाराजांस त्यांच्या पायावर घातलें, व त्यांनीं आशीर्वाद देऊन लोकाहिताचें काम करण्यास सांगितलें. हा सगुण साक्षात्कार झाल्यानंतर प्राणायाम कसा करावा, इत्यादि गोष्टी चांगल्याच नाथमहाराजांनीं अवगत करून घेतल्या. आपणास झालेल्या ज्ञानाचें दृढीकरण व्हावें म्हणून नाथमहाराज तीर्थ यात्रेस निघाले, व त्र्यंबकेश्वरीं गोदावरीचे तीरीं सुबोध व रसाळ अशी श्रीमद्भागवताच्या एकादशस्कंधावर टीका केली. हाच त्यांचा प्रधान

---

१ जनार्दन स्वामीं विषयींची नाथांची भक्ति त्यांच्या कित्येक अभंगांत प्रकट झाली आहे.—जनार्दनें कृपा केली। वृत्ति ब्रह्माकार झाली ॥ १ ॥

ग्रंथ होय[1]. ते तीर्थयात्रा करीत पैठणास आले व ज्या देवालयांत आकाशवाणी ऐकली होती त्या देवालयांत उतरले.

इकडे पैठण मुक्कामीं चक्रपाणीनें नाथमहाराजांचा पुष्कळ शोध केला, परंतु मुळींच पत्ता लागला नाहीं. पुढें कांहीं वर्षांनीं नाथमहाराज दौलताबादेस आहेत अशी बातमी लागल्यावर ज्या पुराणिकाजवळ नेहमीं पुराण श्रवणास जात असत त्यांस अदमासानें दौलताबादेस पाठवून नाथमहाराजांस घरीं राहण्याविषयींचें एक पत्र जनार्दनपंतांकडून लिहून आणविलें. नंतर या आजानातवांची बहुत काल अपेक्षा केलेली भेट झाली. त्यां भेटीपासून एकमेकांस जो आनंद झाला तो सांगतां पुरवत नाहीं. नाथांनीं ती गुरूची पत्रिका वाचून पाहिल्यावर **यदि शिष्यो गुरोराज्ञाभंगं खलु करिष्यति ॥ व्रजे नरकमाकल्पं स्वयं हि पितृभिःसह ॥ १ ॥** अर्थ--शिष्यानें गुरूची आज्ञा मोडली तर तो आपल्या वाडवडिलांसह कल्पपर्यंत नरकाप्रत जातो; **सेवकासी आज्ञा स्वामिची प्रमाण । जीवरि हा प्राण जाय त्याचा ॥** असें समजून कोठेंही न जातां पैठण मुक्कामीं आजन्म वास्तव्य केलें, व जडजीवांचा उद्धार करण्यांत अवशिष्ट आयुष्य घालविलें.

नाथमहाराजांची कडकडीत गुरुभक्ति व त्यांना झालेलें दत्तदर्शन याची वार्ता लवकरच चोहोंकडे पसरून त्यांच्याविषयीं लोकांची पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. त्यांचे अनेक अलौकिक गुण पाहून विजापूर येथील एका थोर गृहस्थानें आपली गिरिजाबाई नांवाची सुस्वभावी कन्या त्यांस अर्पण केली. **कार्येषु मंत्री । करणेषु दासी । भोज्येषु माता ।** या वचनाप्रमाणें तिचें नेहमीं वर्तन असे. ती आपल्या शांत व नम्र स्वभावानें सर्वांस फार प्रिय झाली. नाथमहाराजांनीं गृहस्थाश्रम स्वीकारल्यानंतर बऱ्याच दिवसांनीं त्यांच्या वृद्ध आजाआजींचें निर्याण होऊन त्यांचे परमपूज्य गुरूही समाधिस्थ झाले. परंतु, **मरावे जन्मावे जन्मावे मरावे । मरोनिया यावे जन्मासी ये॥ "जातस्यहि ध्रुवोमृत्युर्ध्रुवं जन्ममृतस्यच । तस्मादपरिहार्येर्थे न त्वं शोचितुमर्हसि" ॥ १ ॥** झालेल्या आकाराविशिष्टास निश्चयानें मृत्यु होणार, व मृतास निश्चयानें जन्मही

---

१ रुक्मिणि-स्वयंवर हा ग्रंथ त्यांनीं काशीस मणिकर्णिकेचे तीरीं १४९३ मध्यें संपविला.

होणार आहे, तरी अपरिहार्य गोष्टीविषयीं शोक करणें चांगलें नव्हे. अशी नाथमहाराजांची दृढबुद्धि असल्यामुळें त्यांना तिलमात्रही वाईट वाटलें नाहीं. अशा रीतीनें अनासक्तबुद्धीनें गृहस्थाश्रम चालवीत असतां ईश्वरप्राप्ति कां बरें होणार नाहीं? भागवतांत भगवंतांनीं उद्धवास सांगितलें आहे : **मजमध्यें रंगली चित्तवृत्ति । यालागीं विसरला गृहासक्ति । त्यांसी गृहस्थाश्रमींच माझी प्राप्ति । निश्चयें जाण उद्धवा ॥१॥** असो. **सुखें संसारीं असावें । चित्त परब्रह्मीं ठेवावें.** अशा तुकोक्तिप्रमाणें नाथमहाराजांचा क्रम चालला असतां त्यांना गोदुबाई, हरी, व गंगाबाई अशीं तीन अपत्यें झालीं. गोदूस पैठणांतच एका सद्गृहस्थाचे घरीं दिली होती. मुलगा हरी हा पुढें हरिपंडित या नांवानें काशीक्षेत्रीं प्रसिद्ध झाला. हा अतिकर्मठ असे. नाथमहाराजांचें महाराष्ट्र भाषेंत पुराण सांगणें श्राद्धतिथीस अंत्यजादि नीच यातीस भोजन घालणें, व आपणही त्यांच्या घरीं जेवावयास जाणें इत्यादि केवळ कर्ममार्गी व केवळ ज्ञानमार्गी यांच्या कल्पना शक्तीच्या बाहेर असणाऱ्या, त्यांच्या साहजिक घडून येणाऱ्या क्रिया हरिपंडितांस आवडत नव्हत्या.

नाथमहाराजांच्या अंगीं स्वाभाविक उत्तम गुण होते. त्यांपैकीं दातृत्व हा गुण पहिल्या प्रतीचा होता. त्यांचें घर म्हणजे निराश्रित जनांचें केवळ माहेरघरच होतें. **जे कां रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ॥१॥** या तुकोक्ति बरहुकूम त्यांचा नेहमींचा वर्तनक्रम होता. **स्वापत्य तसें प्रेमें अन्नार्थी प्राणिजात तर्पावें ॥ १ ॥** या मयूर कवीच्या वचनाप्रमाणें स्वकष्टार्जित मिळविलेलें धन नाथमहाराज अनाथ पंगु अशा लोकांच्या भोजनाप्रीत्यर्थ वेंचीत असत. एकनाथमहाराज हे गांठीचा पैसा न सोडतां मुखानें भूतदयेवर लांबच लांब व्याख्यान देणारांपैकीं नव्हते. शिवाय त्यांच्या पवित्र अंतःकरणांत जातिमत्सर तिलमात्रही नव्हता. कित्येक अज्ञ जनांचा प्रचार असा आहे कीं, सजातीय वर्णश्रेष्ठ कितीही ज्ञानहीन असला, तरी त्यास पोट फुगल्यावरही लाडूवर लाडू व जिलब्यावर जिलब्या अत्याग्रहानें वाढावयाच्या; व एखादा विजातीय कितीही ज्ञानसंपन्न असला व क्षुधित असला, तरी त्यास उरलेलें उच्छिष्टही न घालतां गालिप्रदानें द्यावयाचीं अगर अर्धचंद्राचा प्रयोग करावयाचा. नाथमहाराजांची अभेदभावाची मजल एथपर्यंत गेली होती कीं, एके वेळीं त्यांनीं पितृतिथीस क्षण दिलेल्या ब्राह्मणांस एकीकडे ठेवून

भुकेनें तरफडलेल्या महारमांगास श्राद्धीय अन्न वाढून तृप्त केलें. **दे अन्न अंत्यजातें केलें तर्पावयासी इतरातें। हें साधुशील दुर्लभ लोकीं कालत्रयींही इतरातें॥ १॥** नाथमहाराजांच्या गुणाचें मुखानें वर्णन करणें फार सोपें आहे,परंतु तदनुरूप वर्तन होणें किती दुर्घट आहे याचा वाचकांनींच विचार करावा. नाथमहाराजांनीं अन्नदानाप्रमाणें ज्ञानदानही देऊन कित्येक अज्ञ जनांस अज्ञानांधकारांतून काढून त्यांना सन्मार्गवर्ती केलें. त्यांचा दुसरा गुण सहनशीलता, हाही त्यांचा कीर्तिध्वज उभारण्यास पुष्कळ कारणीभूत झाला. एके दिवशीं नाथमहाराज गंगास्नान करून परत मार्गानें येत असतां एका अविंधानें पानाचा विडा खाऊन त्यांच्या अंगावर पिचकारी मारली. **दिधलें दुःख परानें उसनें फेडूं नयेचि सोसावें** या न्यायानें नाथमहाराज त्यास कांहींएक न बोलतां परत स्नानास गेले.स्नान करून परत येतात तों पानाचा विडा तोंडांत धरून तो यवन उभा होताच. त्यानें लागलीच पूर्ववत् वर्तन केलें "पुनः नाथमहाराज तोंडावाटे एक ब्रही न बोलतां पूर्वीप्रमाणें स्नानास गेले. मोंगलाईत इतका सोंवळा भटोरा कोण आहे ? त्याची खोड मोडलीच पाहिजे, ' असा त्या मुसलमानानें कृतनिश्चय केला. पुढें त्या अविंधानें थुंकावें, व नाथमहाराजांनीं परत स्नानास जावें, असा क्रम सुरू झाला. यामध्यें कोण मागें हटतो तें पाहण्यास लोकांची एकच गर्दी उडाली. सरते शेवटीं तो दुरात्माही यवन त्रासून जाऊन ओशाळला, परंतु या सहनशील नाथमहाराजांच्या वृत्तीचा मनोरा बालाग्रही डगमगला नाहीं.

पैठणामध्यें रामा नांवाचा एक भक्तिमान महार राहत असे. त्याची स्त्रीही त्यासारखी भाविक व सद्गुणी होती. या दंपत्त्याची नाथमहाराजांवर पूर्ण श्रद्धा असल्यामुळें एके दिवशीं नाथमहाराजांस भोजनाचें आमंत्रण आलें. नाथमहाराजांनीं त्या महाराच्या घरीं जाऊन यथेच्छ भोजन करून त्यास संतुष्ट केलें. ही वदंता गांवांतील कर्मठ ब्राह्मणांस कळतांच त्यांपैकीं कांहींजण नाथमहाराजांस पकडण्याकरितां महारवाड्याकडे गेले, व ते कदाचित पळून घरीं येतील ह्मणून कांहीं जण त्यांच्या घरीं गेले. गम्मत अशी झाली कीं महाराचे घरीं जाऊन पाहतात तों नाथमहाराज आमटीचे भुरके मोठ्या आवडीनें मारीत आहेत. त्यांना आंत जाऊन पकडणार, इतक्यांत त्यांचे घरीं गेलेली मंडळी परत येऊन सांगूं लागली कीं ते आपले घरांत गोष्टी सांगत बसले आहेत. एकच एकनाथ दोन ठिकाणीं कसा असेल ? असें

ह्मणून सर्व मंडळी त्यांचे घरीं जाऊन पहातात तों खरेच ते बोलत बसले आहेत ! बरें, पुनः त्या महाराचे घरीं जाऊन पाहतात तों तेथेंही आहेत. हें पाहून ते कुटाळ ब्राह्मण फार ओशाळले, व **संतांचा महिमा संतचि जाणति** हें न समजून चडफडतच बसले. या हिंदुस्थानांत पुष्कळ वैष्णव होऊन गेले, त्यांपैकीं साडेसातशे प्रख्यात आहेत. परंतु नाथमहाराजांच्या प्रपंचासारखा प्रपंच कोणाचाच नव्हता. गिरिजाबाईसारखी महापतिव्रता स्त्री, हरि पांडितासारखा षट्शास्त्रपारंगत झालेला मुलगा, उद्धवासारखा निस्सीम स्वामिभक्त शिष्य, व वंशपरंपरेचा सुखवस्तुपणा, या एकंदर गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून अन्यत्र सांपडणें फारच कठीण ! ह्मटलें आहेः–**सानंदं सदनं सुतास्तु सुधियः कांता मृदूभाषिणी ॥ इच्छा पूर्ण धनं स्वयोषितिरतिः स्वाज्ञापराः सेवकाः ॥ आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मिष्टान्नपानंगृहे ॥ साधोः संग मुपागतेच सततं धन्यो गृहस्थाश्रमः ॥ १ ॥** नाथमहाराजांची गृहस्थिति या श्लोकाप्रमाणें होती इतकेंच नव्हे, तर ज्यांच्या घरीं सर्व ब्रह्मनिष्ठामध्यें शिरोमणि असे जे दत्तात्रयमहाराज ते देवडीवर चोपदाराचें काम करीत होते; याहूनही श्रेष्ठ हें वैकुंठीचे प्रत्यक्ष परब्रह्म ज्याच्या येथें माधवजी श्रीखंड्या हें नामाभिधान धारण करून गंध उगाळून पाणी आणण्याचें काम करीत असे; **स्वकरें चंदन घासी गंगेचें पाणी कावडी भरितो** माधवजीस कोणी कृष्णंभट असेंही ह्मणतात. एक ब्राह्मण देवाचें प्रत्यक्ष दर्शन व्हावें म्हणून तपश्चर्या करीत असतां, 'नाथांचे घरीं जाऊन कृष्णंभट या नांवानें शोध कर म्हणजे तुला दर्शन होईल' असा त्यास दृष्टांत झाला. त्यावरून तो नाथमहाराजांच्या घरीं येऊन 'कृष्णंभट कोठें आहेत' म्हणून विचारूं लागला. नाथमहाराजांनीं कृष्णंभट ह्मणून हांक मारतांच, घरांतून शंखचक्रगदापद्म परिधान केलेली, श्यामसुंदर चतुर्भुज मूर्ति बाहेर आली; व नाथमहाराजांनीं व त्या ब्राह्मणानें साष्टांग नमस्कार केल्यावर अंतर्धान पावली. या चमत्काराविषयीं कोणी कशीही चर्चा करो; पण, **अद्यापि साण रांझण नाथद्वारांत असति देवाच्या ॥ हातींचे ह्मणुनि कवी, पंतमयूरेश तशी वदे वाचा ॥ १ ॥** या पंताच्या वचनाप्रमाणें ज्या रांजणांत देव पाणी भरीत होते तो रांजण आज तीनशें वर्षें प्रतिवर्षी फाल्गुन वद्य षष्ठीचे दिवशीं पैठण मुक्कामीं नाथमहाराजांच्या

साधुत्वाची साक्ष देत हजारों लोकांना त्यांचें स्मरण करवीत आहे, व ज्या सहाणखोडानें देव गंध उगाळीत होते, तेंही अजून-पर्यंत जतन करून ठेवलें आहे. या चमत्काराबद्दल कोणाचें कसेंही मत असो, पण ज्याप्रमाणें पाश्चात्य कविशिरोमणि शेक्सपीयर, याची स्ट्रॅटफर्ड येथील खुर्ची पाहण्याकरितां पुष्कळ लोकांची गर्दी होते त्याप्रमाणें या साधुशिरोमणीचा रांजण पहाण्यास हजारों लोकांची झड पडते.

एके दिवशीं नाथमहाराजांच्या स्वप्नांत श्रीज्ञानेश्वर आले व अजानवृक्षाची मुळी त्यांच्या कंठास लागली होती ती आळंदीस येऊन काढावी अशी त्यांनीं इच्छा प्रदर्शित केली. त्याप्रमाणें त्यांनीं आळंदीस जाऊन समाधि उघडून श्रीज्ञानेश्वराचे कंठास लागलेली मुळी काढली, व **ओंनमोजी ज्ञानेश्वरा। आदिनाथा निराकारा॥ तुझिया कृपें संसारा। तरलों आह्मी॥ १॥** इत्यादि एकशें एक ओव्यांनीं स्तुति केली. नंतर श्रीज्ञानेश्वरास जीवनचित्कला प्राप्त होऊन त्यांनीं नाथमहाराजांस ज्ञानेश्वरीची प्रत, व कांहीं अभंग देऊन लोकहिताचें कार्य करण्यास सांगितलें. श्रीज्ञानेश्वरांनीं जरी ज्ञानेश्वरी केली होती तरी ती नाथमहाराजांच्या द्वारें प्रसिद्धीस आली. तोंपर्यंत ती फारशी उपलब्ध नव्हती. नाथमहाराजांनीं भागवताबरोबर ज्ञानेश्वरीचेंही पुराण सांगण्यास सुरवात केली, व ती चांगली शुद्ध केली. दत्तात्रेय महाराज व श्रीज्ञानेश्वर या उभयतांच्या आज्ञेवरून नाथमहाराजांनीं अनीतिप्रवर्तक व अज्ञानांधकारांत घोरत पडलेल्या लोकांस आपल्या उपदेशामृताचें सेवन करवून त्यांना ज्ञानी करून सोडलें. भजन, पूजन, कथा, पुराण, व परोपकाराचीं कृत्यें या व्यतिरिक्त इतर गोष्टींचा व्यासंगच नाथमहाराजांस नसे. त्यांच्या अंतःकरणांत भूतदयेचें वास्तव्य इतकें जबरदस्त होतें कीं दुःखिताश्रुमार्जनाचा प्रसंग येण्याचा अवकाश, कीं त्या दयार्द्र अंतःकरणाच्या पुरुषानें काळ पाहूं नये, वेळ पाहूं नये, स्थळ व जात वगैरे कांहीं एक न जुमानतां तत्काल दुःखनिवारण करावें. त्यांनीं गोदावरीच्या कांठीं तापलेल्या वाळूवरील चुकलेलीं अति नीचांचीं व अंत्यजांचींही लहान मुलें कडेवर घ्यावींत व त्यांस महारवाड्यांत नेऊन स्वस्थळीं पोंचवावें. मोरोपंतांनीं म्हटलें आहे–'**अत्यजतोक कडे घे उष्णीं ज्या फार लाळ शेंबुड तें॥ अद्‌भुत सुकृत न गातां साधूंची रीति आळसे**

बुडतें ॥ नाथमहाराजांची लोकोपकाराची वृत्ति अगदीं विलक्षण होती. एखादा दुराचारी मनुष्य आढळला असतां **बुडतें हें जग देखवेना डोळा। ह्मणोनि कळवळा येत असे** ॥ या न्यायानें त्याच्या घरीं जावें, तो नको नको म्हणत असतां व तिरस्कार करीत असतांही त्याचे कानीं कपाळीं ओरडून त्यास सदुपदेश करावा, चोर चोरी करण्यास आले असतां त्यांना मारहाण न करितां उलट राहिलेलें द्रव्य त्यांच्या स्वाधीन करून पश्चात्तापानेंच त्यांना ताळ्यावर आणावें, या गोष्टीस अनुसरून पंतांनीं म्हटलें आहेः—**रीति न कोणाची ही या अति सरळ रीतिशीं तुकली ॥ साधु ह्मणे तस्करहो घ्या तुमची एक आंगठी चुकली ॥ १ ॥** नाथमहाराजांच्या या वर्तनावर व पंतांच्या या स्तुतिस्तोत्रावर पुष्कळ लोकांचा असा आक्षेप आहे कीं, वरील रीतीनें कुमार्गास उत्तेजन येऊन समाजांत अनीति वाढते. परंतु एकंदर समाजाकडे अवलोकन केलें असतां व्यवहारांत असें दिसून येतें कीं, एखाद्या मनुष्यास एखाद्या विवक्षित मार्गापासून परावृत्त करणें असल्यास, त्यास शिक्षा करण्यापेक्षां लाजविण्यापासून त्यावर अधिक चांगला परिणाम होतो. त्यायोगें मनुष्य ओशाळला जाऊन पश्चात्ताप पावतो. शिवाय कोणत्याही एका विशेष प्रसंगावरून सर्वत्र लागू पडणारा सामान्य नियम करणें युक्तिबद्ध होत नाहीं. समाजांत असा साधु एखादा असणार, व त्याच्या घरांत चोरी होण्याचा प्रसंगही एखादा येणार. साधूनीं सोडून दिलें म्हणून समाजांतील इतर मंडळी चोरास सोडून देतील ही तर कल्पनाच करणें नको. जोंपर्यंत इतर लोक या बाबतींत संतांचें अनुकरण करण्यास सिद्ध होत नाहींत, तोंपर्यंत वरील आक्षेप आणण्याचें मुळींच कारण नाहीं. समाज सुधारणा व्हावी अशी नाथमहाराजांची अंतःकरणपूर्वक इच्छा होती व ती त्यांनीं बऱ्याच अंशीं शेवटास नेली. याप्रमाणें अज्ञजनांच्या आत्मोन्नतिप्रीत्यर्थ सतत चाळीस वर्षें प्रयत्न करीत असतां इ० स० १६०९ म्हणजे शके १५३१ फाल्गुन कृष्ण षष्ठीचे दिवशीं गोदातीरीं वाळवंटावर शेवटचें उपदेशपर व अध्यात्मपर कीर्तन करीत असतां खालील प्रकारें नाथमहाराजानीं उपदेश केला; व सर्व जनांच्या व विशेषें

---

१ परंतु शोधाअंतीं पैठण मुक्कामीं पुढील श्लोक नाथमहाराजांच्या समाधीवर कोरलेला आढळून आला आहेः—

करून महारमांगाच्या दुःखोद्गारांमध्यें, व करुणस्वराच्या रडण्यामध्यें, एकाएकी गोदावरींत जलसमाध घेतली. उपदेशः-**नानामतें पाखांडें। कर्मठता अतिवांडे। त्यांचीं ठेंचावीं तोंडें। हरिभजनें ॥ १ ॥ सर्वांभूतीं भगवद्भावो। हा भक्तिचा निजनिर्वाहो। धर्माचा आग्रहो। वाढणें ॥ २ ॥ सर्वांभूतीं दयाशांति। प्रतिपाळावीं वेदोक्ति। हेंचि एक निश्चिती। करणें आह्मां ॥ ३ ॥ एका जनार्दनीं। विश्वरूप गोविंद। भेद धरितो चित्तीं। निंद्याहुनी अतिनिंद्य ॥ ४ ॥** ईश्वराचें स्वरूप व्यापक आहे असें समजून नेहमीं अभेद दृष्टी ठेवणें, व नीतीनें वागणें, हा त्यांच्या उपदेशाचा मथितार्थ आहे. अंतकाल दुःखप्रद न होणें, व शेवटीं स्वेतरभेद नाहींसा होऊन लोकोपकारार्थ कळकळ बाळगणें, हें महद्भाग्य साधूशिवाय इतरांस प्राप्त होणें दुर्घटच होय. एकनाथमहाराज व जनार्दनपंत यांच्या चरित्रांत एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे ती ही कीं, जनार्दनपंताचा जन्मकाल, त्यांना झालेलें दत्तदर्शन, त्यांचा नाथमहाराजांस अनुग्रह, जनार्दनपंताचा अंतकाल, व एकनाथमहाराजांचा समाधिकाल, या पांचही गोष्टी एकाच तिथीला ह्मणजे फाल्गुन वद्य षष्ठीच्या दिवशीं घडून आल्या.

शालीवाहन पंधराशत शकीं एकागळें विंशती।
वर्षांनाम विकारि यास बरवा फाल्गून वद्याप्रती ॥
षष्ठीवासर भानु या शुभदिनीं निर्याण स्वच्छंदता।
पावे श्रीगुरु एकनाथ गुरु हा सायुज्य साम्राज्यता॥१॥

यावरून नाथमहाराजांनीं शके १५२१ वर्षांनाम संवत्सरीं फाल्गुन वद्य ६ रविवार या दिवशीं समाधि घेतली असें सिद्ध होतें. असो.

श्रीतुकाराम.

राष्ट्रांतील कांहीं विशेष गोष्टींच्या अभ्युदयास कांहीं विशेष प्रकारच्या व्यक्ति लागत असतात. अशी वस्तुस्थिति असल्या कारणानें तशा प्रकारच्या व्यक्ति कालदेशवर्तमानानुरूप उत्पन्न व्हाव्या अशी जगन्नियंत्या प्रभूची इच्छा दिसते, व त्याप्रमाणें त्याची योजनाही सृष्टीक्रमांत आढळून येते. या योजनेनुरूप श्रीशिवछत्रपति मराठी राज्याच्या, व ज्ञानेश्वरादि साधुसंत भक्तिभावाच्या व महाराष्ट्र काव्याच्या अभ्युदयार्थ महाराष्ट्र देशांत अवतीर्ण झाले. या साधुसंतांपैकींच तुकाराम महाराज हे एक होत. यांचा जन्म पुण्याजवळ देहू गांवीं मोरे आडनांवाच्या घराण्यांत शके १५३० ह्मणजे इ० स० १६०८ यावर्षी झाला. तुकोबाचा सातवा पूर्वज विश्वंभर हा भगवद्भक्तिविषयीं फार प्रख्यात होता. उद्योगधंदा करीत असतां अखंड नामस्मरण करणें, भक्तिभावानें भजन पूजन करणें, व पिढीजाद चालत आलेली पंढरीची वारी करणें, इत्यादि कर्मे तो नित्यनेमानें करीत असे. पुढें त्याच्यानें पंढरीस जावयेना म्हणून देहूंतच विठोबाची मूर्ति प्रगट झाली, व विश्वंभरानें तेथें एक देऊळ बांधून त्यांत त्या मूर्तीची स्थापना केली. त्याला हरी व मुकुंद असे दोन मुलगे होते. त्यांनीं आपल्या वडीलांचा धंदा न चालवितां एका राजाच्या लष्करांत शिपाईगिरीची नोकरी धरली. कर्मधर्मसंयोगानें त्या राज्यावर परचक्र येऊन हे बंधुवर्ग लढाईस गेले, व लवकरच धारातीर्थीं मरण पावले. त्या दोघांपैकीं हरीस विठोबा नांवाचा एक मुलगा होता. विठोबाचा पदाजी, पदाजीचा शंकर, शंकरचा कान्हया, व कान्हयाचा बोल्होबा अशी तुकोबांच्या पूर्वजांची मालिका होती. वर निर्दिष्ट केलेले सर्वजण पंढरीची वारी अखंड चालवून दुकानदारी करीत असत. बोलोबा देवघेवींत कधींही खोटें बोलत नसे. त्यास सावजी, तुकोबा व कान्होबा अशी तीन अपत्यें झालीं. पैकीं सर्वांत वडील सावजी हा प्रपंचाचा त्याग करून व वैराग्य धारण करून तीर्थाटण करण्यास निघून गेला. तुकोबा व कान्होबा यांनीं आपला वडिलार्जित धंदा चालविला. तुकोबांस लहानपणीं फारसें लिहितां वाचतां

येत नव्हतें. परंतु वंशपरंपरा भजनाचा क्रम व पुराणश्रवण त्यांच्या घराण्यांत चालत असल्यामुळें त्यांस परमार्थाचें बाळकडूच मिळालें होतें. त्यांचा पिता फार वृद्ध असल्यामुळें तेराव्या वर्षीच तुकोबांच्या गळ्यांत संसाराचें गाडें पडलें. परंतु किंचितूही न डगमगतां त्यांनीं सर्वांशीं नम्रपणानें वागून, व आपली दुकानदारी मोठ्या दक्षतेनें चालवून, मातापितरांकडून व इतर सर्व जनांकडून शाबासकी मिळविली.

थोड्याच काळानें तुकोबाचीं मातापितरें त्यांच्या वयाच्या सतराव्या वर्षी पांचसहा महिन्यांच्या अंतरानें निवर्तलीं. त्यायोगें तुकोबाचें चित्त फार विव्हळ झालें. हा प्रसंग झटला झणजे तुकोबाच्या अनुतापयुक्त भूमिकेचा केवळ प्रथमारंभच होय. यावेळीं त्यांना असें वाटूं लागलें कीं, हा संसार क्षणभंगुर व हा मायापाश विनाकारण दुःख देणारा आहे. या अशाश्वत विषयसुखसंपादनार्थ आपणास अविनाश सुखास मुकावें लागेल. ही वैराग्य-उर्मी त्यांच्या अंतःकरणांत उद्भूत झाल्यामुळें त्यांचा व्यापारधंदा पूर्ववत् चालेना. नस्ती गरीबी दाखवून कोणी एखादा जिन्नस भावापेक्षां ज्यास्त मागितला, तर तो त्यास विनधोकपणें द्यावा. उधारीचे पैसे निर्भिडपणें मागूं नये. कोणाचें अंतःकरण कडक शब्दानें दुखवूं नये, अशाप्रकारें सढळ व व्यापारास घातक असा व्यवहार चालू होऊन त्यांच्या मिळकतींत बूड चेऊं लागली. परंतु लबाड व स्वार्थसाधु लोक आपणास फसवीत आहेत, असें निर्मळ अंतःकरणाच्या तुकोबास कधींही वाटलें नाहीं. मिळकत थोडी व खर्च फार अशा अवस्थेंत काय करावें हें त्यांस सुचेना. लोकांचें कर्ज काढून उदीमधंदा केला, परंतु परिणाम पूर्वीप्रमाणेंच घडून आला. सावकारानें दिवाळें काढलें. कोठें पत राहिली नाहीं. तशांत दुष्काळ पडला. मग काय विचारावें? तुकोबांस दोन बायका होत्या. त्यांपैकीं वडील त्यांनीं स्वतः अभंगांत सांगितल्याप्रमाणें **स्त्रीही अन्न अन्न करितां मेली.** जे लोक पूर्वी त्यांस मान देत असत तेच आतां त्यांची थट्टा करूं लागले. अशा दुःखद अवस्थेंत रखडत बसण्यापेक्षां वडीलबंधुप्रमाणें गोसावी होऊन कोठें तरी तीर्थयात्रेस निघून जावें, परंतु आपण घरदार सोडून गेल्यास आपल्या आश्रित असलेलीं कुटुंबांतील गरीब माणसें निराश्रीत होऊन उघडीं पडतील व त्यांचा त्याग करणें हा आपला धर्म नव्हे, असा त्यांचा दृढ निश्चय होऊन एक नाहीं दुसरा, दुसरा नाहीं

तिसरा, असे नानाविध प्रयत्न तुकोबांनीं करून पाहिले, परंतु यश आलें नाहीं. याचें कारण त्यांनीं एका अभंगांत सांगितलें आहे. **देव भक्तालागीं करूं न दे संसार । अंगें वारावार करूनि ठेवी ॥१॥ धन द्यावें तरी अंगीं भरे ताठा । म्हणुनि करंटा करूनि ठेवी ॥२॥ स्त्री द्यावी गुणवंती नसती गुंते आशा । यालागीं कर्कशा पाठी लावी ॥३॥ तुका म्हणे मज प्रचीत आली देखा । आणीक या लोका काय सांगो ॥४॥** त्यांच्यामतें देवाचीच इच्छा तात्कालीन संसारदुःखास कारणीभूत होती. आमच्यासारख्या क्षुद्र प्राण्यांप्रमाणें अशा कठीण प्रसंगीं त्यांनीं दुःख न करितां आपल्या वर्तमान स्थितीबद्दल देवाचे आभारच मानले. **बरे झालें देवा निघालें दिवाळें । बरी या दुष्काळें पिडा केली** असे तुकाराम महाराजांचेच उद्गार आहेत.

शेवटीं त्यांनीं बैलावर मीठ, मिरच्या वगैरे जिनसांच्या गोण्या वाहण्यास सुरवात केली. परंतु मुदलाचाच ठिकाण नाहीं, तर नफा कोठून ? कारण त्यांच्या अंतःकरणांतिल आपपरभाव नाहींसा होऊन सर्वांभूतीं एकच परमात्मा भरला आहे, अशी वृत्ति झाल्यामुळें गिऱ्हाईक मागेल तो भाव, सांगेल तें माप, देईल ते पैसे, उधार मागितलें तर उधार, हात घालून नेलें तरी हरकत नाहीं, अशी तऱ्हा झाली. त्यांच्या दुसऱ्या कुटुंबाचें नांव जिजाई ऊर्फ अवलाई असें होतें; ती जरी स्वभावानें कर्कशा होती तरी ती महापतिव्रता होती. तिनें नवऱ्याबरोबर पुष्कळ संकटें सोशिलीं, परंतु आतां तिच्यानें धीर धरवेना. घरीं पोरवडा पुष्कळ, व प्राप्ति थोडी अशा कठिण अवस्थेंत तिला प्रपंच करणें महत्प्रयासाचें होऊं लागलें. तशांत आपल्या नवऱ्याच्या अशा विलक्षण वृत्तीमुळें जनांत होत असलेला अपमान तर तिला मुळींच सहन होईना. म्हणून तिनें आपल्या नांवानें एका सावकारास रोखा लिहून देऊन दोनशें रुपये कर्जाऊ काढले, व बरोबर कांहीं सोबती देऊन त्यांच्या मतानें धंदा करा, व जपून पैसे आणा, असें तुकोबांस निक्षून सांगून तिनें ते रुपये त्यांच्या हवाली केले. त्याचें मीठ खरेदी करून तुकोबा सोबत्यांबरोबर खेप घेऊन गेले. सोबती सदुणी मिळाल्यामुळें त्यांस सवाईचा नफा झाला. परत वाटेनें येत असतां एक उघडा बोडका कर्जबाजारी ब्राह्मण, एका शिपायाच्या तावडींत असलेला, त्यांना भेटला व आपली कर्मकथा सांगून

भिक्षा मागूं लागला. त्या सोबत्यांपैकीं कांहींजणांनीं त्यास गाली-प्रदानें दिली, कांहींनीं झिडकारून लावलें, व कांहींनीं पै पैसा देऊन त्याची बोळवण केली. परंतु तुकोबांचें अंतःकरण मात्र बेंबीच्या देंठापासून कळवळलें. त्यांनीं आपल्या जवळचे अडीचशेंचे अडीचशें रुपये त्याच्या पदरांत घालून त्यास एकदम ऋणमुक्त केलें, व आपणही पैसे संभाळण्याच्या त्रासांतून मुक्त झाले. भूतदयेचें किती ढळढळीत उदाहरण आहे हें ! भूतदया असणें हें साधूंचें स्वाभाविक लक्षण होय. परमार्थरूपी उदीम करण्यास भूतदयेचें भांडवल संत व्यापाऱ्यांस अवश्यमेव पाहिजे. **भूतांची दया हें भांडवल संता । आपुल्या ममता नाहीं देहीं ॥ भूतदया ठेवा मग काय उणें । प्रथम साधन होंचि असे ॥** इत्यादि तुकोबांच्या वचनांवरून भूयदया हें परमार्थ संपादनार्थ प्रथम साधन होय. या साधनाच्या अभावीं पुढील मार्गक्रमण अति दुर्घट होय, असा तुकोबांचा निश्चय होता म्हणून त्यांनीं आपल्या दुस्तर संसारदुःखसागरास न जुमानतां लोकोपकाराचीं कामें करण्यास सुरवात केली. असो. वरील कृत्य करून तुकोबा घरीं आल्यावर त्यांच्या व्रात्य कुटुंबानें व कुटील मंडळीनें त्यांच्यावर वाक्पुष्पांचा वर्षाव किती केला असेल याचा वाचकांनींच विचार करावा. कुटुंबांतील माणसांचे अन्नावांचून फार हाल होऊं लागले. संतोबा नांवाचा तुकोबाचा वडील मुलगा अशा दीन अवस्थेतच मृत्युमुखीं पडला. जसे जसे तुकोबावर दुर्निवार प्रसंग येऊं लागले, तशी तशी त्यांची वृत्ति आधिकाधिक बदलूं लागली. मनुष्य अशा प्रकारच्या विपत्तींत आला, म्हणजे त्यांच्या तापत्रयानें पोळलेल्या अंतःकरणास साधुसंतांच्या निवृत्तिपर बोधामृतावांचून व ईशस्मरणावांचून दुसरे ठिकाणीं मुळींच विश्रांति मिळत नाहीं. तुकोबांनींच म्हटलें आहे. **विश्रांतिचा ठाव । पायीं संताचिया भाव ॥** अशा प्रसंगीं साधुसंतांच्या वचनांचा भावार्थ तुकोबांस प्रत्यक्ष अनुभवानें कळून आला. **संसार दुःखमूळ । चहूंकडे इंगळ । विश्रांति नाहीं कोठें । रात्रंदिवस तळमळ ॥** या तुकोबांस अवगत असलेल्या श्रीज्ञानेश्वरांच्या वचनावरून संसार किती दुःखप्रद आहे, गरीब व सत्वस्थ माणसास नुसतें पोट भरणेंच किती दुर्धर आहे, हें त्यांना चांगलें कळून आलें. ज्या समाजांत आपणास वागावयाचें त्या समाजाचीं नीतिमत्ता

समूळ नाहींशी होऊन ईश्वराची भीति मुळींच बाळगण्यांत येत नाहीं. आपलें जीवित किती क्षणभंगुर व त्याच्या रक्षणार्थ किती तरी लबाड्या व घातपात इत्यादि कल्पना त्यांच्या मनांत येऊन इतर जनांचा मार्ग आपण स्वीकारला तर आत्म्याची अवनती खास होणार, म्हणून शेष राहिलेलें आयुष्य ईश्वरभजनांत घालवावें असा तुकोबांनी निश्चय केला. या भजनापासून त्यांनीं निवृत्त व्हावें म्हणून नानाप्रकारच्या लोकांनीं नानाविध बुद्धिवाद तुकोबांस सांगितलें. परंतु तुकोबा हे असामान्य पुरुष होते. '**युगांतें चलते मेरुः कल्पांते सप्तसागराः । साधवः प्रतिपन्नार्थान्नचलेन्ति कदाचन**' या संस्कृत कवीच्या उक्तीप्रमाणें ते तिळमात्रही सन्मार्ग रेषेपासून ढळले नाहींत. आपण व्यापार धंद्यास निरुपयोगी, कुटुंब पोषणास असमर्थ, व जनांच्या तिरस्कारास पात्र झालों हें त्यांना पक्केपणीं कळून आलें. यावेळीं त्यांचें वय केवळ ४१ वर्षांचें होतें. ज्या संसार साधनार्थ कित्येक लोक हजारो गरीब व निरपराधि लोकांच्या मुंड्या मुरगळून त्यांचे संसार धुळीस मिळवितात तो संसारच करणें नको, अशी तुकोबांस उपरति होऊन व **पुनर्वित्तं पुनर्मित्रं पुनर्भार्या पुनर्महि । एतत्सर्वं पुनर्लभ्यं न शरीरं पुनः पुनः** ॥अर्थः– द्रव्य, मित्र, स्त्री, व राज्य हीं सर्व नाशाप्रत पावलीं असतां पुनः प्राप्त होतात, परंतु सर्व पुरुषार्थांच्या साधनांचें कारण जें शरीर तें मात्र नाशाप्रत पावलें असतां पुनश्च मिळणार नाहीं. शिवाय आयुष्याचा कांहीं भरंवसा नाहीं. संसार–प्रपंच करून नंतर परमार्थ करूं म्हटलें तर आयुष्य आपल्या स्वाधीन नाहीं **वृद्धपणीं सेवा करूं । आयुष्य काय आज्ञाधारू** सांप्रत प्राप्त झालेलें आरोग्य व सामर्थ्य हीं शेवटपर्यंत सारखीं टिकतील असाही विश्वास मानतां येत नाहीं. **जोंवरी काळ दुरी ठेला । तोंवरी हरिगुण गाये ऐके वहिला** असा दृढ निश्चय करून त्यांनीं एकांतवास सेवन केला. त्यांचा धाकटा बंधु कान्होबा, यानें तुकोबांस पुष्कळ विनवून परत देहूस आणिलें, व इंद्रायणीच्या कांठीं देण्याघेण्याच्या खतापत्रांची वांटणी केली. **कोठेंही चित्तासी नसावें बंधन । हृदयीं नारायण आठवावा** असें ह्मणून तुकोबांनीं आपल्या वांट्यास आलेलीं खतें-पत्रें इंद्रायणी नदींत बुडाविलीं; व देहूजवळ दोन कोसांवर पश्चिमादि-शेस असणाऱ्या भंडारा नांवाच्या डोंगरावर बसून भजन करण्याचा

क्रम आरंभिला. त्यांची बायको जिजाई ही जरी स्वभावानें कडक होती तरी तुकोबांस भोजन घातल्याशिवाय ती कधींही अन्नग्रहण करीत नसे. तिची आपणाविषयीं इतकी निष्ठा पाहून, तिच्या कडक स्वभावाकडे लक्ष्य न देतां ते तिच्याशीं प्रेमानें वागत असत. पुढें तुकोबांनीं आपल्या पूर्व नानें बांधलेल्या विठोबाच्या देवळाचा जीर्णोद्धार करून तेथें भजन कीर्तनाचा सपाटा चालाविला. भजनकीर्तनाच्या अभंगांत त्यांनीं पावलोपावलीं आत्मपरीक्षण व वृत्तिनिरीक्षण करीत असावें.

कामक्रोध आड पहाडे पर्वत । राहिला अनंत पलीकडे ॥
नुलंधवे मज न सांपडे वाट । दुर्घट हा घाट वैरियांचा ॥
मन माझें चंचळ न राहे निश्चळ । घडीएक पळ स्थीर नाहीं

नित्य अभ्यासानें तुकोबांच्या वृत्तींत पुष्कळ फरक पडला. साधुसंतांचीं वचनें, शास्त्रें, पुराणें व वेदांत या सर्वांमधून त्यांनीं एकच प्रमेय शोधून काढलें; व तें आपल्या अभंगांत निवेदन केलें. **जनीं जनार्दन । संत बोलती वचन ॥ जगीं जगदीश । शास्त्रें वदती सावकाश ॥ विश्वीं विश्वंभर । बोले वेदांताचा सार ॥** मनुष्य, पशु, पक्षी, इत्यादि सर्व प्राणी त्यांना आत्मवत् भासूं लागले. **तुका ह्मणे जें जें भेटे । तें तें वाटे मी ऐसें ॥** त्यांनीं एका शेताची राखण करण्याचें पत्करिलें असतां दाणे टिपण्यास येणाऱ्या पांखरांस ते मुळींच उडवीत नसत. कोणी साधुसंत भेटले असतां **अवघा भार वाटे देवा । संत सेवा न करितां ॥** असें म्हणून त्याची एकनिष्ठपणें सेवा करावी. कीर्तनास आलेल्या संतांचीं पायतनें लोकलज्जेस न जुमानतां, कडेवर व खांद्यावर घेऊन रक्षण करावीं.

संत जाती हरिकीर्तना । त्यांच्या वाहीन मोचे वाहणा ॥
संताच्या पादुका घेईन मोचे खांदी । हातीं टाळ दिंडी नाचेन पुढें ॥

कोणी थकलेला वाटसरू भेटला असतां आपण त्याचें ओझें घ्यावें, त्यास उतरण्यास देऊळ अगर धर्मशाळा दाखवावी. एखाद्यास शिधासामुग्री नसल्यास ती त्यास हरप्रयत्नानें पैदा करून द्यावी. कोणी कांहीं काम सांगितलें तर तें लागलीच निमूटपणें व निरपेक्ष बुद्धीनें करावें. आपणाजवळची कोणतीही वस्तु कोणीही मागितल्यास ती त्यास तत्काल द्यावी. एके दिवशीं त्यांची बायको आवली ही आपुलें लुगडें गुंडाळून ठेवून आपण स्नानास गेली होती व

तुकोबा हे बाहेर नामस्मरण करीत बसले होते. इतक्यांत एक गरीब महारीण तेथें आली, व तुकोबांस लुगडें मागूं लागली. तेव्हां त्या भूतमात्रांच्या सत्यमित्रानें लागलीच तें लुगडें तिला देऊन आपण कोणीकडे निघून गेले. **तरीच संत ह्मणवावे । नेणें आपुले परावें ॥** या त्यांच्या वचनाप्रमाणें त्यांचें वर्तन किती तंतोतंत होतें! एकदां ते वाटेनें चालले असतां पुष्कळ डांस त्यांच्या अंगावर एकदम येऊन बसले. ते तुकोबांनीं उडविलें नाहींत. इतकेंच नव्हे तर ते अंगावरून उडून जातील ह्मणून पुढें पाऊलही टाकलें नाहीं. कांहीं वेळानें त्यांच्या ओळखीचे लोक येऊन त्यांनीं ते महत्प्रयासानें उडविलें. तसेंच देहुहून ते आळंदीस जात असतां वाटेंत एका शेतांत पक्षी दाणे टिपीत होते ते यांना पाहून उडून गेले. त्यायोगें तुकोबांस फार वाईट वाटून, जेव्हां ते पक्षी पूर्ववत् येऊन दाणे खातील तेव्हांच येथून हालेन असा निश्चय करून तेथेंच तटस्थ उभे राहिले. नंतर कांहीं वेळानें ते पक्षी पूर्ववत् दाणे टिपूं लागले इतकेंच नव्हे तर तुकोबाच्या तटस्थपणामुळें त्यांच्या अंगावर बिनधोक येऊन बसले. या गोष्टींचें पुष्कळांस आश्चर्य वाटेल, परंतु यावरून इतकें स्पष्ट होईल कीं, सर्वत्र समदृष्टीचे वर्म आपल्या स्वाधीन व्हावें अशी तुकोबांची अंतःकरणापासून कळकळ होती. प्राणीमात्रांबद्दल अंतःकरणांत असलेला भिन्नभाव नाहींसा होऊन सर्वत्र शुद्धबुद्ध असें एक आत्मतत्व भरलें आहे, हा सिद्धांत अनुभवण्याची त्यांची फार इच्छा होती; व त्याप्रमाणें त्यांना अवस्थाही प्राप्त झाली होती. त्यांनीं या स्थितीबद्दल देवाजवळ मागणेंही मागितलें होतें. **जिकडे पाहे तिकडे देव ॥ ऐसा भाव दे कांहीं ।** असो वरील सर्वभूतीं समता प्राप्त व्हावी ह्मणून खालील अभंगांत त्यांनीं म्हटलें आहे. **अवघीं भूतें साम्या आलीं । देखिलीं म्यां कैं होतीं ॥ विश्वास तो खरा मग पांडुरंग कृपेचा ॥** याप्रमाणें लोभमूल संसारापासून शुद्ध परमार्थापर्यंत, जितक्या अवस्था व जितक्या पायऱ्या आहेत तितक्यांचा अनुभव घेऊन आपल्या प्रत्येक अवस्थेचें वर्णन त्यांनीं अभंगांत स्पष्टपणानें केलें आहे. ही तुकोबांची अत्मोन्नत्तिप्रित्यर्थ खटपट चालली असतां स्वतःच्या चित्तशुद्धीसाठीं व ब्रह्मतत्वाचा बोध होण्यासाठीं त्यांनीं ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, योगवासिष्ठ, अमृतानुभव इत्यादि अध्यात्मग्रंथांचा स्वसाह्यानें भांडारपर्वतावर एकांतीं बसून चांग-

लाच व्यासंग केला. नामदेव, कबीर इत्यादि साधुसंतांच्या अभंगांच्या वह्या त्यांनीं महत्प्रयासानें पैदा करून त्या अगदीं मुखोद्गत करून टाकल्या. **कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें। विश्वासें आदरे करोनिया** असें तुकोबाच मोठ्या नम्रतेनें म्हणतात. त्याची बुद्धि जात्या तीव्र व स्मरणशक्ति अति उत्कृष्ट असल्यामुळें त्यांचा हेतु लवकरच तडीस जाऊन अखेरीस ते सर्व महाराष्ट्रांत पहिल्या प्रतीचे कीर्तनकार म्हणून प्रसिद्धीस आले. याप्रमाणें पूर्वकालीन साधूंच्या महाराष्ट्र वाङ्मयाचा तुकोबांस निदिध्यास लागला असतां एके दिवशीं त्यांना स्वप्न पडलें, तें त्यांनीं एका अभंगांत वर्णन केलें आहे. **नामदेवें केलें स्वप्नामाजीं जागें। सवें पांडुरंगें येऊनिया ॥१॥ सांगितलें काम करावें कवित्व। वावगें निमित्त बोलों नये ॥२॥ माप टाकी सळ धरोनि विठ्ठलें। थापटोनि केलें सावधान ॥३॥ प्रमाणाची संख्या सांगे शतकोटी। उरलें शेवटीं लावीं तुका ॥ ४ ॥** वाल्मिकीनें शतकोटी रामायण केलें त्याप्रमाणें मी शतकोटी अभंग करीन, असा पूर्वी नामदेवानें निर्धार केला होता **येऊनियां नामा विठ्ठलासी म्हणे ॥ केलें रामायण वाल्मिकानें ॥ १ ॥ करीन मी तुझे शतकोटी अभंग ॥ बोले पांडुरंग ऐके नाम्या ॥ २ ॥ तये कालीं होती आयुष्याची वृद्धी ॥ आतांची अवधी थोडी आहे ॥३॥** नामदेवांनीं असा पण केला खरा परंतु एवढी संख्या पुरी होण्यापूर्वीच त्यांचें देहावसान झालें. तेव्हां **एकावन्न लक्ष पांच कोटी जाण ॥ शेष राहिलें बोलणें** तें तूं पुरें करावें अशी पांडुरंगानें आज्ञा केली. हें स्वप्न त्या भाविक भक्तानें सत्य मानून कवित्व करण्यास सुरवात केली. तुकोबांची अभंगवाणी खरोखरच प्रासादिक होय. त्यांनींही म्हटलें आहे **नामदेवा पायीं तुक्या स्वप्नीं भेटी ॥ प्रसाद हा पोटीं राहिलासे ॥**

कीर्तनांत स्वरचित अभंगांचा उपयोग होत असल्यामुळें जितक्या प्रमाणानें तुकोबांची कीर्ति वाढूं लागली तितक्याच किंवा त्याहून ज्यास्त प्रमाणानें त्यांचा छळही होऊं लागला. परंतु त्यांनीं त्याची मुळींच पर्वा केली नाहीं. **माझी आतां लोक सुखें निंदा करूं ॥ म्हणती विचारू सांडियेला ॥** नेहमींच्या ठरावाप्रमाणें तुकोबाच्या वेळींही छळ करणाऱ्यांमध्यें ब्राह्मणांची संख्या

फारच होती. मंबाजी नांवाचा एक ब्राह्मण गोसावी देहूंत वास्तव्य करीत होता. त्यास तुकोबांचा उत्कर्ष सहन न होऊन, कांहीं तरी कुरापत काढावी म्हणून, तुकोबाच्या नेहमींच्या जाण्यायेण्याच्या रस्त्यावर त्यानें एक लहानशी बाग लावून तिच्या सभोंवतीं कांट्या लाविल्या. एकादशीस देवाच्या प्रदक्षिणेस जाणाऱ्या लोकांस त्रास होऊं नये म्हणून तुकोबांनीं वाटेवरील कांट्या काढून एके बाजूस ठेवल्या. तें पाहतांच मंबाजीनें त्याच कांट्या घेऊन तुकोबांस आपले हात थकेपर्यंत झोडपलें. परंतु तोंडावाटे एक शब्दही न काढतां तुकोबा तसेच मार खात उभे राहिले व हा क्रोधास जिंकावयाचा सुप्रसंग आहे असें समजून आनंद मानू लागले. **तुका ह्मणे क्रोधा हातीं । सोडवूनि घेतले रे ॥** व तो घरीं गेल्यावर त्याच्या घरीं जाऊन त्यास नमस्कार करून त्याचें अंग रगडीत बसले व ह्मणाले 'मी जर कांट्या काढल्या नसत्या तर स्वामीस इतका मारण्याचा शीण कां झाला असता. ' यावरून त्यांची वृत्ति किती निरभिमान व सहनशील बनली होती हें वाचकांच्या पूर्ण लक्ष्यांत येईल.

एके समयीं लोहगांवांत एका संन्यास्यानें तुकोबांचें कीर्तन ऐकलें. त्या कीर्तनांत तुकोबांनीं जपतपादि साधनांची व्यर्थता प्रतिपादन करून ज्ञानेश्वरांचा एक अभंग ह्मणून दाखविला. **जपतपादि साधन । केलीं व्रतें चांद्रायण । परि स्थीर राहेना मन । माझा बाळ छंदु ॥** कष्टप्रद साधनांचा त्याग करून भगवन्नामरूपी स्वल्पसाधनाचा सर्वांनीं अवलंब करावा असा उपदेश केला. **नामा परते जगीं साधन सोपें नाहीं । आवडीनें गाई सर्वकाळ॥** तो बोध ऐकून त्या कर्मठ संन्यास्याची तळव्याची आग मस्तकास गेली त्यानें पुण्याचे मोकाशी दादोजी कोंडदेव यांस तुकोबांना शिक्षा करण्यास विनंति केली. तुकोबास बोलावून आणून, दोघांचा वाद-विवाद करवून जो वादांत हरेल त्यास शासन करीन असें दादोजीनें सांगितलें तें त्या ब्राह्मणास मान्य झालें. तुकोबांनीं पुण्यास जाऊन कीर्तन केलें तेव्हां दादोजी, संन्यासी, व इतर पुष्कळ मंडळी हजर होती. तुकोबांचा रसाळ व भक्तिप्रेमानें परिप्लुत असा सद्बोध श्रवण केल्यावर, व त्यांचें वैराग्य दृढतर आहे असें प्रतीत झाल्यावर, त्या संन्याशाची कीर्तनांतच चित्तवृत्ति पालटून भक्तिमार्ग हा सरोसरच कैवल्यप्रद आहे अशी त्याच्या मनाची खात्री झाली.

व निराभिमान होऊन तो तुकोबाच्या चरणीं लागला. दादोजी त्यास शिक्षा करूं लागले. परंतु तुकोबांनीं मध्यस्थ होऊन त्यास सोडविलें. या प्रसंगीं तुकोबांनीं केलेल्या अभंगांपैकीं दोन येथें देतों. **कुटुंबाचा केला त्याग । नाहीं राग जंव गेला ॥१॥ भजन तें वोंगळवाणें । नरका जाणें चुकेना ॥ २ ॥ अक्षराची केला आटी । जरी पोटीं संतनिंदा ॥ ३ ॥ तुका ह्मणे मागें पाय । तया जाय स्थळासी ॥ ४ ॥** कुटुंबाचा त्याग करून जर राग गेला नाहीं, व अक्षरांची आटाआटी करीत असतां जर अंतःकरणांत संतनिंदा असेल तर त्या भजनापासून नरकवास चुकणार नाहीं. **ब्रह्मनिष्ठ काडी ॥ जरी जीवा नांवें मोडी ॥ १ ॥ तया घडली गुरुहत्या ॥ गेला उपदेश तो मिथ्या ॥२॥ सांगितलें कानीं ॥ रूप आपुलें वाखाणी ॥ ३ ॥ भुतांच्या मत्सरें ॥ ब्रह्मज्ञान नेलें चोरें ॥ ४ ॥ शिकल्या सांगे गोष्टी ॥ भेदक्रोध वाहे पोटीं ॥ ५ ॥ निंदास्तुति स्तवनीं । तुका ह्मणे वेंची वाणी ॥६॥** ब्रह्मनिष्ठ होऊन जरभूतमात्रांचा धिक्कार केला तर त्याला गुरुहत्येचें पातक लागून त्यास केलेला उपदेश व्यर्थ होतो. आपलीच वाखाणणी करून जो प्राणीमात्रांचा मत्सर करितो, त्यास उपदेश केलेलें ब्रम्हज्ञान चोरीस जातें. असा मनुष्य मनांत भेदक्रोधादि वागवून मुखानें मात्र शिकलेल्या गोष्टी सांगतो व लगेच निंदास्तुतिही करतो. चित्तशुद्धी न होतां जे सन्यासी बनतात अगर कोरडे ब्रम्हज्ञानी होतात, ते भवसागर तरून जाण्यास अगदीं असमर्थ आहेत, हें तुकोबांनीं निक्षून सांगितलें आहे. कीर्तनांत स्वरुत अभंगांचा उपयोग होऊं लागल्यामुळें पुष्कळ लोकांची तुकोबावर श्रद्धा बसून त्यांची कीर्ति सर्वतोमुख झाली. हे पाहून पुष्कळ ब्राह्मण लोकांस फार वाईट वाटूं लागले. त्यांपैकींच रामेश्वरभट्ट नांवाचा सहाशास्त्र पारंगत व दुरभिमानी असा एक कर्मठ ब्राह्मण होता. त्याला तुकोबांचें कीर्तितेज सहन न होऊन त्यानें दिवाणाकडून तुकोबास गांवांतून हांकून लावण्याविषयीं हुकूम करविला. तुकोबा त्याकडे जाऊन विनंति करूं लागले व सांगितल्याप्रमाणें वागण्याचें त्यांनी कबूल केलें. त्यानें सांगितलें कीं वेदवचनांचा अर्थ बोध न करणारी कविता त्वां करूं नये; व आजपर्यंत लिहून ठेविलेलें कवित्व आपल्या हातानें पाण्यांत नेऊन बुडवावें. तुकोबांनीं वचन

दिल्यावरून, देवाज्ञेनें केलेलें कवित्व मोठ्या कष्टानें बुडविलें व पुढें ही कवित्व करण्याचे बंद केलें. आपला परमार्थ व इतर जनांच्या आत्मोन्नति-प्रीत्यर्थ होत असलेला प्रयत्न विस्खळल्यामुळें त्यांना फार वाईट वाटलें; व अन्नपाणी वर्जून देवालयांत निजून राहिलें. यावेळेस त्यांच्या तोंडांतून उद्गार निघाले ते वीस अभंग आहेत. त्यांपैकीं एकच येथें देतोः—**करूं कवित्व काय नाहीं आतां लाज। मज भक्तराज हांसतील ॥ १ ॥ आतां आला एक निवाड्याचा दिस। सत्याविण रस विरसला ॥ २ ॥ अनुभवावीण कोण करी पाप। रितेचि संकल्प लाजवावे ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां न धरवें धीर ॥ नव्हे जीव स्थीर माझा मज ॥ ४ ॥** शेवटीं तेरावे दिवशीं 'उदईक वह्या वर निघतील' असा तुकोबास व कांहीं भाविक लोकांस दृष्टांत झाला. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं घडून आल्यावर सर्व लोकांस मोठा आनंद झाला. ही बातमी तुकोबांस कळतांच त्यांनीं डोळे उघडले व सात अभंग ह्मटले, त्यांपैकीं एका अभंगाचें एकच चरण देतोः— **चुकी जाली एक वेळा मजपासूनि चांडाळा। उभें करोनिया जळामाजी वह्या राखिल्या ॥** पुढें चमत्कार असा झाला कीं तोच रामेश्वरभट्ट एके दिवशीं पुण्यास आला; व भवानी पेठेंत अंगडशा नांवाच्या फकीराच्या अद्याप दृष्टीस पडत असलेल्या विहिरींत तो फकीर नको नको म्हणत असतां स्नानास गेला. पुढें त्या फकीराच्या शापानें त्याच्या अंगाचा दाह होऊं लागला. त्याच्या शमनार्थ तो आळंदीस जाऊन ज्ञानेश्वराजवळ धरणें घेऊन बसला. तेथें त्याला देहूस तुकोबांकडे जावें असा दृष्टांत झाला. त्याबरहुकूम तो नाइलाजास्तव देहूस गेला. त्यास तुकोबांनीं निर्मत्सर बुद्धीनें एकच अभंग दिला. तो वाचतांच रामेश्वरभट्टाची वृत्ति तल्लीन होऊन त्याचा दाह शांत झाला. तो अभंगः—**चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती ॥ व्याघ्रही न खाती सर्प तया ॥ १ ॥ विष तें अमृत आघात तें हीत ॥ अकर्तव्य नीत होय त्यासी ॥ २ ॥ दुःख तें देईल सर्व सुख फळ ॥ होतील शीतळ अग्निज्वाळा ॥ ३ ॥ आवडेल जीवां जीवाचिये परी ॥ सकळां अंतरीं एक भाव ॥ ४ ॥ तुका ह्मणे कृपा केली नारायणें ॥**

जाणिजे तें येणें अनुभवें ॥ ५ ॥ रामेश्वरभट्ट तुकोबांच्या चौदा शिष्यांपैकीं एक पट्टशिष्य झाला व तुकोबांच्या स्तुतिपर त्यानें अनेक अभंगही केले आहेत. तुकोबांचे चौदा शिष्य म्हणजे समुद्रमंथनांतील केवळ चौदा रत्नेंच होत. त्यांचें तुकोबावरील अकृत्रिम प्रेम व निस्सीम श्रद्धा केवळ अवर्णनीय होय. तुकोबांनीं प्रत्यक्ष असा कोणाचाही गुरुपदेश घेतला नाहीं. एके दिवशीं माघ शुद्ध दशमीस त्यांना स्वप्न पडलें कीं, ते गंगास्नानास जात असतां वाट चुकले, तेव्हां एका संन्याशानें त्यांना हाक मारून उलट मार्गानें जावयास सांगितलें. हा आपला मार्गदर्शक ह्मणून गुरू आहे असें समजून तुकोबांनीं त्याच्या चरणावर मस्तक ठेवलें. ते खालीं वांकले नाहींत तोंच त्या संन्याशानें मस्तकावर हस्त ठेवून रामकृष्ण नामाचा मंत्र सांगितला. तुकोबांनीं संप्रदाय विचारला तेव्हां राघवचैतन्याचा शिष्य केशव चैतन्य व त्यांचा शिष्य मी बाबाजी चैतन्य असें उत्तर मिळालें. गुरूनीं भोजनास पावशेर तूप मागितलें तेव्हां तुकोबा त्यांना घरीं घेऊन आले. परंतु अवलाई फार क्रोधाविष्ट झाल्यामुळें ते निघून गेले. याचें समग्र विवेचन त्यांनीं एकाच अभंगांत केलें आहे. तो अभंग–**सत्य गुरुरायें कृपा मज केली । परी नाहीं घडली सेवा कांहीं ॥१॥ सांपडविली वाट जातां गंगास्नाना । मस्तकीं तो जाणा ठेविला कर ॥२॥ भोजना मागती तूप पावशेर । पडिला विसर स्वप्नामाजीं ॥३॥ काय कळे उपजला अंतराय । ह्मणूनिया काय त्वरा केली ॥४॥ राघव चैतन्य केशव चैतन्य । सांगितली खूण मालिकेची ॥५॥ बाबाजी आपुलें सांगितलें नाम । मंत्र दिला रामकृष्ण हरी ॥६॥ माघ शुद्ध दशमी पाहूनि गुरुवार । केला अंगीकार तुका ह्मणे ॥ ७ ॥** एकंदर वारकरीसंप्रदायांत या अभंगाचें फार महत्व असून दर गुरुवारीं भजनामध्यें तो ह्मणावाच लागतो. व दर वर्षीं माघ शुद्ध दशमीस सर्वत्र भजनसमारंभ व भोजनोत्सव मोठ्या श्रद्धेनें करतात. याचें कारण असें कीं, त्या कालच्या प्रचलित गुरूमार्गावर तुकोबांची मुळींच श्रद्धा नव्हती. व **गुरूमार्गामुळें भ्रष्टलें सकळ; तुका ह्मणे ऐसे गुरुशिष्य जाण । विठोबाची आण नरका जाती.** इत्यादि गुरुमार्ग खंडनार्थ त्यांनीं अनेक अभंग केले आहेत. परंतु **मानियेला**

स्वप्नीं गुरूचा उपदेश व **बाबाजीनें स्वप्नीं येऊनि तुकयाला । उपदेश केला रात्रीमाजी ।** इत्यादि वचनांवरून वरील स्वप्नाचा त्यांच्या वृत्तीवर चांगलाच परिणाम झाला होता असें दिसून येतें. तुकोबांच्या या गुरूपदेशाच्या पूर्वकालीन अभंगांत द्वैतभक्तीचें व उपासना मार्गाचें प्राधान्य दिसून येतें. परंतु उपदेशोत्तर सर्व अभंग अभेदभक्ति व विश्वात्मक देवाचें व्यापक स्वरूप प्रतिपादन करितात. असो. पूर्वीची परमार्थ विषयक तळमळ समूळ नाहींशी होऊन **भीत नाहीं आतां आपुल्या मरणा** व **मरण माझें मरोनि गेलें । आम्हां केलें अमर** इत्यादि अनेक निर्भय वचनांच्या द्वारें त्यांना पूर्णता वाटूं लागली. ह्या कालपर्यंत तुकोबांचे पुष्कळ टाळकरी शिष्य झाले होते. त्यांपैकीं गंगाराम मवाळ यानें दरवर्षी गुर्वाज्ञेवरून माघ शुद्ध दशमीस ब्राह्मण भोजन घालण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें प्रत्येक वर्षी त्याचा नेम चालला असतां, कर्मधर्मसंयोगानें तुकोबा त्याच्या घरीं येण्यास व माघ शुद्ध दशमीचे दिवशीं त्याचा एकुलता एक मुलगा देवीनें मरण्यास एकच गांठ पडली. गुरूमहाराज कधीं घरीं येणारे नव्हेत, व आज ते आले तर हा असा भयंकर प्रसंग ओढवला. त्या गुरूभक्तानें तें प्रेत, व तज्जन्य होणारें दुःख एके बाजूस ठेवून भोजनाची सर्व तयारी केली. परंतु हें सर्व धर्म–बाह्य कृत्य शेजारच्या एका ब्राह्मणानें अवलोकन केलें होतें. त्यानें असा बेत केला कीं सर्व वाढणें झाल्यावर मंडळी जेवावयास बसते वेळीं ही हकीगत उघड करून गंगाजीची गुरूसमवेत फजिती करावी. **चालनीरिव दुर्जन** किंवा **संता पीडिती चांडाळ । दुराचारी अमंगळ** असो. आतां सर्व मंडळी भोजनास बसणार इतक्यांत तुकोबांनींच गंगाजीस मुलास जेवावयास बसविण्यास सांगितलें. गंगाजीनें पुष्कळ टाळाटाळी केली, तेव्हां गंगाजीनें मुलास जेवावयास बसविलें तरच अन्नग्रहण करावयाचें, नाहीं तर करावयाचें नाहीं असा तुकोबांनीं निश्चय केला. नंतर गंगाजीनें निरुपायास्तव खोली उघडून तें प्रेत दाखविलें. तुकोबांनीं शिष्यास झटलें ' तूं आपल्या गुरूभक्तीची तर कमालच केलीस, आतां आमच्या मात्र साधूत्वाची परिक्षा राहिली. ' असें म्हणून विठ्ठलाचा धांवा केला, व तें मूल जिवंत झालें. त्यावेळेस तुकोबांनीं गंगाजीस असा आशीर्वाद दिला कीं आतांपासून पुढें तुझ्या वंशांत देवी येणार नाहींत, व माघ शुद्ध दशमीस क्षय अगर वृद्धी अगदींच

येणार नाहीं. ही कथा खरी असो वा खोटी असो परंतु अद्यापि **कडूस मुक्कामीं** मवाळाच्या घराण्यांत देवी येत नाहींत. तुकोबांची व गंगाजीची योग्यता या दंतकथेवरूनच जाणावयाची नसून, त्यांची ईश्वरविषयक निस्सीम भक्ति व अकृत्रिम प्रेम यांवरून खरी योग्यता लक्ष्यांत येण्यासारखी आहे. तुकोबांनीं कीर्तनांत व इतर ठिकाणीं कवित्वस्फूर्तीनें अभंग करावेत, व ते या गंगाजीनें व संताजी जगनाडे तेली ह्मणून दुसरा एक तुकोबांचा शिष्य होता त्यानें अतिशय कष्ट सोसून उतरून ठेवावे. आज जे, तुकोबांच्या प्रेमळ अभंगांचा सर्व महाराष्ट्रीयांस अत्युत्कृष्ट लाभ मिळत आहे, त्याबद्दल ते गंगाजी व संताजी यांचे फार फार ऋणी आहेत. याप्रमाणें चाकण, खेड, कडूस, चिंचवड, पुणें. लोहगांव वगैरे पुण्याच्या आसपास कीर्तनरूपानें पुष्कळ जनांस आपलें स्वार्थशून्य उपदेशामृत पाजण्याचा तुकोबांनीं एकसारखा क्रम चालविला. **तुका म्हणे आतां । उरलों उपकारा पुरता** हें लोकोपकाराचें महत्कार्य करीत असतां, इ. स. १६४९ ह्मणजे शके १५७१ फाल्गुन वद्य द्वादशीचे दिवशीं इंद्रायणी तीरावर कीर्तनाचा जयघोष करीत करीत नाथांप्रमाणेंच त्यांनीं जलसमाधि घेतली. त्यांनीं शेवटचे उपदेशपर अभंग पुष्कळ केले आहेत. त्यांतून एक येथें देतों. **ऐका ऐका भाकिक जन ॥ कोण कोण व्हाल ते ॥ १ ॥ तार्किकांचा टाका संग ॥ पाडुरंग स्मरा हो ॥ २ ॥ नका शोधूं मतांतरें ॥ नुमगें खरें बुडाल ॥३॥ कलीमध्यें दास तुका ॥ जातो लोकां सांगत ॥ ४ ॥** अल्पायुषी मानवी देह सत्कारणीं लावण्यास वरील उपदेश फारच महत्वाचा व फायदेशीर आहे.

लोकसंग्रह.

नाभाजीच्या भक्तमाला नामक ग्रंथांत वर्णन केलेल्या साडेसातशें वैष्णवांपैकीं बरेच वैष्णव लोक संग्राहक होते. त्यांमध्यें श्रीज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, कबीर व रामदास यांची प्रमुखत्वानें गणना होते. व त्यांहीमध्यें श्रीएकनाथ व तुकाराममहाराज यांनीं लोकसंग्रहाचीं जीं कृत्यें केलीं तीं फारच अवर्णनीय होत. या उभयतांचीं चरित्रें अवलोकन केलीं असतां असें स्पष्ट दिसून येतें कीं तत्कालीन लोकसमाजाची उन्नति करण्याचें बीदच या दोघांनीं गांठीं बांधलें होतें. ज्या समाजांत ते उत्पन्न झाले, व त्यांच्या सद्वर्तनानें अथवा दुर्वर्तनानें ज्या समाजाचें बरें वाईट होणार, त्या समाजाच्या उन्नत्ति-प्रीत्यर्थ त्यांनीं निष्कामबुद्धीनें अहर्निश प्रयत्न केले, म्हणून ते ईशरूपेनें सिद्धीस गेले. लोकसंग्रह करणें हें ज्ञानी पुरुषाचें कर्तव्य आहे असें भगवंतानीं गीतेंत म्हटलें आहे. हाच अभिप्राय अंतःकरणांत बाळगून या साधुद्वयांनीं आपला सतत वर्तनानुक्रम ठेवला; व कर्तव्य ह्मणून जीं जीं कर्मे यांनीं केलीं तीं करतेवेळीं **हें केलें तर आपल्या स्वतःस सुख होईल अगर दुःख होईल** असा विचारच त्यांच्या मनांत आला नाहीं. हें शूद्रातिशूद्र श्रोतृसमाजापुढें कीर्तनांत वेदप्रतिपाद्य धर्माचें तुकोबाकडून निरूपण होणें, व श्राद्धतिथीस ब्राह्मणाप्रीत्यर्थ करावेलेलें अन्न नाथमहाराजाकडून अंत्यजांस भोजनास मिळणें इत्यादि गोष्टीवरून चांगलें सिद्ध होईल. याच्या यथार्थतेविषयीं स्पेन्सर साहेबही आपल्या 'मानसिक तत्वांत' असें म्हणतात कीं, "नित्य अभ्यासानें कर्तव्यतत्परता उत्पन्न झाली ह्मणजे त्या त्या कर्तव्यासंबंधानें सुखदुःखाचा प्रश्नच लुप्तप्राय होतो" असो. एखादा पुरुष महाज्ञानी असला, परंतु त्यानें लोकहिताचें कोणतेंच कार्य केलें नाहीं; तर तो मनुष्य समाजदृष्ट्या निरुपयोगी किंबहुना घातकी होय. **काय रानांत आटल्या नद्या। काय तरू ह्मणति फळ न द्या** असा विचार करून व गिरिकंदरांत बसून, योगमार्गानें मीच स्वतः मुक्त होईन असें जर मोक्षार्थी ह्मणेल, तर समाज निःसत्व होऊन निःसंशय मृत होईल. दंतभग्न झालेला सर्प जसा सत्वशून्य होतो, तद्वतच श्रेष्ठशून्य समाजाची

स्थिति होय. शिवाय स्वतःस पूर्ण होण्यास ज्ञानी पुरुषास समाजांत रहावेंच लागतें. कालिदास म्हणतोः-**विकार हेतौ सति विक्रियन्ते । येषां न चेतांसि त एव धीराः**-विकार उत्पन्न करणारी परिस्थिति कायम असतांही ज्यांच्या चित्ताचा भंग होत नाहीं तेच खरे धीर होत; म्हणूनच नाथमहाराजांनीं व तुकोबांनीं आपलें अखिल आयुष्य संसारांत व समाजांत नानाविध आघात सोसून सन्मार्गानें वेंचलें. या त्यांच्या लोकसंग्रहाच्या बाबतींत दोन गोष्टी ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. (१) अमूक गोष्ट मी करितों व त्याचें फळ मला मिळालें पाहिजे ही वासना धरून जे कमाचरण करितात ते फसतात. **कर्मण्येवाधिकारस्ते माफलेषु कदाचन** अशी भगवंताची आज्ञा आहे. निस्पृहत्वानें काम केलें तर तें कर्त्यास बद्धक होत नाहीं. " कर्ता करविता पांडुरंग " हें तुकोबांचें तत्व ध्यानांत नसतें म्हणून आपण संसारसागराच्या तापत्रयलहरींत गटंगळया खात आहोंत. तुकोबा एवढें कवित्व करून वक्तृत्व दाखवीत असत, परंतु **तुका म्हणे ऐसें बोलिलें पुराणीं । नव्हे माझी वाणी पदरची** व **तुका म्हणे मज बोलविलें देवें** इत्यादि वचनांवरून स्वकृत कवित्वाच्या अभिमानाचा त्यांचे ठायीं अगदीं लेशही नव्हता असें दिसून येतें.

(२) उपदेशकांनीं उपदेश करतांना श्रोत्यांचा अधिकार पूर्णपणें लक्ष्यांत आणला पाहिजे. शिल्पशास्त्राचा उपदेश एखाद्या मजुरास केला असतां तो कितपत ठसेल बरें? जर कांहीं परिणाम झालाच तर तो **इदंच नास्ति न परंच लभ्यते** या वचनाप्रमाणें अगर **हेंही नाहीं तेंही नाहीं** या तुकोक्तिप्रमाणें व्हावयाचा. ज्ञान ही वस्तु चांगली आहे खरी, पण ती कोणाला ? समजेल त्याला. इतरांच्या व विशेषेंकरून आचारहीन वेदांत्यांच्या हातांत ती वस्तु पडली तर अनर्थच व्हावयाचे. तुकोबांनीं व नाथमहाराजांनीं **अधिकार तैसा करूं उपदेश** असें म्हणून एकंदर लोकसमूहाचा अधिकार पाहून सर्वतोपयोगी अशा भक्तिमार्गाचाच उपदेश केला. सांप्रतच्या धर्मोपदेशकांनीं व सुधारणेच्छु विद्वज्जनांनीं ही गोष्ट मुख्यत्वेंकरून ध्यानांत ठेवावी.

पंढरपूर.

पंढरीचा महिमा । नाहीं वानवया उपमा ॥१॥

तुकाराम.

येथील मुख्य आराध्य दैवत जें श्रीविठ्ठल तें मातापितरांची एकनिष्ठपणें सेवा करणाऱ्या पुंडलिकास वर देण्याकरितां प्रगट झालें. **पुंडलिका दिधला वर । करुणाकर विठ्ठलें ॥** त्या वेळेस पुंडलिकानें सन्मानार्थ फेंकलेल्या विटेवर समचरण व कटेवर दोन्ही कर ठेवून तें दैवत उभें राहिलें आहे. **विटेवरी उभा नीट कटेवरी कर । तुका म्हणे आह्मां हेंची ध्यान निरंतर ॥** अनन्यभावानें दर्शनास येणाऱ्या भक्तजनांस भवसमुद्र कंबरेइतकाच आहे असें भवलक्षण दर्शविण्याकरितांच जणूं काय कटीवर हात ठेविले आहेत. काय तो रमणीय देव ! कीं काकडआरतीच्या वेळीं देवाचें मुखावलोकन केलें असतां विषयी, पामर, मुमुक्षु, साधक व मुक्त या सर्वांचा कंठ सद्गदित झाल्यावांचून कधींही रहात नाहीं. तुकोबांनीं म्हटलें आहे. **श्रीमुख पहातां सुख सुखावलें** हेंच खरें. चंद्रभागेच्या तीरावर गेलें असतां हजारों लोक एकमेकांच्या पाया पडतांना दृष्टीस पडतात. **पंढरीच्या लोकां नाहीं अभिमान । पायां पडे जन एकमेकां ॥** सर्व लोक कपाळीं बुका लावून हातांत पताका घेऊन मोठ्या प्रेमयुक्त स्वरानें विठ्ठल नामाचा गजर करितात. त्या पताका म्हणजे शुद्ध उपासना मार्गांतील धर्मध्वज होत. जसें घरावर किंवा राज्यावर तुलसीपत्र ठेवलें असतां तें सर्व ब्राह्मणांस अर्पण करावें लागतें तसें त्या लोकांनीं आपल्या देहावर तुलसीकाष्ठमाला धारण करून सर्व देह ईश्वरार्पण केला आहे. त्याहीपेक्षां ज्यास्त हें कीं ते कामक्रोधादिक जे षड्वैरी त्यांच्यावर विवेकशस्त्रानें वार करितात म्हणून त्यांना वारकरी असें नामाभिधान प्राप्त झालें आहे. धन्य ते एकनिष्ठ उपासक कीं जे वर्णाश्रमाभिमान व धनाभिमान यांस सोडचिठ्ठी देऊन व सर्वांभुतीं भगवद्भावना धरून परस्पर पायां पडतात. नगरप्रदक्षिणेस गेले असतां चहूंकडे नामस्मरणाचा एकसारखा गजर ऐकूं येतो. सर्व क्षेत्रांत हें क्षेत्र उत्तम होय. **सकळही तीर्थें घडती एक वेळां । चंद्रभागा डोळां**

देखिलीया ॥ कारण इतर सर्व क्षेत्रीं कर्ममार्गप्रधान क्षौरादि विधि आहेत. पंढरी क्षेत्रांतील विधि कोणता हें तुकोबांनीं सांगितलें आहे. **चंद्रभागे स्नान विधि तो हरीकथा । समाधान चित्ता सर्वकाळ ॥** शिवाय कर्ममार्ग परोक्ष आहे असें विद्यारण्य स्वामींचें मत आहे. भागवतांतही एके ठिकाणीं लिहिलें आहे. **परोक्षवादो वेदोयं बालानामनुशासनं.** परंतु येथें उपासना मार्ग प्रधान आहे, व जगदीश्वराची उपासना करणें हें मनुष्यमात्रांचें कर्तव्य आहे. **कर्मिभ्यश्चाधिका भक्तिः ज्ञानिभ्यश्चाधिकामता ॥ तस्मादुपासनाकार्याचेश्वरस्य सदा नरैः** असें उपासनावली ग्रंथांत म्हटलें आहे. असें उपासनाप्रधान क्षेत्र पंढरपुराशिवाय दुसरें कोणतेंच नाहीं. **ऐसें स्थळ नाहीं कोठें । उभाउभीं विठ्ठल भेटे** असें तुकोबा म्हणतात तें खरें आहे. येथें आषाढ शु. ११ स आळंदीहून ज्ञानेश्वर महाराजांची, देहूहून तुकाराम महाराजांची, पैठणाहून एकनाथ-महाराजांची, त्र्यंबकाहून निवृत्तिनाथांची, दौलताबादेहून जनार्दनपंतांची, अरणभेंडीहून सावता माळी यांची. अशा महाराष्ट्रांतील अनेक भागांतून एकंदर जवळ जवळ वीस पालख्या येतात, व प्रत्येक पालखीबरोबर सात आठ अशा एकंदर दोनशें दिंड्या येतात. हा पालख्यांचा समारंभ ज्यांनीं लक्षपूर्वक पाहिला असेल त्यांस श्रीज्ञानेश्वर व तुकाराम महाराज या साधुपुरुषांविषयीं लोकांत किती पूज्यबुद्धि आहे हें कळल्याशिवाय राहणार नाहीं. महाराष्ट्रांतील सर्व ठिकाणचे सर्व जातीचे व सर्व धंद्यांतील लोक आपापला व्यवसाय सोडून व भिन्नपणा विसरून केवळ भक्तिभावानें या कामास प्रवृत्त होतात. पूर्वकालीन साधुसंत जिवंत असतांना पंढरीच्या यात्रेस जात असत, तो प्रकार ते मेल्यानंतरही चालू ठेवून, जसे काय ते जिवंत आहेत व यात्रेस जात आहेत असें समजून यात्रेकरू लोक त्यांच्यासमागमें यात्रा घडावी म्हणून इतके हाल सोसतात. **होतील संताचिया भेटी । सांगू सुखाचिया गोष्टी** या तुकोक्तिप्रमाणें साधु लोकांच्या परस्पर गांठी पडल्या म्हणजे प्रेम व भक्तिभाव अधिक वाढतो, हा सर्वत्र अनुभव

---

१ वरील पंढरपुरांतील पालख्यांचें वर्णन कै. न्या. रानडे यांची धर्मपर व्याख्यानें ह्या पुस्तकांतून घेतलें आहे.

आहे. हा विचार मनांत आला म्हणजे हें समाज ऐक्याचें व धर्मवृद्धीचें साधन फारच उपयोगी आहे असें दिसून येईल. दिंडीमध्यें जाती, विद्या व अधिकारपरत्वें भेद यात्रेकरू लोक मनांत न आणितां आपण सर्वजण एकाच परमेश्वराचे भक्त आहोंत असें ते जानितात. हा विचार ब्राह्मण धर्मांत नाहीं. आतां पूर्व संस्काराच्या अभिमानामुळें व तुकोबांच्या अंगीं बाणलेल्या अध्यात्म दृष्टीच्या अभावामुळें दिंडीवाले लोकांकडून जरी या मताचा पूर्ण स्वीकार होत नाहीं, तरी ते लोक परमेश्वर प्राप्तीचे मार्गास लागल्यानंतर लोक-लज्जा व संकोच या गोष्टी एकीकडे ठेवून गांवोगांवीं, घरांत, देवळांत व जेंथें सवड सांपडेल तेथें कीर्तनरूपानें लोकांस उपदेश व अध्यात्मगोष्टींची चिकित्सा करीत असतात. हा तुकोबादि संतांच्या लोकसंग्रहाचा व सुधारणेचा परिणाम होय.

चमत्कार.

एकंदर सर्व राष्ट्रांचा इतिहास पाहिला तर असें दिसून येतें कीं, आपला हा हिंदुस्तानदेश, प्राचीन काळीं फार विद्याचारसंपन्न झालेला होता. तो इतका कीं, ह्याची बरोबरी करणारीं राष्ट्रें ह्याच्या भरभराटीच्या काळीं पृथ्वीच्या पाठीवर फारच थोडी होतीं. तरी इताली, ग्रीस इत्यादि प्राचीन राष्ट्रांनीं जे आपलें इतिहास-कथन करून ठेवलें आहे, त्यांशीं तुलना करून पाहिली असतां, आमच्या राष्ट्राचा इतिहास मुळींच लिहून ठेविलेला नाहीं, असें ह्मणणें भाग पडतें. आमचीं जुनीं कथापुराणें आहेत, त्यांत इतिहासाचें एक अंग दृष्टीस पडतें खरें; परंतु त्यांत काल्पनिक गोष्टींची आणि अलंकारिक भाषणांची इतकी कांहीं मिसळ झालेली आहे कीं, त्यांतला इतिहास-खऱ्या घडलेल्या गोष्टी कोणत्या, व कल्पित गोष्टी व अलंकार कोणते-हें नीट ओळखणें चांगल्या माणसासही कठीण पडतें. हाच नियम आमच्या श्रीएकनाथ तुकारामादि साधुसंतांच्या चरित्रांस लागू पडतो. या चरित्रांस मूळ आधार ह्मणजे महिपतीचे ग्रंथ होत, व महिपती कवीचा काल जितका भोळ्या भाविक लोकांचा होता तितका तो सत्यान्वेषणाचा काल नव्हता असें दिसून येतें. यावरून

महिपतीनें आपल्या ग्रंथांत वर्णन केल्याप्रमाणें श्रीएकनाथ व तुकाराम इत्यादिकांकडून घडून आलेले चमत्कार पुष्कळांस खोटें वाटणार आहेत. परंतु मुसलमान, बौद्ध व खिस्ति आदिकरून सर्व धर्मामध्यें जे जे साधुसंत झाले त्या त्या साधूंनीं असेच अघटित चमत्कार लोकांस करून दाखवून सकल जनांच्या मनावर आपल्या धर्माचे कायमचे ग्रह उमटविले आहेत. जर महाराष्ट्रांतील साधुसंतांच्या गोष्टी खोट्या ह्मणाव्या तर येशूनें, बुद्धानें व महंमदानें ज्या ज्या अद्भुत गोष्टी केल्या आहेत त्या सर्व खोट्या कां ह्मणूं नयेत ? ग्रीस, रोम इत्यादि पाश्चात्य इतिहास जर चाळून पाहिले, तर त्यांत सुद्धां ग्रंथारंभीं अशाच प्रकारच्या तद्देशीय अघटित गोष्टींचें विवेचन केलेलें आहे. पाश्चात्यांच्या इतिहासासारख्या महत्वाच्या पुस्तकांतही जर असा प्रकार दृष्टीस पडतो; तर भाविक लोकांनीं रचलेल्या धर्मविषयक ग्रंथांत तो असला तर यांत नवल तें कोणतें ? खरा प्रकार असा आहे कीं, **चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं;** व ज्याप्रमाणें मधाचें बोट दाखवून मुलांकडून औषध खाववायाचें, त्याप्रमाणें अज्ञ व भाविक लोक, कीं ज्यांची दृष्टी साधूंच्या तत्वविचाराकडे एकदम जाऊं शकत नाहीं, त्यांच्यासाठीं ज्ञानसंपन्न व वैराग्यशलि साधूंच्या लोकोत्तर गुणाचें मंडन करावें लागतें. शिवाय सांप्रत मॅडम ब्ल्याव्हटस्कीसारख्या थिऑसाफिस्ट मंडळींनीं योग, समाधि इत्यादि चमत्कार सत्य आहेत असें प्रतिपादन करून 'ह्यूमन म्यागनेटिझम' अगर मानसिक लोहचुंबकाच्या प्रभावानें, संचारादि चमत्कार जर करून दाखवीत आहेत, तर श्रीज्ञानेश्वर एकनाथ व तुकाराममहाराज कीं ज्यांना अचिंत्य व अतर्क्य अशा परममात्म शक्तीचा पूर्णपणें अनुभव आला होता त्यांच्याकडून अशा गोष्टी घडून येणें यांत काय नवल ? ह्मटलें आहे **भिदन्ति शैलानुदधीनिबन्ति व्यत्यासयन्ति क्षितिमंतरिक्षम् । तृणीकृत ब्रह्म पुरंदराणां किं दुष्करं ब्रह्मविचारकानाम् ॥** अर्थः–सत्पुरुष दंड-मात्रानें पर्वतांचा भेद करतात, समुद्र प्राशन करितात. पृथ्वी व आकाश एक करितात. व त्यांनीं ब्रह्मेंद्रादिकांस तृणप्राय केलें आहे; यावरून ब्रह्मविचारकांना काय दुष्कर आहे.

दुसरें असें कीं श्रीएकनाथ व तुकाराममहाराज यांच्या अद्भुत गोष्टींतील प्रमेय पाहिलें असतां तें सर्व खरें आहे असें दिसून येतें आणि सर्व कथा प्रमेय दृष्टीच्याच साहायानें पाहिल्या पाहिजेत. तसें न हो-

ईल तर एकंदरींत सर्व कथा अनवस्था प्रसंगास कारण होतील. ह्मणून सर्वांनीं प्राचीन गोष्टी व इतिहासप्रमेयत्वानें अवलोकन करावें हें बरें. श्रीएकनाथ व तुकाराममहाराज यांनीं अनेक चमत्कार केले. ह्मणूनच त्यांची योग्यता मोठी होती असें कोणी समजूं नये. रस्त्यांत खेळ करून दाखविणारा गारुडीही अनेक चमत्कार करून दाखवितो, व एखादा फकीरही चौऱ्यांयशी आसनें करून दाखवून क्षणभर श्वास कोंडून धरतो; परंतु त्यांस कोणीही या साधुसंतांच्या उच्च आसनावर बसवूं शकणार नाहीं. या साधूंचे वैभव त्यांनीं केलेल्या चमत्कारांत नसून त्यांच्या ग्रंथांतील कवित्वशक्तीमध्यें व त्यांच्या अंगच्या भगवद्भक्तिमध्यें आहे. एकनाथमहाराजांस हें जग सोडून जाऊन आज जवळजवळ तीनशें वर्षें झालीं, व तुकोबांसही सुमारें अडीचशें वर्षें होऊन गेलीं तथापि ते आपल्या कीर्तीनें व अभंगवाणीनें या जगांत अमर असून त्यांनीं दर्शविलेला भक्तिमार्ग अद्याप चालू आहे.

कीर्तन.

आमच्या राष्ट्रामध्यें जें कांहीं लोकमान्य व लोकोपयोगी प्रघात आहेत, त्यांत कीर्तनाच्या प्रघाताची बरोबरी करणारा दुसरा प्रघात कोणताच नाहीं. एका कीर्तन श्रवणानें गायन, वक्तृत्व, बहुश्रुतपणा, समयसूचकता, सभाधीटपणा, विद्वत्ता, कांहीं वेळ तरी पापबुद्धिविमोचन, आणि मनोरंजन, इतक्या गोष्टींचा उपभोग उत्तम प्रकारें प्राप्त होऊन, जिच्या योगानें खरोखर जन्मसार्थक व्हावयाचें, त्या परमेश्वर भक्तीकडे अंतःकरण वळतें. ह्यापरता आणखी मोठा लाभ कोणता ! म्हणूनच पंतांनीं ह्मटलें आहे. **हरिकीर्तनीं शिरावें धनिकगृहीं जपुनि जेंवि चोरानें । बहु कार्यैहि नुठावें बहुभारें कुचर जेंवि ढोरानें.** कीर्तन हें अति आल्हादकारक व श्रोत्यांच्या मनावर ठसा उमटविणारें असें काव्येतिहासरूप वक्तृत्व आहे. त्यांत जो विषय प्रतिपादन करावयाचा त्याचें निरुपण तर होतेंच, परंतु दुसरा एक फायदा हा आहे कीं श्रोतृसमुदायांचीं मनें आकर्षण करण्यास भजनादिकांचा फारच उपयोग होतो.

शिवाय मधून मधून भगवंताचें नामस्मरण व सदाचार व नीति यांचें प्रतिपादन होतें.

वास्तविक पाहिलें असतां, कीर्तन करण्याचें काम फार कठीण आहे. कारण त्याच्या श्रवणानें जे लाभ होतात म्हणून वर सांगितलें ते सगळे लाभ आधीं कीर्तन करणाऱ्यास पूर्ण प्राप्त झालेले असले पाहिजेत. तरच ते त्याच्याठायीं भिनून, श्रोत्यांच्या अंतःकरणांत प्रवेश करतात; व श्रोता आणि वक्ता हे एकरूप होतात. म्हणूनच म्हटलें आहे **अद्भुत कीर्तनीं कैसा ओढवला रंग। वक्ता आणि श्रोता दोघे झाले पांडुरंग.** सतत चिंतनानें चित्ताचें अंतःकरण ध्येय वस्तूशीं एकरस होऊन जातें, व अनुपमेय सुखाचा लाभ होतो. **तुका म्हणे सुख देहनिरसनें। चिंतनें चिंतनें तद्रूपता.** या अप्रतिम लाभाचें मूळ कीर्तन करीत असतां देहभान विसरून जाणें हें होय. तुकोबांनीं म्हटलें आहे **ब्रह्मभूत काया होतसें कीर्तनीं। भाग्य तरी ऋणि देव ऐसा.** कीर्तनाचा गौरव करण्याकरितां हें म्हटलें आहे असें कोणास वाटेल परंतु यामध्यें त्यांनीं आपला स्वानुभव निवेदन केला आहे, व ब्रह्मज्ञानाचें व मुक्तावस्थेचें सुख याहून फारच कमी आहे. म्हणूनच त्यांनीं म्हटलें आहे **घोटवीन लाळ ब्रह्मज्ञान्याहातीं। मुक्ता आत्मस्थिति. सांडवीन। सांडवीन तपोनिधि अभिमान। यज्ञ आणि दान लाजवीन॥** यावरून हें उघड सिद्ध होतें कीं, यज्ञ, दान, तप, ब्रह्मज्ञान, फार तर काय पण मुक्तावस्था देखील कीर्तन सुखाची बरोबरी करूं शकत नाहीं. मुक्तावस्थेस या प्रकारें हीनत्व आणणें कोणास गौण वाटेल, परंतु तसें वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. मुक्तिसुख ज्याचें त्यालाच लाभतें, इतर जनांस त्याचा कांहींएक फायदा होत नाहीं. परंतु कीर्तनाचें तसें नव्हे. **कथा त्रिवेणी संगम। देव भक्त आणि नाम** या त्रिवेणीमध्यें चित्तास एकतानतारूपी स्नान घालण्याचा सर्वांस लाभ होतो. परमेश्वरभक्ति हा कीर्तनाचा जीव आहे. तो पुष्कळ आणि बळकट असला, म्हणजे कीर्तनाचे बाकीचे गुण संपादण्यास वेगळे श्रम करावे लागत नाहींत. अंगांत शक्ति चांगली असल्यावर, जोर, जोडी मलखांब व कुस्ति इत्यादि जे प्रकार आहेत ते शिकण्यास मुळींच वेळ लागत नाहीं, किंवा वेळेस ते प्रकार येत नसले तरी देखील चालतें, तसेंच हें आहे. तुकोबांच्या व नाथमहाराजांच्या कीर्तनास

भीमेच्या वाळवंटावर व गोदातटीं, हजारों लोक जमून, चित्रासारखे तटस्थ होऊन बसत असत. त्यांनीं गायनवक्तृत्वादि गुणांचा अभ्यास कधींही केला नव्हता. त्यांचें कीर्तन इतकें उत्कृष्ट होत असे यांतलि मुख्यबीज हेंच कीं, ते कीर्तनास उभे राहिले म्हणजे त्यांच्या अंतःकरणात भक्तिरस अगदीं पूर्ण भरून, शिवाय तो वरून इतका वाही कीं, त्यानें सहस्रावधि लोकांचीं अंतःकरणें भरून जात असत. सांप्रतच्या कीर्तन–पद्धतीमध्यें हा प्रकार बहुधा दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. जनांस भुलविण्यासाठीं नानाप्रकारचें रंगराग, गायन, नृत्य वगैरे बाह्य रंग हुबेहूब आणून बिदागी दहाचे ठिकाणीं वीस रुपये घ्यावयाची व आपली तुंबडी भरावयाची. कथेमध्यें सौभद्र गोपीचंद इत्यादि संगीत व हास्यकारक फार्स करावयाचे. अशा ठिकाणीं वक्त्याच्याच अंतःकरणांत प्रेम व भक्ती नाहीं तर ती श्रोत्यांच्या अंतःकरणांत कोठून व कशी प्राप्त व्हावयाची ? विवेकानंद स्वामींनीं चिकागो मुक्कामीं व्याख्यान देतांना असें उद्गार काढले कीं, हिंदुधर्म हा उत्तम खरा परंतु तो कांहीं एक अनुभव नसून नुसत्या वाचाळपंचविसी करणाऱ्या पोपटी उपदेशकांच्या हातून सुटेल तर फार बरें होईल. सूक्ष्म विचार करून पाहिला असतां, आपल्या राष्ट्राचे हित साधणें यासारखा उत्तम व्यवहार दुसरा नाहीं; आणि तो व्यवसाय उत्तमप्रकारें साधण्यास कीर्तनासारखें अत्युत्तम साधन दुसरें नाहीं. इतर समांस व समाजांस अमक्यानें जावें, अमक्यानें जाऊं नये, असे निर्बंध असतात, तसें कांहीं कीर्तनास नसतें. तेथें लहानांपासून थोरांपर्यंत सर्व स्त्रीपुरुष येतात. कीर्तन हें पेरणीचें काम आहे, असें झटलें तरी चालेल. आमच्या तरुणांच्या मनांत ज्या धान्याचें उत्तम पीक यावें असें इष्ट आहे, त्या धान्याची पेरणी करण्याचा उत्तम हंगाम झणजे झणजे कीर्तनप्रसंग होय. तो आमच्या पुढारी मंडळींनें साधला पाहिजे; व कालदेश वर्तमानानुसार कीर्तनपद्धतींत योग्य ते फेरफार केले पाहिजेत. या व्यवसायामध्यें एक गोष्ट विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, यांत स्वहिताची इच्छा मुळींच नसावी. सगळा हेतु परहिताचा असावा तुकोबांचें कीर्तन जें सहस्रावधि जनांस अत्यंत आवडे याचें बीज हेंच होतें. सांप्रतच्या बहुतेक कीर्तनकारांत या गोष्टीचा अत्यंताभाव दिसून येतो. त्याविषयीं वामनपंडितांनीं म्हटलें आहे:–**मुखें ब्रह्मज्ञाना कथिति कर जोडोनि सकळा। जगा दावीती ते कुशल कविता गायनकळा॥स्वयें आशा-**

बद्धें सततचि धनालागिं यजिजे । नव्हे ते गोसावी विविध जन भोंदू समजिजे ॥ पोटासाठीं केलें सोंग । तेथें कैचा पांडुरंग ॥ असे बहुरूपी नको आहेत. यांच्यायोगानें पारमार्थिक कल्याण तर होत नाहींच, पण उलट व्यावहारिक नुकसान मात्र होण्यासारखें आहे. ज्यांच्या द्वारें ऐहिक व पारमार्थिक कल्याण होण्यासारखें आहे असे खरे खरे हरिदास हवेत. श्रीएकनाथ व तुकाराममहाराज हे खरे हरिदास होते. यांच्या कीर्तनांत चावट अगर इतर मनोरंजक विषय नसून, मनुष्यांनीं विषयसुखासाठीं आपलें बहुमूल्य आयुष्य खर्च न करितां ईश्वरप्राप्ती करून घ्यावी, व नीतीनें वागावें हा नित्यविषय असे. धर्मसंबंधी व नीतीसंबंधी त्यांचीं मतें कीर्तनाच्या निरूपणांत आढळून येत असत. उदाहरणार्थः–**अनित्यानि शरीराणि वैभवो नैव शाश्वतः** व **ऐश्वर्यं स्वप्नसंकाशं यौवनं कुसुमाक्षणं । क्षणं चंचलमायुष्यं तस्मात् जागृहि जागृहि** इत्यादि श्लोकांतून शरीर व ऐश्वर्यादिक सर्व संपत्ति स्वप्नवत् व नश्वर आहे असें दर्शविलें. हें तुकोबांनीं व नाथमहाराजांनीं आपल्या अभंगांत वर्णन केलें आहेः– **देह जाईल जाईल । यासी काळ वा खाईल ॥ कारे नुमजसी दगडा । कैंचे हत्ती घोडे वाडा ॥** व **धन मान बळें नाठविसी देवा । मरणकाळीं वा कोण आहे ॥ एका जनार्दनीं संतासी शरण । तुज जन्ममरण नाहीं नाहीं ॥** हें शरीराच्या अनित्यत्वाबद्दल झालें. **मातृत्वत्परदारांश्च परद्रव्याणि लोष्ठवत् । आत्मवत् सर्वभूतानि यःपश्यति स पश्यति ॥ कनक कांता नये चित्ता । तोचि परमार्थी पुरता ॥ जन तेंचि जनार्दन । एका जनार्दनीं भजन ॥** व **परावियां नारी माउलीसमान । ते गेले नेमून ठायींचे ठायीं ॥ सर्व परमात्मा सर्व कालीं देशीं । भाव हा मानसीं दृढ धरी ॥ परद्रव्यीं अंध निंदेसी जो मुका । तोचि धन्य देखा तुका ह्मणे ॥** हें नीतिपर झालें.

बंधाय विषयासंगं मुक्तनिर्विषयं मनः । मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः ॥ मुक्त तो आशकां नाहीं ॥ मन करारे प्रसन्न । सर्व सिद्धीचें कारण ॥ मोक्ष

अथवा बंधन। सुख समाधान इच्छा ते ॥ पंढरीसी जाऊं चला। भेटूं रखुमाई विठ्ठला ॥ विठ्ठल रोकडा रोकडा। डोळा पहारे उघडा व चला पंढरीसी जाऊं। रखुमादेविवरा पाहूं ॥ तुका ह्मणे डोळा। विठो बैसला सांवळा ॥ नाम वदतां हे वैखरी। चित्त धांवे विषयावरी ॥ कैसे होताहे स्मरण। स्मरणामाजी विस्मरण ॥ नाम स्मरतों ह्मणुनि आचराल दोष। तरी श्रवण मनन भक्ति पडियेली ओस ॥ व इंद्रियासी नेम नाहीं। मुखीं राम ह्मणुनि काई ॥ कीर्तन करावें। तैसें करोनि दावावें ॥ मुखामध्यें नारायण। पोटामध्यें घर घेणें ॥ वारकरी पंथांतील नामधारक याकडे लक्ष देतील काय ? क्षणक्षणा जीवा वाटतसे खंती। आठवती चित्तीं पाय देवा ॥ येईं वो येईं वो येईं लवलाही। आलिंगुनी बाही क्षेम देईं॥ उताविळ मन पंथ अवलोकीं। आठवे ते चुकी काय झाली॥ तुका ह्मणे माझ्या जीवींच्या जीवना। घाला नारायणा उडी वेगीं ॥ ह्या जगामध्यें मनुष्यांस सर्व गोष्टींचा अनुभव आला आहे; व त्यावरून असें समजलें आहे कीं, त्यामध्यें नकोशी होत नाहीं, किंवा वीट येत नाहीं अशी गोष्ट काय ती अवघी एक आहे, ती गोष्ट ह्मटली ह्मणजे परमेश्वरभक्ति होय. राज्यपद ह्मणजे सगळ्या ऐहिक सुखाची खाण, असें पुष्कळांस वाटतें, परंतु या देशांतील दिलीप राजा, व जर्मनींतला पांचवा चार्लस, अशा पुरुषांनीं राज्योपभोगास विटून त्याचा त्याग केला. परंतु आजपर्यंत निरनिराळ्या धर्मांचें जे सहस्रावधि लोक वेगवेगळ्या पर्यायांनीं परमेश्वर–भक्तींत निमग्न झाले, त्यांतला एक तरी तिला विटून तिजपासून पराङ्मुख झाला आहे काय ? नाहीं, एक देखील नाहीं. यांचें कारण तुकोबांनीं सांगितलें आहे **लाचावलें मन लागलीसे गोडी। तें जावें न सोडी ऐसें झालें** आणि **गुळाचिया गोडी। माशी घाली उडी** या न्यायानें भक्तांचें अंतःकरण परमेश्वरभक्तीमध्यें तल्लीन होतें तें पुन्हः कधींही पालटत नाहीं, एवढेंच नव्हे, तर आपल्या समजुतीप्रमाणें जन्मभर परमेश्वरभक्ति करावयाची, सोडावयाची नाहीं, अशा

निश्चयानें, आजपर्यंत शेंकडों नव्हत, हजारों नव्हत, तर लक्षावधि लोक स्वसंतोषानें मृत्युमुखीं पडण्यास तयार झाले. यावरून परमेश्वर-भक्तीमध्यें कांहीं अलौकिक सुख आहे असें म्हणणें भाग पडतें. **बहु गोड सेविता ये वीट वरी मागती लवण आलें। नामामृतासी सेवुनि सांगा विषयाकडे कवण आलें॥** परंतु हें भक्तिसुख ईश्वरभक्तांखेरीज इतर कोणासहीं लाभत नाहीं. मोठे पंडित, अति वाचक, अगर महाज्ञानी जरी असले तरी त्यांना भक्तिप्रेमसुख दुर्मिळ होय. **भक्तेप्रेमसुख नेणवे आणिकां। पंडित वाचकां ज्ञानियांसी॥ भक्ति प्रेमा-विण ज्ञान नको देवा। अभिमान नित्य नवा तयामाजी॥ प्रेमसुख देई प्रेमसुख देई। प्रेमेवीण नाहीं समाधान॥** असें नाथ महाराज देवापाशीं मागतात! व तुकोबारायही तसेंच सांगतात. एवढें जें भक्तिमाहात्म्य तुकोबांनीं वर्णन कलें आहे ती भक्ति तरी कोणती हें पाहिलें पाहिजे. आपणास एखादा रोग झाला म्हणजे आपण जसे खाण्यापिण्याच्या व पथ्यपाण्याच्या संबंधानें वैद्याच्या स्वाधीन होतो, तसेंच भवरोग झालेले जे आपण, त्या आम्ही सर्व मानसिक व्यापाराच्या संबंधानें आपलें सगळें अंतःकरण परमेश्वराच्या स्वाधीन केलें पाहिजे. यालाच परमेश्वरभक्ति म्हणावयाचें. कपिलगीतेंतही असेंच सांगितलें आहे. **देवानां गुणलिंगानामानुश्रविककर्मणां। सत्व एवैक मनसो वृत्ति स्वाभाविकीतुया॥** ज्यांच्यायोगानें विषय जाणले जातात, आणि वेदोक्तकर्मकर्तृत्वाची ज्यांना शक्ति आहे. अशीं जीं पदार्थद्योतक इंद्रियें त्यांची आणि मनाची जी स्वाभाविक वृत्ति म्हणजे सहज व्यापार ते सर्व ईश्वरार्पणच करणें, त्याला भक्ति म्हणावी, असें सांख्य मत आहे. जसें अविवेकी पुरुषाचें प्रेम विषयाचे ठिकाणीं अनस्यूत असतें, तसें जगदीश्वराचे ठिकाणीं अकृत्रिम प्रेम ठेवणें हें भक्तीचें स्वरूप आहे असें शांडिल्य ऋषीचें मत आहे. 'चैतन्याकडे वृत्ति फिरविणें या नांवें 'भक्ति' असें भक्तीचें लक्षण शिवरामस्वामींनीं केलें आहे. अशा भक्तिसुखाचा उपभोग घेणारा पुरुष ज्ञानाची व ज्ञानापासून होणाऱ्या मोक्षाची इच्छा करीत नाहीं. **मोक्ष तुमचा देवा। दुर्लभ तो तुम्ही ठेवा॥** वेद हे हिंदुधर्मरूपी भव्य इमारतीचे आधारस्तंभ होत. त्याचे पूर्व-

मीमांसा व उत्तर मिमांसा हे दोन भाग असून त्यांमध्यें कर्मक उपासनाकांड, व ज्ञानकांड, या कांडत्रयाचे पूर्ण विवेचन केलें आ त्यांपैकीं ज्ञानकांडांविषयीं उपनिषदें, ब्रह्मसूत्र, व भगवद्गीता हे ग्रं प्रधानत्वें प्रमाण मानले जातात. या सर्वांमध्यें भगवद्गीतेचें फार महात्म्य वर्णन केलें आहे. नामदेवः- **वेदाचें पै सार निमि येली गीता। तिचा अर्थ चित्ता असो द्यावा** अर्जुनानें श्रीकृष्णास प्रेमपाशानें बद्ध करून सर्व जनांच्या ज्ञानोप योगी जीवनार्थ गीतामृत काढून घेतलें. सर्व वेदांचा मथिताः अल्पश्रमांत कळावा ह्मणून गीता निर्माण झाली आहे. परंतु य सोयीचा लाभ सर्वांस न होतां तो फक्त संस्कृतज्ञांसच होऊं लागला नामदेवांनीं ह्मटलें आहे **संकृत भाषा जनासी कळेना तेणें नारायणा संकट पडलें** ॥ कित्येक ब्रह्मवृंदांस व एकंद ब्राह्मणेतरांस हा ग्रंथ फार दुर्बोध असल्यामुळें धर्मरहस्य बरोब प्रगट होईना. शंकराचार्य वगैरे प्रभृतींनीं अनेक ग्रंथ केले परंतु ते सर्व संस्कृत भाषेंत असल्यामुळें इतर जनांस ते असून नसून सारखेच होते. जो तो गीर्वाण भाषा वधूवरच मोर्चेलें उडवीत असे. पुढें कांहीं कालानंतर असें होऊं लागलें कीं महाराष्ट्र भाषेंत कोणी ग्रंथ लिहिण्याचा प्रयत्न केला कीं संस्कृत पंडितांनीं तिलांजली घेऊन उभें राहावें, व त्याचा मनसोक्त छल करावा. अशी महाराष्ट्र-भाषेची शोचनीय स्थिति झाली असतां तिचा उद्धार करण्यासाठींच कीं काय, श्रीज्ञानेश्वर महाराज अवतीर्ण झाले. त्यानीं ज्ञानेश्वरी ही गीतेवर अति उत्कृष्ट टीका केली. तिच्यायागानें अज्ञजनांसही ज्ञान व्हावें असें तिच्या अंगांत सामर्थ्य आहे. तत्कालीन संत कवयित्री जनाबाई ह्मणतात- **वाचावी ज्ञानेश्वरी। डोळा पहावी पंढरी ॥१॥ ज्ञानेश्वरी टीका। वंद्य होय ब्रह्मादिका ॥२॥ ज्ञान होय अज्ञानासी। ऐसा वर त्या टीकेसी॥३॥ वाचील जो कोणी। जनी त्यासी लोटांगणी ॥४॥** याशि-वाय अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, वगैरे बरेच अध्यात्मपर ग्रंथ श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं महाराष्ट्र भाषेंत लिहिलें. यांच्याच समकालीन मुकुंदराज व नामदेव हे साधुकवि होऊन गेले. पैकीं मुकुंदराज यां-चा परमामृत नांवाचा ग्रंथ फार प्रख्यात आहे. हा मराठी भाषेंतील आदिग्रंथ होय. परंतु वारकरी पंथांत ज्ञानेश्वरीसच प्रमाणग्रंथ मानतात.

नामदेवांनींही आपल्या कुटुंबांतील माणसांसमवेत जवळ जवळ चाण्णव कोट अभंग करून श्रीज्ञानेश्वरासमवेत कीर्तन व भजन-रूपानें पुष्कळ अज्ञजनांस उपदेश केला. नेहमींच्या ठरावाप्रमाणें यांना संस्कृतभाषाभिज्ञ लोकांपासून अति त्रास सोसावा लागला. परंतु श्रीज्ञानदेव व नामदेव यांनीं, व त्यांच्या पाठीमागून त्यांचेच अवतार गणले जाणारे श्रीएकनाथ व तुकाराममहाराज यांनीं सर्व छळ सोसून श्रुति स्मृति पुराणांतील धर्माचें गुप्त निधान, उंचनीच, स्त्री पुरुष, इत्यादि भेदभाव नाहींसा करून सर्वांपुढें स्वभाषेंत मांडलें. या साधुसंतांचें असें मत होतें कीं बौद्ध धर्मक्रांति झाल्यापासून हिंदुस्थानांत वेदशास्त्रांचें महत्व किंचित कमी होऊन रामायण, महाभारत, व भगवद्गीता यांचेंच महत्त्व फार वाढलें. ह्मणून याच ग्रंथांचें त्यांनीं प्राकृत भाषेंत बहुतेक भाषांतर केलें. या टीकाकारांपैकीं व भाषांतरकारांपैकीं श्रीएकनाथ व तुकाराममहाराज यांचा ब्राह्मण लोकांनीं जो छळ केला तो सांगतां पुरवत नाहीं. युरोपांतील धर्मग्रंथांप्रमाणें यांचें अभंग जाळले न जातां त्यांना जलसमाधि मिळाली. आपण आरंभिलेल्या धर्मसुधारणेच्या महत्वाच्या कार्यांत संस्कृत भाषेचा कांहीं उपयोग नाहीं असें समजून या संतमंडळींनीं तिला अजिबात फांटा दिला, व आपल्या स्वभाषेची पूर्तता करण्यास जिवापाड मेहनत घेतली. महाराष्ट्रभाषेचा जो सांप्रत उत्कर्ष झाला आहे, तो या साधूंच्याच प्रभावानें झाला असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. व पुर्णे इत्यादि ज्या ज्या प्रांतांत या साधूंच्या समागमाचा लाभ अधिकाधिक झाला होता, त्या त्या प्रांतांत भाषेचें स्वरूप इतर ठिकाणापेक्षां अधिक उदात्त दिसून येते. श्रीएकनाथ व तुकाराम महाराज यांचा हिंदुसमाजावर व महाराष्ट्रांतील धर्मावर झालेला हा महाराष्ट्रभाषासुधारणेचा परिणाम चिरकालिक होय. यायोगें सामाजिक व धार्मिक बाबतींत पुष्कळ फरक झाला. कवि या नात्यानें पाहिलें असतांही श्रीएकनाथ व तुकाराममहाराज यांची बरीच मोठी योग्यता आहे. इतर कवींच्या कवितेप्रमाणें यांची कविता निव्वळ ऐतिहासिक, पौराणिक अगर अलंकारिक नसून तिचा भर ईश्वरभक्तीवर व अध्यात्मविषयावर फार आहे. यांची योग्यता, जे केवळ कवि व केवळ साधु आहेत, त्यांच्यापेक्षां फारच अधिक आहे. कारण यांच्या कवितेमध्यें धर्मचिकित्सा, तत्वबोध, नीतिविचार, व या सर्वांहून जास्त असणारा ईश्वरीप्रसाद हे ओतप्रोत भरलेले असतात. एकच व्यक्तीचें एकसमयावच्छेदेंकरून साधु

व कवि असणें हें राष्ट्रास भूषणावह व उन्नतिकारक आहे. भाषा-दृष्टीनें विचार केला असतां असें दिसून येतें कीं, यांचीं काव्यें महाराष्ट्रभाषेच्या सुगमत्वास व सुधारणेस पुष्कळ अंशीं कारण झालीं. या साधुकवींनीं काव्यें करण्याचें पतकरलें नसतें व नुसता मुखानें उपदेश करण्यांतच आपलें समाधान मानून घेतलें असतें, तर सांप्रत जो मराठी भाषेंत प्रौढपणा दिसून येतो तो मुळींच आला नसता. तसेंच ते उत्तम कवि असून साधु नसते तर हल्लीं जो भागवत धर्माचा व विशेषेंकरून वारकरी पंथाचा उदय दिसून येतो, तोही मुळींच झाला नसता.

साधु लोकांमध्यें नाथमहाराज व तुकोबा यांची योग्यता जरी समान आहे तरी कवीमंडळांमध्यें तुकोबापेक्षां नाथमहाराजांची योग्यता एका दृष्टीनें अधिक आहे. ज्याप्रमाणें तुकोबांनीं अभंग रचले आहेत, त्याप्रमाणें नाथमहाराजांनींही रचले आहेत. आतां इतकें मात्र खरें कीं नाथमहाराजांच्या अभंगांपेक्षां तुकोबांचे अभंग संख्येनें फार अधिक असून ते लोकसमुहाकडून विशेष म्हणण्यांत येतात. परंतु अभंगापेक्षां नाथमहाराजांचे ओवीबद्ध ग्रंथ फार मोठे व महत्वाचे आहेत. त्यांत कांहीं टीकारूप ग्रंथ असून कांहीं स्वतंत्र ग्रंथ आहेत. त्यांहीमध्यें चरित्रविषयक व अध्यात्मविषयक असे दोन भाग करितां येतील. भावार्थरामायण व रुक्मिणीस्वयंवर हे पहिल्या भागांतील. आणि एकनाथी भागवत, स्वात्मसुख, आनंदलहरी. हस्तामलक, व चतुःश्लोकी भागवतटीका हे दुसऱ्या भागांतील ग्रंथ आहेत. ज्याप्रमाणें तुकोबांचे अभंग ज्ञात्यांस अज्ञान्यांस सारखेच समाधानकारक होतात, त्याप्रमाणें नाथमहाराजांचे पहिल्या भागांतील ग्रंथ अज्ञ जनांस, व अध्यात्मविषयक ग्रंथ ज्ञानी जनांस सारखेच सुखावह होतात. अज्ञ जनांची कळकळ बाळगून त्यांस आपणापासून कांहींतरी फायदा झालाच पाहिजे, हा वरील साधूंचा नियम सांप्रतचे आंग्लभाषाभिज्ञ ध्यानांत धरून त्याप्रमाणें वागतील तर समाजास किती हितावह होईल बरें! असो. नाथमहाराजांच्या सर्व ग्रंथांमध्यें श्रीमद्भागवतावरील एकादश स्कंधावर केलेली टीका अत्युत्तम ग्रंथ होय. त्यांतील भाषा ज्ञानेश्वरी प्रमाणें दुर्बोध नसून सरळ सोपी व गोड आहे. शिवाय त्यामध्यें अर्थगांभीर्य आरंभापासून अखेरपर्यंत सारखें दृष्टीस पडतें. त्यांत निरानिराळे आश्रम व त्यांचीं लक्षणें, संन्यास व षड्रिपु जिंकणें इत्यादि विषयांचे, व मनुष्यानें खरें प्रमेय समजून घेऊन आपलें आचरण

कसें ठेवावें, या गोष्टींचा विचार उत्तम रीतीनें केला आहे. शिवाय नीतीचें व वेदांतविषयाचें विवेचन दृष्टांत व अलंकाररूपानें उत्तम केलें आहे. एकनाथी भागवत हा ग्रंथ महाराष्ट्र भाषेचे मध्यमणि स्थान होय. कारण नाथमहाराजांच्या अगोदर जरी श्रीज्ञानेश्वर व मुकुंदराज यांनीं मराठी भाषेंत ग्रंथरचना केली होती, तरी तीमध्यें भाषेचें प्राचीनत्व व शब्दाचें काठीण्य बरेंच असल्यामुळें, सार्वजनिक लोकांस त्या ग्रंथांचा जसा फायदा व्हावा तसा झाला नाहीं. भाषेचें सुबोधत्व नाथांच्या ग्रंथापासून सुरू झालें असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. दुसरें असें कीं सगुण भक्तीचें रहस्य एकनाथी भागवताप्रमाणें दुसरें कोठेंही इतकें स्पष्ट व मोहक तऱ्हेनें वर्णिलेलें नाहीं. सगुणोपासनेचा व भागवत धर्माचा प्रधान ग्रंथ म्हणजे नाथांचें भागवत होय. नाथमहाराजांच्या वेळेपासूनच महाराष्ट्रभाषारूप सूर्याचें तेज हिंदुसमाजावर अधिकाधिक पडूं लागलें, व तुकोबांचा काल म्हणजे या सूर्याचा पूर्ण प्रकाशमान असा माध्यान्ह काल होय. एकनाथी भागवत हा ग्रंथ असा प्रसिद्ध आहे कीं वैष्णव पंथांतील सर्व प्रमाण ग्रंथामध्यें ज्ञानेश्वरी सोडून दुसरा कोणताही ग्रंथ याची बरोबरी करूं शकत नाहीं.

या साधुवर्याच्या चरित्रांमध्यें योग ज्ञान व कर्मादिक, आणि भक्ति यांचें तुंबल युद्ध होऊन अखेरीस भक्तीचाच जय झालेला दिसून येतो. योगमार्गाचें अवलंबन करण्यापासून ज्या सिद्धी महत्प्रयासानें प्राप्त होतात, त्या भक्तास भक्त्युद्रेकानें नकळत प्राप्त होत असतांही तुच्छ वाटतात. चांगदेव हे योगमार्गानें अष्टमहासिद्धी प्राप्त करून घेऊन चौदाशें वर्षें वांचले, परंतु ते आत्मज्ञानसंपन्न नसल्यामुळें त्यांना श्री ज्ञानेश्वरमहाराजास शरण जावें लागलें. श्रीज्ञानेश्वर व नामदेव हे उभयतां तीर्थयात्रा करीत असतां मारवाड देशांत आले, व मार्गक्रमण करीत असतां तृषाक्रांत झाले. अशा स्थितींत त्यांना एक विहीर दिसली. जवळ जाऊन पाहतात तों ती इतकी खोल होती कीं खालीं जाऊन पाणी पिणें अति दुर्घट होतें. श्री ज्ञानेश्वर महाराज आपल्या अणिमा सिद्धीच्या साह्यानें आंत जाऊन पाणी पिऊन तृप्त होऊन वर आले. नामदेव हे **नेणती कांहीं टाणा टोणा । नामस्मरणावांचोनि** या कोटींतील होते. त्यांनीं अंतःकरणपूर्वक परमेश्वराचा धावा केला, तेव्हां कर्तुमार्तुमन्यथाकर्तुं सामर्थ्याच्या योगानें ती विहीर वर उचंबळून आली, व नाम-

देवांचीच तृषा शांत झाली असें नसून सर्वत्र जनांस तिचा लाभ मिळाला, व अद्यूनही तो तसाच मिळत आहे. मारवाडांत एवढीच काय ती विहीर सदा सर्वकाल पाण्यानें भरलेली असते, असें सांगतात. या दोन दृष्टांतांनीं एवढें सिद्ध होतें कीं, योगबलापेक्षां भक्तांचें भक्तिसामर्थ्य अधिक श्रेयस्कर असून लोकोपयोगी आहे. शिवाय भक्तांच्या अंतःकरणांतील शुद्धतेचा, प्रेमाचा व निर्मलतेचा जो प्रभाव दृग्गोचर होतो, तो ज्ञात्यांच्या अगर कर्मठांच्या ठिकाणीं बहुधा दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. तसेंच परोपकार, व सुखदुःखाविषयीं पूर्ण औदासिन्य जसें भक्तमंडळींत दिसून येतात तसें तें इतरत्र तितक्या प्रमाणानें आढळून येत नाहींत. तुकोबांचे चौदा टाळकरी शिष्य होते. त्यांपैकीं कान्होजी पाठक या नांवचे ब्राह्मण शिष्य फार प्रख्यात होते. एके दिवशीं एक काशीचा वेदांती त्यांची परीक्षा पाहण्यासाठीं त्यांच्या घरीं आला. त्या वेळीं कान्होजीच्या मुलानें आपल्या पित्याच्या पाठीवर बसून हातांत चाबूक घेऊन त्यांस मारण्यास सुरवात केली होती. तें पाहून या पंडितानें कान्होजीस त्यांच्या गृहासक्तीबद्दल फार दूषण दिलें. कान्होजीनें त्यांत वाईट काय आहे म्हणून विचारलें. पंडितानें उत्तर दिलें कीं, तुमचें प्रेम मुलांवर नसून खरोखर ईश्वरावरच असेल तर या मुलांस विहीरींत ढकलून द्या. कान्होजीनें तें तात्काल कबूल करून लागलीच तसें केलें. परंतु चमत्कार हा कीं, त्याबद्दल कान्होजीच्या चेहऱ्यांत तिलमात्र फरक न होतां ते स्वस्थपणें पूर्ववत् बोलत बसले. पंडिताला च उलट फार भीति वाटून त्यानें त्या मुलांस वर काढले, व कान्होजीच्या चित्ताच्या समतेबद्दल आश्चर्यचकित होऊन त्यांच्या चरणीं लागला. यावरून हें सिद्ध होतें कीं, वेदांत्यांच्या ज्ञानमार्गांत व कर्मठांच्या कर्ममार्गांत चित्ताची समता दुष्प्राप्य, ती भक्तांच्या भक्तिमार्गांत सहज आणितां येते. प्रपंचांत राहून चित्ताची समता ज्या तुकोबांच्या शिष्यानें इतकी उत्कृष्ठ रीतीनें दाखविली, त्या तुकोबांचा अधिकार किती मोठा असेल बरे ! अष्टमहासिद्धि प्राप्त करून घेणें. व ज्ञानसंपादन करणें सुगम, पण चित्ताची समता राखणें फार कठीण आहे. अशा प्रकारची समता प्राप्त होण्यास भक्तिमार्गांतील भगवद्भावना मूळ कारण होय.—**ऐसें व्यापक ज्ञान भलें । जया चिया हृदयागिवसित आलें । तयांची समता दृष्टि बोलें । विशेषूं काई ॥** भगवद्भक्तीनें वरील समता प्राप्त झाली म्हणजे

ईश्वरप्राप्ति नको म्हणत असतां खात्रीनें व्हावयाची. भक्तीवांचून मात्र ईश्वरप्राप्ति व्हावयाची नाहीं. **न रोधयितां योगो न सांख्यं धर्म उद्धव । न स्वाध्यायस्तपस्त्यागो यथा भक्ति र्ममोर्जिता ॥ न दानं न तपोनेज्या न शौचं न व्रतानि च । प्रीयते मलयाभक्त्या हरिरन्यद्विडंबनं ॥** इत्यादि प्रमाणांनीं ईश्वरप्राप्तीविषयीं जशी भक्ति प्रधान आहे, तसें कर्म, ज्ञान, योग, तप, वेदाध्ययन, दान, यज्ञ इत्यादिक प्रधान नाहींत. ही भक्ति कामनिक नसून फलसंगरहित असते, म्हणूनच ती योग-सिद्धीपेक्षां श्रेष्ठ आहे. म्हटलें आहे. **अनिमित्ता भागवती भक्तिः सिद्धेर्गरीयसी । जरयत्याशुयाकोशं निगोर्ण मन लोयथा ॥** या साधूंच्या चरित्रांपासून भक्तीचें श्रेष्ठत्व दिसून येतें.

या साधुसंतांची ईश्वरविषयक कल्पना अशी होती कीं, ईश्वर एक आहे. व तो सर्वव्यापी, सर्वशक्तिमान, व सर्वज्ञ आहे. याच निष्ठेवर त्यांनीं आपली धार्मिक सुधारणेची इमारत रचली होती; व या त्यांच्या विचाराविरुद्ध कोणी बाधक प्रमाणें आणल्यास त्यांचें खंडन करण्यास ते नेहमीं तयार असत. त्यांच्या या मताची गैरसमजूत होऊन कित्येक लोक त्यांच्यावर मूर्तिपूजेचा आरोप आणतात. परंतु तो सर्वथा अविश्वनीय आहे. देवतांतरास भजणें हें तर तुकोबांच्या दृष्टीनें फारच निंद्य होतें. त्यांनीं म्हटलें आहेः-**सातापांचा ठायीं भाव । तया कैचा पावे देव ॥** व **आणिकांची स्तुति आम्हां ब्रह्महत्या ॥** शिवाय ते ज्या समाजांत निर्माण झाले होते त्या समाजांत, अनेक देवांची व विशेषेंकरून तामसी देवतांची कल्पना पूर्वापार चालत आली होती. ती कल्पना नाहींशी करून **जनीं जनार्दन** ही कल्पना लोकांच्या हृदयांत ठसविण्याचे त्यांनीं अव्याहत श्रम केले. त्यांचा तत्वबोध ज्या मूढ व अज्ञ जनांस दुर्गम होता, त्यासाठीं शास्त्रानुसार मूर्तिपूजा कथन केली आहे. त्याप्रमाणें त्यांनींही लोकसंग्रहार्थ म्हणून तो क्रम चालू ठेवला होता. **बालकाच्या साठीं । पंते हातीं धरली पाटी ॥** मात्र मूर्तिपूजेसंबंधानें सामान्य लोकांच्या मनांत ज्या वेडगळ व असंबद्ध कल्पना असतात, त्यांचा विटाळही होऊं न देतां मूर्तिपूजेचें खरें रहस्य काय आहे, तें प्राकृत

पुरुषांस ते अधिकारानुरूप समजून सांगत असत. व त्यांचें पारमार्थिक ज्ञान वृद्धिंगत होईल, व त्यांचे आचरण शुद्ध होईल अशी खटपट करीत असत. समाजस्थितिमध्यें कोणत्याही प्रकारची भयंकर व नाशकारक क्रांति न करतां, हा साधु संतांचा समाज सुधारण्याचा मार्ग आमचे सामाजिक, राजकीय व धार्मिक सुधारक अनुसरतील तर किती तरी उत्तम होईल बरें ? वास्तविक रीतीनें पाहिलें असतां ज्या ज्या देवतांच्या प्रतिमा करून उपासक लोक पूजा करतात, त्या त्या सर्व परब्रह्माच्याच अंशभूत आहेत. ब्रह्माव्यतिरिक्त त्यांचें अस्तित्व मुळींच राहूं शकत नाहीं. **अवघे ब्रह्मरूप रिता नाहीं ठाव। प्रतिमा तो देव कैसा नोहे ॥ नाहीं भाव तया सांगावें तें किती। आपुलाल्या मती पाखांडिया ॥** कोणी शाक्ति उपासक, कोणी शैव, कोणी वैष्णव व कोणी गाणपत्य आहेत. ते नानामतें स्वीकारून द्वैत वाढवितात व सहिष्णुतेला झुगारून देऊन आपसांत तंटेबखेडे करण्यास प्रवृत्त होतात. परंतु समाजदृष्ट्या ती त्यांची मोठी घातक चूक आहे. पुराणादि ग्रंथांत जो देव मुख्य उपास्य मानला जातो, तो पर्यायानें ब्रह्मच होय. ह्मणजे शैवमताप्रमाणें शिव, वैष्णवमताप्रमाणें विष्णु, इत्यादि सर्व देव ब्रह्माहून भिन्न नाहींत. उपासकाची भावना मात्र अकुंचित एकदेशी असते व त्यामुळेंच मतांतरें होतात. असो. या साधूचें वर्तन मात्र तसें नव्हतें. त्यांच्या अंतःकरणांत व्यापक व ऐक्यभाव निरंतर वास करीत होता. **हरिहरा भेद। नाहीं नका करूं वाद ॥** परंतु **मनुष्याणां सहस्रेषु** या न्यायानें अशा व्यक्ति फारच थोड्या असतात. म्हटलें आहे:—

' नाना चित्र विचित्र वेष रचना नानामत भ्रामकाः। नाना तीर्थ-निषेवका जप-परा मौन-स्थिता नित्यशः। सर्वे चोदर-तत्परास्त्वभिमते वादेविवादे स्थिताः। ज्ञानदूमोक्षपदं वदंति मुनयो तत्प्रापका दुर्लभाः ॥ अर्थ— कोणी भस्म रुद्राक्ष माला धारण करून शिवपूजन करतात, कोणी गोपीचंदन तुलसीकाष्टमाला धारण करून विष्णुपूजन करतात, कोणी कुंकुमाचें गंध लावून रामाचें किंवा गोपालकृष्णाचें पूजन करतात, कोणी मद्याची बाटली घेऊन शक्तीची उपासना करितात, अशी चित्रविचित्र वेष रचना करून आपापल्या मतानें जनांस

भ्रम करणारे लोक बहुत आहेत. कोणी स्कंधावर कावड घेऊन काशीचे कापडीच बनले आहेत. कोणी डोळे झांकून मोठ्या शोकानें गोमुखीच हालवितात. कोणी सर्वकाल मौनच धारण केलें आहे. असे सर्व उदर--तत्पर होत्साते आपल्या मतोत्तेजनाकरितां परस्पर वादविवाद करतात परंतु ज्ञानसंपादन करून मोक्ष पदवीप्रत पावलेले पुरुष फार दुर्लभ आहेत. ह्मटलें आहेः- **शैले शैलेन माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे । साधवो नही सर्वत्र चंदनं न वने वने ॥** या साधुसंताच्या मतें सर्वत्र ब्रह्म पाहणें, हेंच ज्ञान; व भक्तीचाही समावेश यामध्येंच होतो. ह्मटलें आहे. **जें जें भेटे भूत । तें तें मानी भगवंत ॥ हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ॥ भगवद्भाव सर्वांभूतीं । हेंचि ज्ञान होचि भक्ति॥** ज्या ज्या वेळीं मूर्तीच्या ठायीं व्यापक ब्रह्माची भावना होत नसे, त्या त्या वेळीं श्रीएकनाथ व तुकारामम्हाराज यांनीं त्यावर फारच कडक टीका करावी. दगडाचा देव करून जोंपर्यंत तो नीट आहे तोंपर्यंत त्याची पूजा व्हावयाची, पुढें दैववशात् तो दगड फुटला म्हणजे त्याची पूजा बंद होऊन, कोठें तरी कोपऱ्यांत त्याला जागा मिळावयाची. अशा पूजाविधीचा, व पूजा करणारांचा या संतांनीं अंतःकरणापासून तिरस्कार केला. **निर्जीव दगडाची काय करिसी सेवा । तो तुज निर्दैवा देईल काय ॥ अष्टोत्तरशें तीर्थें जयाच्या चरणीं । तो तुझ्या हृदयीं आत्माराम ॥** मनुष्यमात्रांमध्यें तीन प्रकारचे जन दृष्टीस पडतात. **प्रकाराचे तीन । तुका म्हणे केले जन ॥** त्यांमध्यें तमोगुणी जे आहेत त्यांना मूर्तिपूजा कथन केली आहे. यांचें कारण त्यांच्या वृत्तीवर अनेक दुष्ट संस्कार दृढ झालेले असतात, त्यामुळें त्यांची वृत्ति अत्युच्च स्वरूपाची कल्पना तर लांबच, पण सामान्य स्वरूप बोधक कल्पनाही ग्रहण करूं शकत नाहीं. जे रजोगुणी आहेत व ज्यांच्या वृत्तींत उंच नाहीं, पण साधारण कल्पनांचा समावेश होतो, त्यांसाठीं सगुणोपासना बोधन केली आहे, व ज्यांचें अंतःकरण शुद्ध असून ज्यांची वृत्ति स्वरूपाचे ठायीं एकाग्र होऊं शकते,त्यांस निर्गुणोपासना द्योतन केली आहे. वास्तविक पहातां शेवटीं कथन केलेली सर्वांत श्रेष्ठ उपासना आहे. ह्मणनच त्यांनीं सांगितलें आहेः--**अव्यक्त निराकार । नाहीं ज्या आकार । जेथुनि चराचर । हरीसी**

भजे ॥ तो निर्गुण निराकार परमात्मा सर्वांचें हृदयांतही वास करतो. **ईश्वर सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति । भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥ तमेव शरणं गच्छ सर्व भावेन भारत ॥ तत्प्रसादात्परां शांतिं स्थानं प्राप्यसि शाश्वतं ॥** म्हणूनच नाथांनीं आपल्या अभंगांत व भागवतांत ह्मटलें आहे. **मज वेगळें गा-एथें कांहीं । उद्धवा आतां उरलेंचि नाहीं । सर्व साधारण पाहीं । सर्व देहीं मी असे ॥ देहीं असोनिया देव । व्यर्थ करीती संदेह ॥** तुकोबांनीं हेंच सांगितलें आहेः-- **देहीं असोनिया देव । व्यर्थ हिंडतो निर्दैव ॥** जसें **नाभिमृगाचे कस्तुरी । व्यर्थ हिंडे वनांतरी ॥ साखरेचें मूळ ऊंस । तैसा देहीं देव दिसे ॥ तुका सांगे मूढ जना । देहीं देव कां पाहांना ॥** तो देव पाहण्याची रीतही सांगितली आहे. **य लागीं शम-दमाच्या अनुक्रमीं । मन बुद्धी वाचा इंद्रियें नेमी ॥ प्राण नेमुनि प्राणधर्मीं । आत्मारामीं पावशी ॥ बुद्धि नेमावी आत्मविवेकें । जीव नेमावा परमात्मसुखें । इतक्यानें तूं आवश्यकें । होशी कौतुकें मद्रूप ॥** जीवात्म्याचा परमात्म्याशीं साक्षात् संबंध आहे, व त्याचा साक्षात् संवाद होत असतो हें तत्व भागवत धर्माला आधारभूत आहे, असें दिसतें. ख्रिस्तिधर्मशास्त्रांत, इतर कित्येक धर्मशास्त्रांप्रमाणें देवाच्या क्रोधाविष्टपणाची व कडक न्यायाची कल्पना फार पुरातन कालापासून आहे. एकदां कां मनुष्यप्राणी नरकास गेला ह्मणजे त्याला तेथून वर येण्यास मुळींच मार्ग नसून, (Once hell, hell for ever) एकदा नरक, तर सदोदित नरक या न्यायानें, दिवसेंदिवस त्याची अवनतीच व्हावयाची. (Theory of Predestination), मिल्टन कवीनें आपल्या पॅरॅडाइज लॉस्ट नामक काव्यामध्यें अति जोरानें प्रतिपादन केला आहे. हिंदुशास्त्रांनींही, ही कल्पना थोड्या बहुत प्रमाणानें ग्राह्य केली आहे. परंतु या संतांच्या उपदेशानें लोकांस असें वाटूं लागलें कीं, ईश्वर फक्त कडक न्यायाधीशच नसून ती ममताळू आई आहे. **तूं माउलीहूनि मवाळ । चंद्राहूनि शी-**

तल । पाणियांहूनि पातळ । कल्लोळ प्रेमाचा ॥ ममतेनें ईश्वरावर अन्यायाचा दोषारोप येईल असें कोणास वाटेल परंतु तसें नाहीं. प्रत्येकास कृतकर्मांबद्दल बरें वाईट फळ मिळतें. परंतु ईश्वर अनुताप पावलेल्या आपल्या पुत्रांस आलिंगन देण्यास नेहमीं तयार असतो, **वाट पाहे उभा भेटीची आवडी । कृपाळु तातडी उतावेळ ॥** ईश्वराच्या दयालुत्वाची कल्पना तुकोबांनीं व नाथमहाराजांनीं लोकांच्या हृदयांत चांगलीच ठसवून दिली. **देव कृपावंत किती । दीन बहु आवउती ॥ हातीं प्रेमाचें भातुकें । मुखीं घाली कवतुकें ॥** ईश्वरी इच्छा लोककल्याणकारी आहे. सर्व लोकांनीं मजकडे यावें, व नित्यानंदाचें अप्रतिम सौख्य प्राप्त करून घ्यावें असें देवास फार आवडतें. भागवतीं नाथ लिहितातः-**देवें दिली मनुष्य योनी । निजात्म प्राप्ति लागोनि । देवाचा विश्वास बुडवुनी । विषय सेवनीं लाविलीं ॥** मनुष्यप्राण्यानें आपणास ओळखावें ह्मणून देवानें हा देह दिला आहे. परंतु मनुष्यांनीं, देवानें केलेला उपकार विसरून जाऊन, तोच देह विषयप्राप्तिसाठीं खर्च केला. पहा, इतर सर्व प्राण्यांपेक्षां मनुष्यप्राण्याला देवानें फारच मोठा अधिकार दिला आहे. **मनुष्य देहाचेनि ज्ञानें । सच्चिदानंद पदवी पावणें । एवढा आधिकार नारायणें । कृपावलोकनें दिधला ॥** जन्मास येऊन ईश्वर स्वरूपास मिळणें हें फक्त एका मनुष्यदेहाचेंच भाग्य आहे. मनुष्याच्या उत्पत्तीचा जर एखादा असाधारण हेतु असला तर तो हाच असावा कीं, त्यानें जगज्जीवनास ओळखावें व आपला आत्मोद्धार करावा. देह पडल्यानंतर मनुष्य खेरीज करून सर्व पशुपक्ष्यांचें शरीर उपयोगी पडतें; परंतु मनुष्य शरीराचा मात्र देहपातानंतर कांहींच उपयोग होत नाहीं. नर करणी करे तो नरका नारायण होय. ज्या ज्ञानानें परमात्म स्वरूपाची ओळख करून घ्यावयाची त्या ज्ञानाचा जर मनुष्यानें लाभ करून घेऊन आपल्या शरीराचा कांहीं एक उपयोग केला नाहीं, तर तो मनुष्य केवळ पशू होय. ह्मटलें आहेः-

आहारनिद्राभयमैथुनानि । समानि चैतानि नृणां पशुनाम् । ज्ञानं नराणामधिको विशेषो । ज्ञानेनहिनाः पशुभिः समानाः ॥ नाथांनीं यावर फारच कडकडीत भाषण केलें आहे.

भक्तिवीण पशु कशासी वाढला । सटवीनें नेला कैसा नाहीं ॥ राव रंक होका उंच नीच याती । भक्तिविण माती मुखीं त्याच्या ॥ मोठा संपत्तिमान, व वैभवशाली जरी असला, तरी तो भक्तिविरहित केवळ नीच होय, तो देवास आवडत नाहीं. वैदिककालीं हजारों लोक जमून यज्ञ करीत असत, व आपणांस प्रिय असणाऱ्या वस्तु अथवा पशु ईश्वरार्पण करीत असत त्याकालीं यज्ञाचें माहात्म्य फार होतें. त्यांतूनही अश्वमेध यज्ञाचें फारच महात्म्य वर्णन केलें आहे. **मृत्युं तरति पाप्मानं तरति ब्रह्महत्यां तरति यो अश्वमेधेन यजते ॥** यावेळीं कर्ममार्गाची प्रसिद्धी होती. पुण्य कर्म कां करावयाचें, तर धनसुतदारादि, इहलोकीं अगर परलोकीं, प्राप्त व्हावेत म्हणून. परंतु उपनिषदें झाल्यावर थोड्या खोल विचारांत लोक गेले. धन कितीही प्राप्त झालें तरी तें थोडेंच. ज्ञान कितीही वाढलें तरी तें मर्यादितच आहे. यापासून खरें समाधान होणें कठीण. असा विचार होतां होतां असें दिसून आलें कीं माझ्या ठिकाणीं जसा आत्मा आहे, तसा सृष्टीचे ठायीं परमात्मा आहे. त्याचे आपण भक्त आहोंत. नंतर वेदांताच्या मताप्रमाणें तो आपण एकच अशी समजूत झाली. वैदिक कालांतील धर्म सुटल्यानंतर कोणी तार्किक, कोणी बौद्ध, कोणी योगी व कोणी वेदांती असे नानामतानुयायी झाले. परंतु कर्माविषयीं श्रद्धा नाहीं, सिद्धीचा खरेपणा वाटेना, व जन्ममरणापासून मुक्त होण्याची इच्छा नाहीं. अशा कनिष्ठ लोकांना जपतपादि साधनांनीं उद्धार होणें कठीण वाटूं लागलें. अशी धर्माची विलक्षण चर्वा दिसूं लागल्यावरून भागवत धर्माची उघड रीतीनें सुरुवात झाली.

भागवत धर्माचें प्राचिनत्व.

पौराणिक इतिहासावरून असें समजतें कीं कलियुग समीप यावयाचे वेळीं, म्हणजे द्वापार युगाचे अंतीं नारदानें भागवतधर्म वसुदेवास सांगितला. नंतर तोच धर्म शुकाचार्यानें परिक्षितीस उपदेशिला व तोच पुढें विदेहजनकाला नऊवृषभ नामक ऋषींनीं कथन केला. तोच एकनाथमहाराजांनीं भागवतावर टीका करून सर्व जनांपुढें मांडला. यावरून भागवतधर्म हा नवीन नसून निदान पांच हजार वर्षांपूर्वीचा असावा असें दिसतें. हा धर्म नाथांच्या प्राकृत ग्रंथांत जसा स्पष्ट आहे तसा तो इतर कोठेंच नाहीं.

व्यांसांनीं अनेक शास्त्रें व पुराणें केलीं, पण त्यांच्या अंतःकरणांतील तळमळ नाहींशी होईना, म्हणून ते खिन्न होऊन अरण्यांत शोक करीत बसले, त्यावेळीं त्यांचा शास्त्रकार व ज्ञानी म्हणून जो अभिमान होता, तो गलित झाला. मग नारदांनें येऊन चतुःश्लोकी भागवताचा उपदेश करून ईश्वरभक्तिविषयक ग्रंथ लिही, म्हणजे तुझी तळमळ नाहींशी होईल म्हणून सांगितलें. त्याप्रमाणें जेव्हां त्यांनीं भागवत लिहिलें, तेव्हां त्यांचें समाधान झालें. तेंच परिक्षितीनें शुकमुखें श्रवण केलें, व त्या योगें पूर्ण शांति वरिली. तसेंच आतांही जो कोणी तें वाचील त्यास तोच अनुभव येईल. तुकोबांनीं आपल्या गुरुपरंपरेंत भागवतधर्मउपदेशाचीही परंपरा दाखविली आहे. **आदि महाविष्णु चैतन्याचे मूळ । सांप्रदाय सकळ तेथूनिया ॥१॥ हंसरूपें ब्रह्मा उपदेशी श्रीहरी । चतुःश्लोकी चारी भागवत ॥२॥ तें गुज विधाता सांगे नारदासी । नारदें व्यासासी उपदेशिलें ॥ ३ ॥ राघव चैतन्य करी तपोवनें । त्यासी द्वैपायनें उपदेशिलें ॥ ४ ॥ राघवा शरण केशव चैतन्य । बाबाजीसी पूर्ण कृपा त्याची॥५॥ बाबाजीनें स्वप्नीं उपदेश केला । तेणें तुकयाला उद्धरिलें. ॥ ६ ॥** ज्या भागवत ग्रंथाची परंपरा नाथापर्यंत आली, त्याच ग्रंथांतील उपदेशाची परंपरा तुकोबापर्यंत आली. तेव्हां दोघांचीं धर्मविषयक मतें, व भागवत धर्मांतील तत्वें एकच कां असणार नाहींत ? शिवाय तुकोबांनीं एकनाथी भागवत प्रथमारंभीं मननपूर्वक वाचलें होतेंच. या धर्ममतामध्यें निव्वळ प्राचिनत्व आहे असें नसून त्यामध्यें सत्यांश आहे. तो हा कीं, ईश्वराचा सर्व सजीव व निर्जीव पदार्थांचे ठायीं अखंड वास आहे. ही ईश्वर विषयक कल्पना श्रेष्ठ व उच्च आहे. दुसऱ्या कित्येक धर्मपंथांत ही ईश्वराची कल्पना इतकी यथार्थ नाहीं. कारण ईश्वराला मनुष्य व सृष्टी याहून पृथक् करण्याकडे इतर धर्मांची प्रवृत्ति असते. भागवत धर्मांतील विश्वदेवसिद्धांताचें प्राचिनत्व न जाणून वेदांत सूत्रावरील भाष्यांत शंकराचार्यांनीं जें अद्वैतमताचें प्रतिपादन केलें आहे तेवढेंच काय तें हिंदुस्थानांतील विश्वदेववादाचें मुख्य प्रतिपादन आहे असें समजतात. परंतु खरे पाहतां आचार्यांच्या पूर्वी व नंतरही रामानुजादिकांनीं स्वीकारलेलें विशिष्टाद्वैत मत त्याचेंही या वादांत बरेंच प्राबल्य आहे. यावरूनच सर्व-

देशभर वैष्णवपंथ निघून त्याचा बराच उत्कर्ष झाला. वैष्णवपंथानें जेवढें खरें स्वरूप ओळखलें तेवढें प्रचलित पंथांपैकीं कोणीही ओळखलें नाहीं. हिरण्यकश्यपूनें प्रल्हादास ईशस्मरण करण्याबद्दल पुष्कळ पारिपत्य केलें; परंतु कांहीं फायदा झाला नाहीं. शेवटीं त्यानें त्रासून जाऊन तुझा नारायण कोठें आहे म्हणून प्रल्हादास विचारलें. त्यानें उत्तर केलें:—**जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं सकळी। आहे वनमाळी जेथें तेथें॥** हाच भागवत धर्माचा मुख्य सिद्धांत होय. जडकोटी व मनुष्यकोटी व्यापून एकच सामर्थ्य, ज्ञान व योजना राहिली आहे. या कल्पनेचा उदय झाल्यामुळें पूर्वीचे देव व अनेक तत्वें मागें पडलीं; उपनिषदांतही देवाच्या या स्वरूपाचें वर्णन आहे दुर्वर्तन केलें असतां टोंचणाऱ्या, व सद्वर्तन केलें असतां योग्य मार्ग दाखवून सहाय्य करणाऱ्या सदसद्विवेक शक्तीच्या द्वारें सृष्टीच्या अंतर्गत जें चैतन्य आहे तें मनुष्याच्या हृदयांतही वास करतें. गीतेंतही **ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति। भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया** व **अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयः स्थितः** इत्यादि श्लोकवचनांवरून ही कल्पना चांगली सिद्ध करून दाखविली आहे. तुकोबांनींही तेंच सांगितलें आहे. **साखरेचें मूळ ऊंस। तैसा देहीं देव दिसे॥** परंतु त्या ईश्वराचें वर्णन कसें करावें याविषयीं निराश होऊन वाणी मागें फिरते, व मनालाही त्याचें आकलन करतां येत नाहीं. **यतो वाचो निवर्तंते अप्राप्यमनसासह** या वाक्यास उद्देशून तुकोबांनीं म्हटलें आहे:—**नाहीं सगुण निर्गुण। यासी कोण जाणती॥** हा सिद्धांत स्पेन्सरसाहेबांच्या अज्ञेय वादासारखा आहे कारण तें ज्ञेय तत्व इंद्रियें, मन व बुद्धीस अगोचर आहे. असें म्हणून ईश्वर नाहीं व ही संत मंडळी नास्तिक होती, असा कोणी कुतर्कवाद करतील तर तो चुकीचा होय. कारण श्रीज्ञानेश्वरांनीं अमृतानुभव ग्रंथांत लिहिलें आहे. **तैसें असणें आणि नसणें। हें नाहीं जया होणें। आतां मिथ्या ऐसें येणें। बोलें गमे॥ तरी कांहीं नाहीं सर्वथा। ऐसी जरी व्यवस्था। तरी नाहीं हे प्रथा। कवणासी पां॥** शून्य वाद पत्करून सर्वच कांहीं नाहीं म्हणणारा जो आहे, तो स्वतः आहे कीं नाहीं, असा श्रीज्ञानेश्वर प्रश्न करतात. नाहीं म्हणणारा

कोणी तरी आहे. त्याशिवाय नास्तित्वाचें ज्ञान होणार नाहीं. ईश्वर नाहीं असें म्हटल्याबरोबर ईश्वराच्या नास्तित्वाचें अस्तित्व, म्हणणाऱ्याच्या अस्तित्वावरून सिद्ध होतें. ईश्वर नाहीं हें म्हणणें मला वाचा नाहीं असें म्हणण्यासारखें आहे. ज्याप्रमाणें मला वाचा नाहीं हें वाचेच्या आधाराशिवाय म्हणतां येत नाहीं. त्याप्रमाणें ईश्वर नाहीं हें म्हणणें ईश्वराच्या आधारावांचून मुळींच संभवत नाहीं. तुकोबांनीं म्हटलें आहेः-**आपुलिया बळें नाहीं बोलवत। सखा भगवंत वाचा त्याची॥१॥ साळुंखी ते कैशी बोले मंजुळवाणी। बोलविता धनी वेगळाची॥२॥ काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें। परि त्या विश्वंभरें बोलविलें॥३॥ तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा। वागवी पांगुळा पायावीण॥४॥** या अभंगांतील भाषा इतकी सरळ व सुबोध दिसते खरी, परंतु त्यामध्यें अर्थगांभीर्य इतकें भरलें आहे कीं त्याच्या विवेचनास सारखे दोन दिवसही पुरणार नाहींत. असो. परमेश्वर सर्व ब्रह्मांडास व्यापून उरलेला **शून्यस्थावर जंगम व्यापुनि राहिला अचळ। बाप रखुमादेवीवरु विठ्ठल सकळ॥** प्राण्यांच्या कर्तृत्वापासून आकाशाप्रमाणें अलिप्त. **व्यापक आणि उदास। जैसें कां आकाश** व प्राणीवर्गास बुद्धिसूत्रानें वागविणारा असा ईश्वर आहे. **तुका म्हणे हरि। सूत्र तुम्हां हातीं दोरी॥ तुका म्हणे नोहे आणिका सारिखा। तोचि माझा सखा पांडुरंग** या वचनांवरून असें दिसतें कीं तुकोबांनीं मानलेलें ईश्वराचें स्वरूप **एकमेवाद्वितियं ब्रह्म, नेहनानास्ति किंचन** असें होतें. **सर्वं खल्विदं ब्रह्म** या श्रुतिवचनावर नाथांचा एक अभंग देतों. **अगाध तुझी लिळा आकळ कैसेनि कळे। ब्रह्मा मुंगी धरूनी तुझें स्वरूप सावळे॥ तुज कैसें भजावें आपणा काय देखावें। तुज माजी राहुनि तुजला कैसें सेवावें॥ अगा देवा तूं आह्मां-ह्मणशी मानवी। हेम अळंकार वेगळे पहावे केंवी॥ एका जनार्दनीं सबाह्य अभ्यंतरीं नांदे। मिथ्या मी तूं-पण स्वप्न सुषुप्ति बोधें॥** आब्रह्मस्तंब एक परमात्माच भरून

उरला आहे, व त्याची लीला अगाध आहे, हें तत्व पूर्णपणें ओळखल्यावर पूजनादिक प्रकार मागें पडतो. ही स्थिति अर्थात् फार पुढची आहे. पूजकास अंतर्बाह्य व्यापून उरलेलें, त्याची पूजा कोणी व कशी करावी ? नाथांनीं म्हटलें आहे. **जें जें दृष्टी दिसे तें तें हरीरूप । पुजा ध्यान जप त्यासी नाहीं ॥** तुकोबांनींही यालाच उद्देशून म्हटलें आहे. **कैसा ध्याऊं तूज कैसी करूं सेवा** व **कांहीं नाहीं तें तूं देवा। कांहीं न करणें ही तुझी सेवा ॥** मागें सांगितल्याप्रमाणें ही कल्पना नास्तिक वादाची नसून भगवत्स्वरूपाच्या व्यापक ध्यानाची सीमा आहे. हें भाग्य धर्मांमध्यें भागवतधर्मात, व पंथामध्यें वैष्णपंथांत आहे हें भाग्य ज्यास लाधलें त्यालाच वैष्णव म्हणावें. पंथाभिमानी वैष्णव नव्हेत. **विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ॥** ज्या भागवतधर्मामुळें ही अत्युच्च कल्पना होते त्याचें वर्णन पुढें केलें आहे.

भागवतधर्म.

—:०:—

ईश्वरप्राप्ति होण्याकरतां हिंदुधर्मात जे अनेक मार्ग सांगितले आहेत त्या सर्वांचा समावेश, कर्ममार्ग, भक्तिमार्ग व ज्ञानमार्ग या त्रयीमध्यें होतो. यांपैकीं कर्ममार्ग कनिष्ठ व ज्ञानमार्ग श्रेष्ठ गणला जातो. परंतु वारकरी सांप्रदायांत भक्तिमार्गास सोपा व सर्वतोपयोगी ह्मणून उत्तम समजतात. वरील साधूंच्या उपदेशाचा भर भक्तिमार्गावरच फार करून होता. अंतरंग शुद्ध नसतां बाह्य कर्माचरण निर्फळ व उपहासास्पद होय. श्रीकृष्णानें अर्जुनास सांगितलें आहेः-**ह्मणोनि गा पार्था । अंतरशुद्ध नसतां । बाहेरी कर्म तो सर्वथा । गिटंबुगा ॥ नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ॥** अंतःकरणरूपी जीवन शुद्ध नसेल तर कर्माचरणरूपी साबण निर्फळ होय. वरील पदाचा सारांश कर्मत्याग करावा असा नसून अंतःकरणशुद्धीवर लक्ष्य अधिक ठेवावें असा आहे. कर्माचाही हेतु चित्तशुद्धीचाच आहे. कर्ममार्गही परमार्थाची प्रथम पायरी आहे. ती चढल्यावांचून वरची पायरी जरी प्राप्त होत

नाहीं तरी साधकानें तेथेंच थांबता उपयोगी साहीं. निव्वळ लौकिक आचार आत्मोन्नतीस सर्वथैव निरुपयोगी आहे. (To observe forms and formalities at the Sacrifice of spiritual progress) या एक पाश्चात्य तत्ववेत्त्याच्या वचनाप्रमाणें हुबेहूब बहुतेकांचा वर्तनक्रम दृष्टीस पडतो.

शिवाय केवळ कर्ममार्ग अगर ज्ञानमार्ग स्वीकारून चालण्याचें मनांत आणलें तरी व्यवहारांत तदनुरूप वर्तन ठेवणें फारच थोड्या लोकांस साधतें. ज्ञानमार्ग तर फारच कठीण. थोड्याशा परोक्ष ज्ञानानें मांडत झालेल्या, वाचाळ पंडितांची, तर समाजांत नित्य बडेजाव असावयाची. तुकोबांनीं त्यांचें वरचेवर **नव्हे ब्रह्मज्ञान बोलताहे सिद्ध । जंव आत्मबोध नाहीं चित्तीं ॥ मीच देव ऐसें सांगतीया लोकां । विषयाच्या सुखा टोकोनियां** इत्यादि वचनांनीं बरेंच खंडन केलें आहे. ह्मणून मनुष्यानें भक्तिमार्गाचेंच अवलंबन करावें हें अधिक चांगलें. गीतेंत कांहीं ठिकाणीं संन्यासयोगाची प्रशंसा केली आहे, तरी एकंदरीनें पाहतां ज्ञानयोगाचा महिमा अधिक वर्णिला आहे व त्याहूनही कर्मफलत्याग करून भक्तिपुरस्पर देवावर विश्वास ठेवणें हा जो भक्तियोग त्याचें महात्म्य सर्वांहून श्रेष्ठ वर्णिलें आहे. **ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते.** यांचें कारण नाथांनीं भागवतांत सांगितलें आहे. **इंद्रियें कोंडितां न कोंडती । विषय सांडितां न सांडती । पुढतपुढती बाधों येती यालागीं हरिभक्ति द्योतिलीदेवें ॥ इंद्रियें कोंडावी न लागती । सहज राहे विषयासक्ति । एवढें सामर्थ्य हरिभक्ति । जाण निश्चिती उद्धवा ॥ योगी विषय त्यागिती । त्यागितां देहदुःखी होती । भक्त भगवंतीं अर्पिती । तेणें होती नित्य मुक्त ॥ दारासुत गृहप्राण । करावें भगवंतासी अर्पण । हे भागवतधर्म पूर्ण । मुख्यत्वें भजन या नांव ॥** या वचनांवरून कर्ममार्गाचें काठिण्य, व भक्तिमार्गाचें सार्वजनिक नात्यानें सुलभत्व, स्पष्टपणें व्यक्त होतें. भगवत्प्राप्तीचा मार्ग सर्वांस सारखा सुलभ असला पाहिजे. तत्संबंधानें इंद्रियनिरोध मुळींच नको असें नाहीं. **इंद्रियांसी नेम नाहीं । मुखीं राम ह्मणुनि काई ॥**

इत्यादि तुकोबांच्या वचनांवरून इंद्रिय निग्रह आवश्यक तेवढाच केला पाहिजे. अहर्निश त्याचाच खटाटोप करण्याचें सर्वांस सामर्थ्य नाहीं, व तसें अगत्यही नाहीं. जगन्नियंत्या प्रभूनें निर्माण केलेलें सृष्टीसौन्दर्य आपणांस संसारबद्ध करील म्हणून त्याचें मुळींच सेवन न करणें यापेक्षां आनंदरूपी असा जो परमात्मा तोच युक्तिप्रयुक्तीनें आपल्या इंद्रियांचा मुख्य विषय करणें, व त्याच्या अगाध लीलेंचें प्रतिबिंब मनावर ठसाविणें, व त्याविषयीं आपल्या अंतःकरणांत प्रेम उत्पन्न होणें, यामुळें पुष्कळ लवकर व सहज कार्य होण्यासारखें आहे. **नलगे दंडावें भुंडावें । गावें आनंदें नाचावें । प्रेमसुख घ्यावें । या वैष्णवा सांगाती ॥** कांहीं वर्षांपूर्वी कै. न्या. रानडे यांनीं पुणें मुक्कामीं **सोपें वर्म आह्मा दाविलेंसें संतीं । टाळ दिंडी हातीं घेऊनि नाचूं** या तुकोबांच्या अभंगावर व्याख्यान देत असतां, असें प्रतिपादन केलें कीं, हिंदुधर्माचा पाया वेदशास्त्रादि पुराणांवर जो आहे, तो त्यांवर नसून जर या तुकोबांच्या अभंगावर असतां, तर हल्लीं ज्याप्रमाणें धर्मबंधनें विस्खलित होऊन हिंदुधर्माची कांहीं अंशीं पायमल्ली होत आहे, त्याप्रमाणें मुळींच झालें नसतें. वरील भाषणांत वेदादिकांस हीनत्व आणण्याचा उद्देश मुळींच नसून धार्मिक बाबतींत एकंदर जनसमूहास तरून जाण्यास सुलभ व सोपा मार्ग असावा असा आशय आहे. असा सोपा मार्ग हरिभक्तिव्यक्तिरिक्त कोणताच नाहीं, व भक्तीस प्राधान्य दिलेला व सर्व यातींस सारखा पावन करणारा भागवत धर्मावेरीज दुसरा कोणताच मार्ग नाहीं. नाथांनीं म्हटलें आहेः—**न करितां वेदशास्त्र व्युत्पत्ति । ऐशिया अज्ञाना निजात्मप्राप्ति । सुगम जोडे ब्रह्मस्थिति । यालागीं हरिभक्ति प्रकाशिली देवें ॥ तें हें राया भागवत जाण । मुख्यत्वें भक्तिप्रमाण । भावे करितां भगवद्भजन । अज्ञान जन उद्धरती । स्त्रीशूद्रादि आवघे । घालुनियां ये नावें । एकेच खेपें स्वयें न्यावें । भजन भावे परतीरा ॥** हा भागवत धर्म जरी सनातन आहे, तरी श्रीज्ञानदेवांच्या अगोदर कर्म, योग, व ज्ञान, असे दुष्कर मार्ग ज्यास्त प्रचलित होते, व **आपण तरेल नव्हे तें नवल । कुळ उद्धरील सर्वांचें तो ।** ही तुकोबांची कल्पना बहुतेक अज्ञातच

होती; असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्मणून सर्वांस साध्य असा जो भक्तिमार्ग, तो नाथमहाराजांनीं प्राकृत भाषेंत सर्वजनांपुढें मांडून तो आपल्या चरित्रांतही आचरून दाखविला. तुकोबांनीं नाथमहाराजांचेंच अनुकरण करून नाथांनीं दाखवून दिलेल्या नावेंत आपण स्वतः बसून इतरांसही ते त्या नावेंत बसण्याकरितां हाका मारीत होते हें त्यांच्या खालील वचनावरून सिद्ध होतें. **तुका-नाम नावेमध्यें बसे** व **यारे यारे लहान थोर। याती भलते नारीनर। करावा विचार। नलगे चिंता कोणाची॥** नाथमहाराजांच्या व तुकोबांच्या उक्तींत किती उत्कृष्ट साम्य असून त्यांतील आशय किती हृदयंगम आहे. या त्यांच्या कृत्यांबद्दल एकंदर हिंदुसमाज त्यांचा फार ऋणी आहे. ज्या धर्मरूपी देवालयाचा श्रीज्ञानदेवांनीं पाया घातला, त्याचा तुकोबांनीं कळस केला. ह्मटले आहेः-**संतकृपा झाली। इमारत फळा आली॥ १॥ ज्ञान देवें रचिला पाया। उभारिलें देवालया॥ २॥ नामा तयाचा किंकर। तेणें केला हा विस्तार॥ ३॥ जनार्दन एकनाथ। ध्वज उभारीला भागवत॥ ४॥ तुका झालासे कळस। भजन करा सावकास॥ ५॥** त्यांनीं भजन कीर्तनाच्या रूपानें वृत्तीला, इंद्रियांना व सवयींना योग्य वळण लागेल असा सोपा मार्ग दाखविला. **पडिलें वळण इंद्रियां सकळां। भावतो निराळा नाहीं दुजा॥** लहान बालक न बोलतां, न ओळखतां ज्याप्रमाणें आईकडे जातें, त्याचप्रमाणें भक्तीचें वळण इंद्रियांस व बुद्धीस लागलें असतां, तीं भगवंता कडेस वळतात. व भगवंताची इच्छा ती सद्दीच्छा असें होऊन त्याची इच्छा तीच स्वतःची इच्छा बनून जाते. कित्येक आधुनिक स्वदेशाभिमानी विद्वान असा आक्षेप घेतात कीं, हा भागवतधर्म पंगुपणाचा असून हे साधुसंत पंगु होते, व त्यांनीं सर्व लोकांस पंगुपणाचें वळण लावलें. सद्रहु आक्षेपकार रामदासांचा मार्ग मात्र सामर्थ्याचा आहे असें मानतात. हें ह्मणणें अत्यंत विसंगत आहे. रामदासांनीं दासबोध ग्रंथ रचिला, व शिवाजीनें त्यांतील उपदेशाचें अवलंबन केलें ह्मणून तो सामर्थ्यवान असें यांचें ह्मणणें आहे व याच कारणास्तव हे रामदासांस समर्थ अशी उपमा देतात. परंतु इतर साधूंनीं पूज्य मानलेला भक्तिमार्गच संवादरूपानें सर्वांस प्राप्त

व्हावा, म्हणून दासबोध ग्रंथ समर्थांनीं रचिला अ हे असें स्वामींनीं ग्रंथारंभीं म्हटलें आहे. आतां त्यांत कांहीं प्रकरणें राजकारण वर आहेत, म्हणून तो ग्रंथ तन्निमित्तच रचिला असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. दासबोधास राज्यकारस्थानी बनविणाऱ्या देशभक्तांनीं रामदासांचा 'राजनीति' हा ग्रंथ शोधून पहावा. दासबोधाचें मुख्य प्रमेय परमेश्वर भक्तीचें अवलंबन करून परमार्थ करावा हेंच आहे. ज्याप्रमाणें भागवतांतील बकीचें उत्तम विवेचन व शास्त्रकारांचा मुख्य सिद्धांत झुगारून देऊन विषयीजन फक्त रासक्रीडेचें व गोपालकल्यांचेंच ग्रहण करतात. त्याप्रमाणेंच दासबोधाची स्थिति झाली आहे. बरोबरच आहे '**जया ज्याचें ध्यान तैंची होय त्याचें मन** या तुकोक्तिप्रमाणें ज्या दृष्टीनें अवलोकन करावें त्याप्रमाणेंच दिसून येते. यावरून रामदासांची गणना इतर साधूंतच केली पाहिजे. असो. **हेंचि थोर भक्ति आवडते देवा। संकल्पावी माया संसाराची॥ ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें। चित्तीं असो द्यावें समाधान॥ वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ। भोगणें तें फळ संचिताचें॥ तुका ह्मणे घालूं तयावरी भार। वाहूं हा संसार देवापायीं॥** इत्यादि अभंगांत प्रतिपादन केलेला भक्तिमार्ग पंगुपणाचा आहे काय हें पाहिलें पाहिजे. सर्वत्र वासुदेव पाहणारे साधु एका गालांत थप्पड मारली असतां दुसरा गाल पुढें करणारे यांच्यानें दुसऱ्याचा सूड कसा उगविला जाणार? व हें राष्ट्राचें हित तें काय साधणार? गोष्ट बरोबर आहे. परंतु एवढें मात्र ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, कोणतीही गोष्ट व विशेषें करून राष्ट्रोन्नति, आत्मोन्नतिखेरीज मुळींच घडून येणार नाहीं. राष्ट्राचें हित तें आपलें हित. वेळ पडल्यास वाटेल तसा स्वार्थत्याग करून मृत्युमुखीं देखील पडावयाचें, या गोष्टीस जनीं जनार्दन, व तत्प्रीत्यर्थ अवर्णनीय प्रेम, यांची जरूर लागत नाहीं काय? जो आपल्या मुलाबाळांवर, शेजाऱ्यापाजाऱ्यांवर प्रीति करीत नाहीं, त्याची देशावर तरी प्रीति कशी असणार? हे नाममात्र स्वदेशप्रीति करणारे वरील आक्षेप घेतांना व भक्तिमार्गास दूषण देतांना, भक्ति ह्मणजे प्रीति, हा भक्तिशब्दाचा अर्थ विसरतात असें वाटतें. देशसेवा व देशकार्य, प्रीति व प्रेम या शिवाय मुळींच होऊं शकत नाहीं.

व प्रीति व प्रेम भक्तीचींच स्वरूपें आहेत. ह्मणून भक्तीवरील हा आक्षेप व्यर्थ आहे. ' मनुष्याणांसहस्रेषु ' या न्यायानें खरा परमार्थ करणें किती दुष्कर, व तो ज्यांनीं केला त्यांस पंगु ह्मणणें कितीतरी विपरीत आहे. अंगांत बल आहे ह्मणून लोकांस त्रास द्यावा यांत कांहीं शौर्य नाहीं. **ह्मणवीसि तूं शूर जरी आपल्याला। तरी राखी मदनशराला** ॥ असें खरें सामर्थ्य वाढण्यास भक्तिमार्गच साधक आहे. खरें शौर्य इंद्रियें जिंकण्यांतच आहे. तीं ज्या संतांनीं जिंकलीं त्यांना पंगु ह्मणणें वेडेपणाचें आहे. साधूंच्या उक्तीप्रमाणें वागणें फार कठीण आहे. **तुका ह्मणे शूर असती घरोघर। अवघे फजितखोर बायकांचे** ॥ हीच स्थिती सध्यां समाजांत दिसून येते. **तुका ह्मणे घालूं तयावरी भार। वाहूं हा संसार देवापायीं** ॥ यावरून अगदीं तटस्थ राहून कांहीं न करणें असें नसून, हें कार्य परमेश्वराचें आहे अशा बुद्धीनें तें करावयाचें. ' चित्तीं असों द्यावें समाधान ' हेंही एवढ्याच करितां कीं आपला मोठेपणा व्हावा, आपलाच हेतु सफल व्हावा, असें न वाटतां ईशहेतूची सिद्धी आपले हातून व्हावी ही बुद्धी धरणें हें माया संकल्पिणें होय. राष्ट्रोन्नतीच्या कामीं तुकोबांच्या उपदेशाचा शिवाजीरायांच्या मनावर अत्यंत परिणाम झाला ही गोष्ट सर्वमान्य आहे. वाटेल त्या ठिकाणीं शिवाजीराजे असले तरी तेथून ते रात्रीची अपरात्र करून तुकोबांच्या कीर्तनास येत असत तें उगीच मनोरंजनार्थ कीं काय ? काय सांगावें ! शिवरायानें तुकोबांचा लौकिक ऐकून दोन वेळां मोठाले नजराणे पाठविले. हत्ती, घोडे, शिबिका पाठवून बोलावून घेतलें. फार तर काय, पण ते स्वतः दर्शनास आले, व रत्नांचें ताट त्यांनीं तुकोबांपुढें ठेविलें. पण या गृहस्थाच्या विरक्तीचा व निस्पृहतेचा मनोरा बालाग्रही ढळला नाहीं. ही संधी तुकोबांसारख्या दुष्काळपीडित व कुटुंबवत्सल मनुष्यास इतकी उत्तम होती कीं, त्यांच्या स्वतःच्या कुटुंबपोषणाची काळजी नाहींशी होऊन त्यांना वंशपरंपरेनें ऐषआराम भोगावयास सांपडला असता. परंतु त्या वेळीं तुकोबांनीं ह्मटलें ' **तुका ह्मणे धन। आम्हां गोमांसा समान** ॥ **आम्हीं तेणें सुखी। ह्मणा विठ्ठल विठ्ठल मुखीं** ॥ ज्या धनासाठीं आक्षेपकारांसह लक्षावधि लोक रात्रंदिवस धडपड करीत आहेत, त्या धनास ते कसपटाप्रमाणेंच

मानीत असत. प्रत्येक मुमुक्षूस दारेषणा, वित्तेषणा व लोकेषणा, फार बाधक आहेत. त्यांमध्यें दारेषणा व लोकेषणा यापेक्षां वित्तेषणा साधकांस फारच घातक आहे. शिवाजीच्या वेळीं शेकडों स्वामी, शेकडों ब्रह्मचारी व साधु होते. पण दिलेली देणगी नाकारणारा तुकोबाशिवाय दुसरा कोणी नव्हता. रामदासस्वामीची योग्यता कमी व्हावी असा मुळींच हेतु नसून, या आक्षेपकारांनीं जी समर्थांची ओढाताण मांडली आहे, त्यायोगें समर्थाविषयीं वारकरी लोकांचा ग्रह बदलून त्यांनीं समर्थांस संतमालिकेंतून हद्दपार केलें आहे. ज्या कारणानें आक्षेपकार समर्थांस अधिकपूज्य मानतात, त्याचकारणानें वारकरी लोक दूषण देतात. वास्तविक पाहिलें असतां दोन्ही पक्ष अकुंचित ह्मणून चुकीचे आहेत. दोघेही आपापल्या ठिकाणीं श्रेष्ठच आहेत. त्यांच्यांतील न्यूनाधिक्य पाहण्याची निदान आपली तरी योग्यता नाहीं. दोघांनीं दोन पक्ष स्वीकारून धार्मिक बाबतींत दुही माजविणें अत्यंत चुकीचें आहे. सर्व साधु एकरूपच आहेत. समर्थांनीं स्वतः ह्मटल्याप्रमाणें **साधु दिसती येगळाले। परी ते स्वस्वरूपीं मिळाले। अवघे मिळोनि एकचि झाले। देहातीत वस्तु॥** ब्रह्मस्वरूप हेंच साधूंचें अंतिम स्वरूप जर आहे तर त्यांच्यांत भेद कसा करतां येणार? बावनकशी सुवर्णाचे गोठ, पाटल्या, कडीं वगैरे निरनिराळें अलंकार केले ह्मणजे गोठ श्रेष्ठ कां कडें श्रेष्ठ याचा निकाल देणारा कोण चतुर भेटेल तो भेटो आह्मांस तर साधूंची परस्पर तुलना करणें अयोग्य वाटतें.

धर्मचालन.

—:०:—

आजपर्यंत ज्या थोर पुरुषांनीं मनुष्याच्या ऐहिक व पारलौकिक सुखाचा विचार केला, त्यांस असें आढळून आलें आहे कीं, धर्म ह्मणजे सदाचरणाचा व परमेश्वरप्राप्तीचा मार्ग. तो मूळचा जरी अत्यंत पवित्र व सुखावह आहे, तरी मनुष्याच्या अज्ञानामुळें व पाप वासनामुळें, त्यांत अनेक गोष्टी हळू हळू शिरत असतात, आणि त्या गोष्टी मनुष्यांच्या दुःखास कारण होतात; ह्मणून त्या काढून टाक-

ण्याचा प्रयत्न यथाकाळीं केला पाहिजे. श्रीएकनाथ व तुकारामम्हाराज यांनीं हाच प्रयत्न केला. **झाड संतांचे मारग । आडरानीं भरले जग ॥** पूर्वी प्रस्थापित केलेला धर्ममार्ग कालावधीनें अधर्म व अनीतिमिश्रित होऊन गेला, तो या साधुसंतांनीं पुनः प्रज्वलित केला. या प्रयत्नासच " धर्मचालन " असें म्हणतात, व त्यावांचून मनुष्याचा तरणोपाय नाहीं ही गोष्ट सर्व राष्ट्रांतील थोर पुरुषांच्या लक्ष्यांत येऊन चुकली आहे. ती अत्यंत महत्वाची आहे, म्हणून तिच्या परिपूरणार्थ ते यथाशक्ति प्रयत्न करीत असतात.

अशा प्रकारचें धर्मचालन युरोपखंडांत इसवी सनाच्या सोळाव्या शतकांत झालें. त्यावेळेपर्यंत युरोपांतील सगळ्या ख्रिस्ती लोकांवर रोम येथील पोप नामक धर्माध्यक्षाचा विलक्षण अंमल चालत असे. धर्माच्या कामांत तो म्हणेल ती पूर्वदिशा असे. इतर लोकांची गोष्ट काय, पण पाश्चात्य राष्ट्रांतील मोठे शूर राजे देखील त्यांच्यापुढें थरथर कांपत असत. त्यांचें धर्मपुस्तक बायबल, तें लाटीन भाषेंत होतें. तें तसेंच अर्थ न समजतां लोकांनीं वाचलें पाहिजे व धर्मप्रचारक त्याचा जो अर्थ सांगतील, तोच त्यांनीं खरा मानला पाहिजे. मनुष्याच्या हातून केवढेंही पाप होवो त्यानें धर्माध्यक्षास द्रव्य दिलें, व त्यानें मृत्युसमयीं 'पापविमुक्त' म्हणून सर्टिफिकीट दिलें म्हणजे तो मुक्त झाला असें समजत. स्वर्गप्राप्तीच्या तर चिठ्या देत असत ! हा सगळा अनीतिचा प्रकार एकंदर राष्ट्राच्या अभ्युदयास विघ्नकारक होता. लोकांत विद्येचा प्रसार जसजसा जास्त होऊं लागला तसतसा हा प्रकार निंद्य वाटूं लागला व कांहीं पुरुष तनमनधनेशीं त्याच्या नाशास लागले. त्या सर्वांत मार्टिन लूथर हा फार प्रसिद्ध होता. त्यानें मोठ्या धैर्यानें तत्कालीन धर्मप्रचारांतील सगळी भ्रष्टता बाहेर काढिली. बायबलाचें भाषांतर स्वभाषेंत प्रसिद्ध करून धर्मसंबंधानें सर्व माणसांस सारखाच अधिकार आहे हें सिद्ध केलें, व सर्वांस साध्य असा सुलभ धर्माचरणमार्ग जनांस स्पष्टपणें दाखवून दिला. त्यामुळें पोपास व त्याच्या अनुयायांस अतिशय संताप येऊन ज्याप्रमाणें धर्मढोंगी कर्मठांनीं इकडील साधुसंतांचा छल केला, त्याप्रमाणें त्यांनीं त्याचा पराकाष्ठेचा छल मांडला तरी तो डगमगला नाहीं. शेवटीं त्याचें म्हणणें विचारशील लोकांस खरें वाटून ते त्याप्रमाणें वागूं लागले. सांप्रत त्याच्या पंथाचा प्रसार पुष्कळ होऊन तोच

आतां विद्याचार संपन्नतेच्या वृद्धीस कारणीभूत झाला आहे. धर्मोन्नतीच्या बरोबरच राष्ट्रोन्नति कशी होते याचें इंग्लंड हें एक ढळढळीत उदाहरण आहे. आतां एवढें मात्र खरें कीं तिकडील धार्मिक चळवळ राजकीय बाबतीवर अवलंबून होती, परंतु इकडच्या चळवळींत तसा मुळींच प्रकार नव्हता. वस्तुस्थिति अशी होती कीं, ज्याप्रमाणें सोळाव्या शतकांत प्राटेस्टंट लोकांची धार्मिक चळवळ सुरू झाली, त्याप्रमाणेंच हिंदुस्थानामध्यें व विशेषेंकरून दाक्षिणेंत जवळ जवळ त्याच सुमारास धार्मिक व सामाजिक चळवळ चालू होती. हें धार्मिक पुनरुज्जीवन भोळ्या स्वार्थपरतेच्या तत्वावर नसून, त्याच्या मुळाशीं बाह्य आचार विचार व जातिभेद, यांचें खंडन करून अंतःकरणशुद्धी व भूतमात्राचे ठायीं अकृत्रिम प्रेम यांची महती वाढविणें, ही गोष्ट होती. हे धार्मिक पुनरुज्जीवन कोणत्या एका विवक्षित जातीचें रुत्य नसून एकंदर लोकसमूहांचें यांमध्यें अंग होतें. ज्या संतांच्या हातून हें रुत्य झालें, त्यांपैकीं श्रीज्ञानदेव, एकनाथ, तुकारामम्हाराज व स्वामी रामदास हीं नररत्नें इतक्या थोर योग्यतेचीं होऊन गेलीं कीं अद्याप त्यांचा कीर्तिध्वज सारखा फडकत आहे. या साधूंच्या चळवळींचा प्रताप असा झाला कीं, शूद्र जातींतच नव्हे तर महारांत देखील चोखामेळ्यासारखे काव्य करणारे व साधु अशा पट्टीचे निर्माण झाले कीं, ते ब्राह्मणांसुद्धां सर्व देशांस वंद्य झाले. या चळवळींचा दुसरा परिणाम असा झाला कीं, महंमदी धर्माचे लोक देखील या साधूंचा भक्त्युद्रेक पाहून व आपला दुराग्रह सोडून देऊन, शेखमहंमदासारखे यांचे शिष्य झाले व कीर्तनरूपानें या साधूंचें अनुकरण करूं लागले. व एकंदर राष्ट्रांत लोकांची आत्मोन्नति होऊं लागली, श्रीएकनाथतुकारामादि सर्व साधुसंतांनीं लोकांची अशी खात्री करून दिली कीं, मोक्षमार्ग हा सर्वांनीं सारखा अवलंबन करण्यासारखा आहे. परमेश्वराचे ठिकाणीं उंच नीच, स्त्रीपुरूष हा भेद मुळींच नसून जो त्यास अनन्यभावें शरण जातो, त्यावर, जातीची व बाह्य स्थितीची आडकाठी न येतां, पूर्ण प्रसाद होतो **उंच नीच कांहीं नेणें भगवंतीं। तिष्ठे भाव भक्ति देखोनिया॥** असें साधु म्हणतात. हें या संतांचें उपदेशामृत सेवन करून अबला व परधर्मीही साधु बनले. या साधूंच्याद्वारें ईश्वराचा हेतु चांगला सिद्धीस

गेला तो असाः—एका वृद्ध ब्राह्मणास दोन मुलगे होते. त्यापैकीं वडील मुलगा आपल्या मेहनतीनें व दैवयोगानें कलेक्टर झाला. धाकटा मुलगा कांहीं विद्याभ्यास न केल्यामुळें पाणक्या झाला. हे दोघे रस्त्यानें चालले ह्मणजे वडील मुलाच्याबरोबर दोन शिपाई व नोकरचाकर असावयाचे व धाकट्याबरोबर तांब्याची कळशी असावयाची. अशा प्रकारें दोघांच्या परिस्थितींत महदंतर असल्यामुळें दोघेही एकमेकापासून दूर दूर होऊन जवळ येण्यास ते लाजत असत. परंतु बापाचे घरीं जेवणास आले ह्मणजे ते निःशंकपणें एकमेकांच्या शेजारीं बसून आनंदानें जेवीत असत. त्याचप्रमाणें एक मनुष्य मोठा पंडीत असला व दुसरा शास्त्रहीन असला तरी ईश्वराचेंच सर्वजण लेंकरें आहेत. त्याच्या परमार्थरूपी भोजनांत नामामृत सेवन करण्यासच काय परंतु सर्व ठिकाणीं आपणा सर्वांस सारखा हक्क आहे. नाथमहाराजांनीं इतर संतांपेक्षां वरील कल्पनेवर ज्यास्त जोर दिला. त्यांच्या घरीं त्यांचा शिष्य बंदेखां ह्मणून एक मुसलमान नेहमीं पुराण ऐकत बसत असे. एके दिवशीं त्याच्या जातीच्या मंडळीची गांठ पडून, त्यांनीं बंदेखांस निमाज पढण्यास बोलाविलें. बंदेखानें एकाच अभंगांत उत्तर दिलें **म्हैजिदम्यानें अल्ला खडा। औरक्या जगा खाली पडा? ॥ चारो वखत निमाज के। औरक्या वखत चारोंके ॥ जिदर उदर भरा है धनी। निमाजकी दरकार नहीं बाबा ॥ एका जनार्दनका बंदा। जमीन अस्मान भरा है खुदा ॥** नाथमहाजास जो व्यापकतेचा अनुभव आला होता तोच बंदेखानें आपल्या उत्तरांत दर्शविला आहे. पैठणांत रामा महार व्यास देखील नाथमहाराजांचा उपदेश होऊन तोही महाज्ञानी ह्मणून प्रसिद्ध होता. त्याच्या जातीबद्दल पुष्कळ वादविवाद झाला. शेवटीं नाथसहाराजांनीं स्वतः उद्धार काढले ते **राण्या महार वैष्णव भक्त। श्रीहरिभजनीं झाला रत ॥ षडवैरी जिंकिले समस्त। तरी अंत्यज यातें ह्मणूं नये ॥ अनामिकाचें लक्षण पाही। एकही न दिसे याचे देहीं ॥ भागवतधर्म बोलिले सर्वही। ते याचे ठायीं असती ॥** वेदवाक्यही असेंच आहे. **निर्ममो निरहंकारो निःसंगो निष्परिग्रहः। रागद्वेषविनिर्मुक्तस्तंदेवा ब्राह्मणं विदुः ॥** जो मोह, अहंकार, संग,

परिग्रह, राग, द्वेष, यांपासून मुक्त आहे, त्यालाच देव ब्राह्मण असें समजतात. म्हणूनच तुकोबांनीं म्हटलें आहे. **ब्राह्मण तो एक चोखामेळा खरा.** असो. इतकी धार्मिक चळवळ महाराष्ट्रांत जोरानें चालू झाली कीं, तिचा परिणाम अगदीं हीन यातींपासून तों उंच वर्णापर्यंत विलक्षण झाला. या चळवळीच्या अगोदर येथील समाजाची स्थिति, युरोपियन समाजस्थितीप्रमाणेंच होती. तिकडच्याप्रमाणें इकडेही प्राचीन ग्रंथांचें प्राबल्य होतें. ठरीव मतांच्या विरुद्ध जाणारांस दोहींकडेही पाखांडी समजत असत. धर्माधिकारी दोहींकडे सारखेच आपमतलबी व धोरणी होते. व त्यांचें वजन जसें तेथें होतें तसेंच तें येथेंही होतें. सारखी परिस्थिति झाली म्हणजे परिणामही बहुतेक सारखेच असतात. व तसेंच ते घडून आले. तिकडे बायबलाचें स्वभाषेंत भाषांतर होऊन त्याचा अर्थ सर्वांस सुगम झाला इकडेही संस्कृत ग्रंथांचीं मराठी भाषेंत भाषांतरें होऊन सर्व लोकांना धर्मरहस्य प्राप्त करून घेण्याचा अधिकार मिळाला. तिकडच्या चळवळीप्रमाणें इकडची चळवळ मात्र अल्पकालीन नसून तिनें जवळ जवळ चारशें वर्षांचा काल व्याप्त केला होता. तिची पहिली भरती श्रीज्ञानदेवांच्या वेळीं येऊन ती लवकरच मुसलमानांच्या अमलाखालीं बंद पडली. व पुनः श्रीएकनाथांच्याबेराबर उत्पन्न होऊन पुढें तुकोबांच्या कारकीर्दीत तिच्याच प्रभावानें अनेक साधुसंत उत्पन्न होऊन त्यांनीं महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांत धर्मचिकित्सा चालविली. या साधुसंतांच्या चळवळींत हिंदुसमाजावर व महाराष्ट्रांतील धर्मावर जे अनेक फेरफार झाले त्यांपैकीं महत्वाचे ते खालीं देतोः—

संस्कृत भाषेचें महत्व कमी होऊन महाराष्ट्र भाषेचा उदय झाला. सर्व महत्वाच्या ग्रंथांचें प्रमेय मराठी भाषेंत जनांपुढें मांडलें गेलें. तुकोबांच्या अभंगांत श्रुतीचा मतितार्थ पंडित लोकांना आढळून आला व अध्यात्म विषय बहुतेकांना अवगत झाला. भाषेबरोबर धर्माचेंही स्वरूप बदललें. जो धर्म हा कालपर्यंत ब्राह्मणांसच अवगत होता तो महाराचे घरींही दिसूं लागला. जातीमत्सराचें बंड कमी होऊन सर्व ईश्वराचीं लेंकरें आहेत असें सिद्ध झालें. ब्राह्मण व महार दोघेही वारकरीपंथांत परमेश्वरभक्तीमध्यें विषमभाव विसरून जातात. ब्राह्मण महाराचा तिरस्कार करीत नाहीं, व महार ब्राह्मणाची निंदा करीत नाहीं. शूद्र जातींचें हीनत्व नाहींसें होऊन तिजमध्यें बरेच प्रख्यात साधु झाले.

गृहस्थाश्रमाचें महत्व फार वाढून तो ईश्वरप्राप्ति करून देण्यास साधक आहे असें ठरलें, व स्त्रीजातीस अमोन्नतीचा लाभ होऊं लागला. स्त्रीशुद्रादिकांस वैदिक धर्मानें बहिष्कृत केलें होतें, त्यांस या संतांनीं पदरीं घेऊन दुष्कर असा ईश्वरप्राप्तीचा मार्ग तो सर्वांस सुलभ करून दाखविला. परमार्थ संपादन करण्यास अरण्यांत जाण्याची जरूरी गाहीं. भागवतधर्माचा प्रसार झाल्यामुळें सर्वत्र देव आहे अशी कल्पना होऊन, पंथवैचित्र्य, व मताभिमान कमी होऊन लोकांस सहिष्णुता प्रिय झाली. यामुळें धार्मिक बाबतींत होणारे तंटे बखेडे कमी झाले. इतकेंच नाहीं, तर कित्येक मुसलमा नही या धर्माचे अनुयायी झाले.

कर्ममार्गाचें व ज्ञानमार्गाचेंही महत्व कमी होऊन भक्तिमार्ग वाढला. भक्त आपल्या धर्माची इमारत वर्णाश्रमाची पोकळ व आपमतलबी बडबड व नित्य व नैमित्तिक कर्मांचा व्यर्थ खटाटोप यावर रचित नसून ईश्वरभक्ति व सार्वत्रिक प्रेम यावरच उभारितात. जपतपादि नाना साधनांचा क्रम बंद पडला. ईश्वरनामस्मरण व चित्तशुद्धीकडे विशेष लक्ष्य लागलें.


अनेक देवतांची कल्पना नाहींशी होऊन ईश्वर एक आहे व तो सर्वव्यापी आहे. त्याव्यतिरिक्त कोणाचेंच अस्तित्व राहूं शकत नाहीं. ईश्वरप्राप्तिसाठीं सद्ग्रंथावलोकन, सत्संगति, शुद्ध व पवित्र आचरण, ईश्वरभक्ति व आत्मनिरीक्षण इत्यादिकांची जरूरी आहे. प्रत्येकाला मोक्षमार्गाचें अवलंबन करण्याचा अधिकार आहे. ईश्वर न्यायी व दयाळु आहे.

या पुस्तकाच्या आरंभीं श्रीएकनाथ, व तुकाराममहाराज यांची संक्षिप्त चरित्रें देऊन त्यांची परमार्थाकडे वृत्ति कशी वळली, त्यांना मध्यंतरीं कसकसे कठीण प्रसंग सोसावे लागले याचें वर्णन केलें आहे. ईश्वरप्राप्तीसाठीं प्रयत्न करीत असतां लोकसंग्रह करून लोकोपकाराचीं कृत्यें जीवापाड मेहनत घेऊन त्यांनीं किती उत्तम रीतीनें केलीं व या लोकसंग्रहाप्रीत्यर्थ त्यांनीं पंढरपूरची यात्रा व हरिकीर्तन हीं दोन साधनें कशी अंगिकारिलीं हेंही सांगितलें आहे. त्यांतूनही कीर्तनाचा महिमा विशेष दाखविला. भजन, कीर्तन, इत्यादि जे भक्तीचे प्रकार आहेत त्या सर्वांना ईश्वर विषयक निस्सीम प्रेमाची अवश्यकता आहे. त्याची पूजा फक्त प्रेमानें होते. इतर कशानेंही होत नाहीं. नंतर वेद-

कालापासून धर्माची कशी व्यवस्था होती व त्यांत कसकसे फेरफार झाले ते सांगून, भागवत धर्माची आवश्यता व त्याचें प्राचीनत्व दाखविलें. भागवत धर्म सर्व लोकांसाठीं असून व त्याचें स्वरूप इतर सर्व धर्मापेक्षां उच्चतर असून, त्यांतील मार्ग फार सोपा आहे, व साधुसंतांनीं या मार्गाचें अवलंबन करून जातीकडे लक्ष्य न देतां सरसकट सर्वांस उपदेशामृताचें सेवन सारखें करावितें. असा उत्कृष्ट भागवत धर्म पंगुपणाचा नाहीं हें दाखविलें. या भागवतामध्यें भक्ति प्रधान आहे व मोक्ष संपादनार्थ ज्ञानापेक्षां भक्तीचे श्रेष्ठत्व दाखविलें. युरोपांतील धार्मिक चळवळींचें येथील धार्मिक चळवळीशीं बरेंच साम्य असून त्या चळवळीचे पुरस्कर्ते जे श्रीएकनाथ व तुकारामम्हाराज यांच्या योगानें हिंदुसमाजावर व महाराष्ट्रांतील धर्मावर झालेले फेरफार सांगितले. त्यांतील मुख्य व अति महत्वाचे झटलें झणजे राष्ट्रभाषेचा व भागवत धर्माचा उदय हे होत. तो भागवत धर्म झणजेः--**भगवद्भाव सर्वां भूतीं । हेंचि ज्ञान हेंचि भक्ति ॥**

REFBK-0000360

समाप्त.



दीनबंधु वर्तमानपत्र.

विद्येंत मागसलेल्या लोकांत जागृति उत्पन्न करणारें सगळ्या महाराष्ट्रांत एकच पत्र मुंबईस प्रसिद्ध होतें. वर्षाची अगाऊ वर्गणी रु. १–१४–०.

संपादक, दीनबंधु.
सिताराम बिल्डिंग्ज, हॉर्नबीरोड, मुंबई

सुधारकांतील निवडक निबंध.

कै० प्रिन्सिपाल **गोपाळ गणेश आगरकर** एम्. ए यांच्या लेखणीनें लिहिलेले, सामाजिक धार्मिक नैतिक व इतर सुधारणाविषयक निबंधसंग्रह विक्रीस तयार आहे. कि० १। रुपाया, सुधारकाच्या वर्गणीदारांस १ रुपया. टपाल हाशील १ आणा.

म्यानेजर, **सुधारक**, पुणें.

मुलांसाठीं सचित्र मासिक पुस्तक

आनंद.

मौजेच्या सोप्या गोष्टी, मनोरंजक व बोधप्रद कविता पौराणिक कथा, शास्त्रीय व मनोरंजक माहिती, मुलांचे लेख, सुंदर चित्रें व खेळांचीं वर्णनें वगैरे केवळ मुलांच्याच उपयोगाचे विषय यांत येतात. दरमहा पृष्ठें ३२. वर्गणी ट. ह. सह १ रुपया.

पत्ता—म्यानेजर **आनंद**, सदाशिव पेठ, पुणें.